# माणूस

# आज लोकसभेच्या कामकाजात 'माणूस' कार्याची नोंद झाली.

## पु. ग. मावळंणकर म्हणाले......

२३ एप्रिल १९७७

७५ पैसे

# यक्षप्रश्न

भारतात स्वातंत्र्यानंतर प्रगतीचा वेग न मंदावता, सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर, नोकरशाहीला (Bureacracy) सतत दाबात ठेवणारी, तिच्याकडून वेळेवर कामे करून घेण्यासाठी नोकरशाहीच्या सर्व स्तरांवर तिच्यावर वचक ठेवणारी, पण सत्ता न स्वीकारणारी, अशी एक पर्यायी संघटना उभारल्याशिवाय आम्ही वेगाने केलेली प्रगती, साधलेला आर्थिक विकास हा समाजाच्या सर्व थरांत पोचणार नाही. त्यामुळे विषमता वाढेल, आर्थिक तणाव असह्य होतील. हे जाणून महात्मा गांधींनी आपली यतिधर्माची कल्पना मांडली. त्यासाठी सत्ता हेच सर्वस्व असे न मानणारे, चारित्र्यवान व रचनात्मक कार्य करणारे अनेकविध क्षेत्रातील कार्यकर्ते व व्यक्ती (उद्योगपतींपासून ते ग्रामसेवकांपर्यंत) म. गांधींनी आपल्या चळवळीत जमा केले. त्यांची विश्वासाने साथ घेतली. भारत स्वतंत्र होत असताना, सर्व भारताची सत्ता अगदी सहजपणे हाती येत होती. (भारताच्या फाळणीसाठी तीन पक्षांची मला मान्यता हवी आहे, एक मुस्लीम लीग, दुसरा कॉंग्रेस व तिसरे मि. गांधी–इति लॉर्ड माऊंटबॅटन.) तरीही ती न स्वीकारून, त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमोर, सत्तेची अभिलाषा न धरता सतत कार्यरत राहण्याचा आदर्श ठेवला.

गेल्या तीस वर्षांत, काळाच्या चाळणीत, ती व्यक्ती, (म. गांधी) गांधीवादी कार्यकर्ते व त्यांची शक्ती विस्मृतीत गेली.

गांधीजींच्या मृत्यूनंतर सत्ता नेहरूंच्या हाती एकवटली. तिचे फार मोठ्या प्रमाणात केंद्रिकरण झाले. भारताच्या प्रगतीचे जगड्व्याळ प्रश्न केवळ नेहरूच सोडवू शकतील असा एक प्रचंड गैरविश्वास जनतेत पसरला. कुठल्याही प्रश्नावर (अगदी स्थानिकदेखील) विचार दिल्लीत बसून नेहरू करतील, आम्ही त्यांच्या कॉंग्रेसमध्ये जाऊन ठिकठिकाणच्या सत्तेत सहभागी होऊ ही वृत्ती सर्वदूर बळावली. त्याचे दुष्परिणाम आज दिसत आहेत. समाजाच्या निकडीच्या प्रश्नांचे समाजाच्या समस्येमध्ये रूपांतर करणारी संस्था असे नोकरशाहीचे वर्णन स. गो. बर्व्यांनी केलेले आहे. आणीबाणीत प्रचंड अधिकार हाती घेऊनही नोकरशाहीला योग्य तो लगाम, योग्य ते वळण लावण्यास इंदिरा गांधीही (भारतातील सर्वाधिक शक्तिशाली पंतप्रधान) अपयशीच ठरल्या असा अनुभव आहे. आणीबाणीमुळे चलनवाढ रोखली गेली, पण नक्त आर्थिक प्रगती साधली गेली का? दुर्दैवाने त्याचे उत्तर नकारार्थी मिळते.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने, समाजातील दलित वर्ग उन्नत होईल, त्याला अनेक सवलती लाभतील व तो वर्गही आम्ही संपादलेल्या आर्थिक संपत्तीचा काही प्रमाणात वाटेकरी होईल, अशी आशा तेव्हा होती. ही आशा बँकेत काम करणाऱ्या नोकरवर्गाच्या (बँक गव्हर्नरपासून ते क्लार्कपर्यंत) मनोवृत्तीत काहीच बदल न झाल्याने फोल ठरली. पर्यायाने फार मोठ्या दलितवर्गाला निराशेतच राहावे लागले. त्याचा परिणाम कॉंग्रेसला पराभवाचे फटके बसण्यात झाला.

खूप शिकूनही आपण पोटाला काहीही मिळवू शकत नाही, अशा नैराश्यात शहरी सुशिक्षित बेकारांची वाढती संख्या आहे. त्यांच्या दृष्टीने केवळ एकच प्रश्न फार मोलाचा नि महत्त्वाचा आहे. मला नोकरी मिळेल का? आज कोणीही सत्तेवर आला, तरी तो जर वाढती बेकारी हटविण्यास अपयशी ठरला तर, वेगाने वाढणाऱ्या आमच्या शहरातील सामाजिक तणाव हे अधिक तीव्र होणार आहेत. ग्रामीण भागातील अशिक्षित बेकार, ग्रामीण जीवनाचे तणाव तीव्र करतील.

आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा संदर्भही असाच काहीसा बेमालूम आहे. ज्या राष्ट्रांजवळ पेट्रोल आहे, ते देश व राष्ट्रगट पेट्रोलचे भाव वाढवून इतर देशांचे आर्थिक जीवन उद्ध्वस्त करू शकतात. ज्या राष्ट्रांजवळ तांबे आहे (चिली व संयुक्त संस्थाने) ती राष्ट्रे तांब्याचे भाव वाढवून इतर देशाच्या औद्योगिक क्षेत्रात ढवळाढवळ करू शकतात. इतर देशातील भावपातळी बदलण्याचे सामर्थ्य त्या राष्ट्राजवळ जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा असाच उपयोग इतर राष्ट्रांच्या आर्थिक नाकेबंदीसाठी पाश्चात्त्य राष्ट्रे आज करीत आहेत. हा बदल, भारताचा पंतप्रधान कोणीही असला तरी तो रोखू शकतो का?

भारताजवळ असलेली नैसर्गिक संपत्ती, आमच्यापाशी असलेले तंत्रकौशल्य व उद्योग, तंत्रज्ञ (तंत्रबळ असे म्हणता येईल) व श्रमशक्ती हे भारताच्या पंतप्रधानाचे खरे शक्तीस्रोत आहेत. त्याचबरोबर प्रचंड वेगाने वाढणारी भारताची लोकसंख्या, तिच्या वेगाने वाढणाऱ्या आर्थिक आकांक्षा, त्या पुऱ्या न झाल्याने वेगाने वाढणारे व येणारे सामाजिक तणाव व त्याच जोडीला येणारे नैराश्य हे भारताच्या पंतप्रधानास नेहमीचे आव्हान आहे.

ते पेलण्यास, नवनिर्माणास लागणारी शिस्त, निरलस चारित्र्यवान व रचनात्मक कार्य करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांचा अभाव असताना, गेल्या तीस वर्षांत कुठलाही विरोधी नेता समर्थ ठरला नाही. कुठलाही विरोधी नेता आजसुद्धा असा कितीसा समर्थ आहे? हाच आजचा यक्षप्रश्न आहे.

–शशिकांत त्रिवेदी

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक सत्तेचाळीसावा

२३ एप्रिल १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□

### मुक्काम दिल्ली

# लक्तरधुणी की चिकित्सा?

रत्नाकर महाजन

जनता लाटेत काँग्रेस वाहून गेल्यानंतरची कार्यकारिणीची पहिली बैठक. दि. १२ एप्रिल. बैठकीआधी वर्तमानपत्रांतून बऱ्याच काँग्रेसनेत्यांनी एकमेकांची लक्तरे धुतलेली. या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक ठरलेली ही बैठक. राजेंद्रप्रसाद रोडवरील काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात १० वाजता बैठक सुरू होणार. अध्यक्ष बरुआ ९–३० वाजताच आले. त्यानंतर हळूहळू यशवंतराव, वायलर रवी, राजू पूरबी मुकर्जी, ब्रह्मानंद रेड्डी वगैरे सुमारे १२० पुढारी येऊन दाखल झाले. ही खरे म्हणजे कार्यकारिणीची बैठक नव्हतीच. काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांशिवाय विविध राज्यांचे मुख्यमंत्री, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष यांना निमंत्रित म्हणून बोलावले. त्यामुळे ही मिनी ए. आय. सी. सी.च झाली. १० च्या सुमारास सगळे जमले असल्याची खात्री करून घेऊन बरुआंनी बैठक सुरू करण्याचे ठरविले. पण तेवढ्यात कुणाच्या तरी लक्षात आले, अरेच्या, बैठकीस अजून इंदिराजी आल्या नाहीत. एका गटाने त्या आल्याशिवाय बैठक सुरू करू नये, असा आग्रह धरला. पण त्या हजर राहतील असा उपाय काय? श्रीमतीजींनी आधीच आपण येणार नसल्याचे कळवलेले. पण त्यांच्या उपस्थितीविषयी काहींचा आग्रह चाललेला. मांजराच्या गळ्यात घंटा कुणी अडकवायची? शेवटी शक्कल निघाली. अध्यक्ष बरुआ, यशवंतराव आणि कमलापती त्रिपाठी या तिघांनी श्रीमतीजींच्या घरी जाऊन त्यांना घेऊन यावे. बरोबर १०–२५ ला हे तिघे बाहेर आले. पत्रकार–फोटोग्राफर्समध्ये धावपळ सुरू झाली. २०–२५ कॅमेरे लकाकले. कोणी तरी विचारले, कोठे चाललात? उत्तर आले, श्रीमती गांधींना आणायला. गाडी पोर्चमध्ये येईपर्यंत तिघेही फोटोसाठी पोज देत उभे होते. गाडी आली, त्यात बसून गर्दी बाजूला सारीत भुर्रकन निघून गेले. थेट १, सफदरजंग रोडच्या दिशेने. लग्नात रुसून बसलेल्या विहिणीप्रमाणे बाईंच्या विनवण्या केल्या. शेवटी 'कशाला, कशाला' करीत बाई येण्यास राजी झाल्या. पुढे चव्हाण आणि मंडळींची गाडी, मागे बाईंची गाडी. बरोबर १०–४३ वाजता दोन्ही गाड्या पुन्हा पोर्चमध्ये दाखल. काय होते याची उत्सुकतेने वाट पाहत १००–१५० लोक ताटकळत उभे आहेत. पत्रकार (अर्थातच) आहेत, काँग्रेस कार्यकर्ते आहेत, बघेही आहेत. या गर्दीतच खादीच्या कपड्यांतले साठीतले एक झुपकेदार शुभ्र मिशांचे गृहस्थही आहेत. त्यांच्या गळ्यात बिगुल आहे. श्रीमतीजी गाडीतून खाली उतरल्या आणि या बिगुलबहाद्दराने जोरजोरात बिगुल वाजवायला सुरुवात केली. या आवाजात आणखी टाळ्या आणि इंदिरा गांधी झिंदाबादच्या घोषणांची भर, श्रीमतीजी लग-

बगीने खाली उतरल्या. चेहरा ओढलेला. नेहमीच्या 'प्रसन्न हास्या'ची एकही रेषा नाही. कोठल्या तरी दडपणाखाली असल्यासारखा चेहरा. नुकतेच झोपेतून उठल्यासारखे (वा झोप नसल्याने) सुजलेले डोळे. सभोवारच्या गर्दीकडे दुर्लक्ष. घोषणा करणारांना हाताने खूण करून व तोंडानेही घोषणा देऊ नका म्हणून सांगितले. काही परिणाम नाही असे पाहून, लहान मुलांना गप्प बसवताना करतात तसे तोंडावर बोट ठेवून 'श्शू ऽऽ' करताहेत. पण 'जनता' कसली ऐकतेय. बिगुलाचा कर्कश आवाज ऐकायला नको म्हणून कपाळाला आठ्या व कानावर हात. तिघा बड्यांसह बैठकीच्या खोलीत प्रवेश. तर अशा तऱ्हेने एकेकाळच्या भारताच्या दुर्गामाता, काँग्रेसच्या एकमेव नेत्या श्रीमती इंदिरा गांधी यांना कार्यकारिणीने मूळ धाडले आणि एखाद्या आज्ञाधारक लेकीप्रमाणे त्या आपल्या माहेरच्या प्रेमाच्या मंडळींना भेटण्यासाठी त्या मुळाबरोबर (की मुळावर उठलेल्यांबरोबर?) आल्या. बरोबर १०-४५ ला बैठक सुरू. बैठकीच्या आधी श्रीमतीजींनी हे सारे माझ्यामुळे झाले, असे कबुल करणारे पत्र धाडले आहे. त्यामुळे बरूआंनीही बाईंना आणायला जायच्या आधी केलेल्या भाषणात श्रीमती गांधी याच आपल्या सर्वांच्या नेत्या आहेत, असे कबूल करून टाकले आहे. श्रीमतीजींच्या पत्राच्या प्रती सर्वांना वाटण्यात आल्या. त्यामुळे त्यांना बोलण्याची काही गरज राहिली नाही. श्रोत्याची भूमिका घेऊन जेवणापूर्वीच्या सत्रातली, आसाम, आंध्र व बिहार या राज्यांतली 'काँग्रेस पराभवाची चिकित्सा' त्यांनी ऐकली. जेवणासाठी बैठक तहकूब झाल्यावर पुन्हा त्याच मूडमध्ये आणि त्याच घोषणांच्या निनादात लेक लाडाची पुन्हा सासुऱ्यास रवाना! आत बैठक चालू; आमचे बाहेर हिरवळीवर रमणे-गमणे चालू. फिरता फिरता काँग्रेस कार्यकर्त्यांच्या चर्चा ऐकल्या. पराभवाची काँग्रेसी मीमांसा चालली होती. प्रत्येकजण आपल्या मतदारसंघात जनता पक्षवाल्यांनी खोटे मतदान कसे केले याच्या सुरस कथा सांगत होता. माजी रेल्वे राज्यमंत्री महंमद शफी कुरेशीही यात सामील होते. भोवती जमलेल्यांना आपल्या मतदारसंघातल्या जनता पक्षाच्या भ्रष्ट तरिक्यांच्या कथा ते सांगत होते. फिरता फिरता समजले की, त्या बिगुलवाल्या गृहस्थाची प्रत्येक ए. आय. सी. सी. व कार्यकारिणी बैठकीच्या वेळी बिगुलसह हजेरी ठरलेली असते. त्या त्या वेळचा पंतप्रधान वा काँग्रेसचा अन्य पुढारी आला की, बिगुल वाजवणे हेच त्याचे काम. गेली २५ वर्षे तो ही सेवा इमानेइतबारे बजावीत असतो. दिल्लीचाच रहिवासी आहे. बाकी मानगडींशी त्याला काही घेणे नाही. कोणी निंदा, कोणी वंदा, बिगुल वाजवणे माझा धंदा!

बैठक चालू असताना मधेच के. रघुरामैया आत गेले आणि काही वेळाने बाहेर आले. 'वासावर असलेल्यांनी' लगेच त्यांना गाठले. पण तावडतोब त्यांनी काही सांगितले नाही. नंतर समजले की, ब्रह्मानंद रेड्डींना काँग्रेस अध्यक्ष करण्याच्या प्रयत्नांचा निषेध म्हणून लोकसभेतील मुख्य प्रतोदपदाचा राजीनामा यशवंतरावांकडे सुपूर्द करण्यासाठी ते आले होते. त्यांचे म्हणणे असे की, ब्रह्मानंद रेड्डी यांनी गेल्या निवडणुकीत माझ्या पायात पाय अडकविण्याचा प्रयत्न केला. मला पाडण्यासाठी पक्षांतर्गत कारवाया केल्या. आपल्याच पक्षाचा उमेदवार पडावा म्हणून प्रयत्न करणारा पक्षाचा अध्यक्ष कसा होऊ शकतो? असा त्यांचा खडा(!)सवाल. तर ही काँग्रेसची आजची अवस्था. सबंध देशाच्या पातळीवर संघटनात्मक एकरसता आणण्याच्या गोष्टी चालू असतानाच एका राज्यातील भांडणेसुद्धा मिटवता येत नाहीत. ब्रह्मानंद रेड्डी आणि रघुरामैया दोघेही आंध्र प्रदेशचे. दोघांचेही प्रदेश काँग्रेसमध्ये परस्परविरुद्ध तुल्यबळ गट. दोघांचे भांडण दोघेही केंद्र सरकारात येण्यापूर्वीपासूनचे. झगड्यात जातीचे अंगही आहेच.

बाहेर काँग्रेसचा पराभव का झाला याची कारणमीमांसा करणारी पत्रके काँग्रेस कार्यकर्तेच वाटताहेत. त्यातले एक पत्रक तर फारच सुटसुटीत. या पत्रकात काँग्रेसच्या पराभवाचे युनिकॉजल एक्स्प्लनेशन देण्यात आलेले आहे. स्वर्गीय ढेबर यांच्या वेळेपासून काँग्रेस पक्षात ॲडहॉक समित्यांचा आजतागायत सुरू असलेला सुळसुळाट हेच काँग्रेसच्या पराभवाचे कारण आहे, असे उत्तर प्रदेशातल्या एकाने काढलेल्या या पत्रकात म्हटले आहे.

५, राजेंद्रप्रसाद रोडवरील काँग्रेस कार्यालयात प्रवेश केल्याबरोबर उजव्या हाताला पडॉल. आत काँग्रेसचे दोन राज्यसभा सदस्य' आणि अन्य तीन-चार कार्यकर्ते बसले आहेत. हे सर्व उपोषण करताहेत. प्रमुख मागणी बरुआंनी राजीनामा द्यावा ही. त्यातले खासदार तर बेमुदत उपोषण करताहेत म्हणजेच मागणी पुरी होईपर्यंत.

बैठकीच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेस अध्यक्ष बरूआ यांनी कार्यकारिणीस राजीनामा सादर केला. या दिवशीच्या बैठकीस मात्र फक्त कार्यकारिणी सदस्य – १९ लोकच हजर होते. कायम निमंत्रितही नव्हते. या बैठकीस मात्र श्रीमतीजी स्वतः होऊन, कोणी आणायला न जाता हजर. साडेसहाच्या दरम्यान सारे बाहेर यायला लागले. पण सगळ्यांचे चेहरे ओढलेले, ताणलेले. कोणी काही बोलायला तयार नाही. यशवंतरावांना कोणी तरी विचारले, क्यों नाराज़ हो गये क्या? उत्तर आले, नहीं तो, नाराज़ होनेकी क्या बात है? बाईंना काही विचारण्याचे कोणी धाडस केले नाही. पत्रकारांनी मग एकेकास गाठायला सुरुवात केली. सिद्धार्थशंकर रेंनाएकाने विचारले. त्यांनी सांगितले, पूरबी मुखर्जी अधिकृतपणे काय ते सांगतील. वसंतराव नाईक फक्त 'नमस्कार' म्हणून हसत हसत निघून गेले. स्वर्णसिंगना एकाने डायरेक्ट प्रश्न विचारला, Should we congratulate you?' सरदारजी म्हणाले, For what? आणि सटकले. बरूआंना एकाने विचारले, ब्रह्मानंद रेड्डींनी पत्रक काढण्यापूर्वी ते तुमच्याशी काही बोलले होते का? बरूआजी फणकाऱ्याने म्हणाले, 'ही नेव्हर स्पोक टू मी.' सी. सुब्रह्मण्यम, वायलर (एका पत्रकाराच्या भाषेत – वायरलेस) रवी यांच्या फंदात मात्र कोणी पडले नाही. सगळे निघून गेल्यानंतर पूरबी मुखर्जींनी आपल्या बंगाली इंग्रजीत आजचे निर्णय अधिकृतपणे सांगितले. फार जपून बोलल्या बाई. खोदून खोदून विचारलेल्या अप्रत्यक्ष प्रश्नांना टाळाटाळ करणारी उत्तरे दिली. त्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बरूआंनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी तात्पुरत्या अध्यक्षाची नेमणूक करण्यात येईल.

अध्यक्षपदाच्या पेचात ब्रह्मानंद रेड्डींनी आणखी भर घातली. रघुरामय्यांच्या भूमिकेस उत्तर म्हणून मी तात्पुरता अध्यक्ष म्हणून नेमणूक स्वीकारणार नाही. मित्रांची इच्छा असली तर, पुढच्या

ए. आय. सी. सी. अधिवेशनात ( जेव्हा केव्हा ते होईल तेव्हा ) अध्यक्षपदाची निवडणूक लढवेन. अध्यक्षपद मला नेमणुकीने नको.

नवा अध्यक्ष आल्यावर कार्यकारिणीचा राजीनामा तो स्वीकृत करील आणि आपल्या सोयीची नवी कार्यकारिणी नियुक्त करील. असा आहे हा सगळा द्राविडी प्राणायाम ! □

## विश्वासाचे राज्य

सात एप्रिलला नव्या लोकसभेचे पहिले अधिवेशन संपले. राहिलेले सर्व कामकाज पुरे करण्याच्या घाईमुळे संध्याकाळी सातपर्यंत बैठक चालली. वृत्तपत्रांवरील निर्बंध दूर करणारे विधेयक चर्चेसाठी होते. चर्चेला उत्तर देताना मंत्री अडवाणींनी एक चांगला मुद्दा मांडला. ते म्हणाले, " विश्वास हा माझ्या सरकारचा मूळ आधार आहे. आमचा जनतेवर विश्वास आहे, विरोधी पक्षावर विश्वास आहे, वृत्तपत्रांवर विश्वास आहे. या विश्वासामुळे निर्बंधांची आवश्यकता नाही. म्हणून हा कायदा आम्ही रद्द करीत आहोत. या आधीच्या सरकारचा या तिन्हींपैकी कुणावरही विश्वास नव्हता. अविश्वास, संशय हा त्या सरकारचा स्थायीभाव होता. म्हणून त्यांना निर्बंध आवश्यक वाटले. आम्हाला ते नको आहेत. म्हणून आम्ही सर्वांची सर्व स्वातंत्र्ये अबाधित करीत आहोत. " या आधी झालेल्या चर्चेत केशवराव धोंडगे यांनी ' गंमत ' केली. आपल्या विशिष्ट गंमतीशीर हैदराबादी उर्दूमिश्रित मराठी मुशीतल्या हिंदीत बोलताना ते म्हणाले, " कोणी म्हणतात, आणीबाणीला जयप्रकाशजी कारणीभूत आहेत, कोणी म्हणतात, विरोधी पक्ष आणीबाणीस जबाबदार आहेत, कोणी म्हणतात, अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ती सिन्हा यांच्यामुळे आणीबाणी आली; तर कोणी म्हणतात, कॉंग्रेस पक्षांतर्गत माजलेली लाथाळी व नेतृत्वस्पर्धा हे आणीबाणीचे कारण होते. पण अध्यक्षमहाराज, माझे मत जर विचाराल तर या आणीबाणीला राजा राममोहन रॉय हे कारणीभूत आहेत. कारण त्यांनी सतीची चाल बंद केली ! मी हे महाराष्ट्र विधानसभेतही बोललो आहे. इथेही तेच सांगतो की, सतीची चाल बंद करणारे राजा राममोहन रॉय यांच्यामुळे आणीबाणी आली होती ! " आहे की नाही बिनतोड कारणमीमांसा ?

**वृत्तपत्रीय निर्बंध दूर करण्याच्या बिलावरील चर्चेत भाग घेताना श्री. पु. ग. मावळंणकर म्हणाले, ' आणीबाणीत लादलेले हे निर्बंध दूर करण्याबद्दल श्री. अडवाणी अभिनंदनास पात्र आहेत. पण हे करीत असतानाच आणीबाणीतील जाचक निर्बंधांची तमा न बाळगता व सर्व प्रकारचा धोका पत्करून त्या वेळी ज्या ज्या वृत्तपत्रांनी आपल्या स्वातंत्र्याची ध्वजा फडकवत ठेवली त्यांचा विसर पडता कामा नये. दंड, जप्ती, कारावास हे सर्व धोके पत्करून आपले स्वातंत्र्य कायम राखणारी अशी वृत्तपत्रे म्हणजे महाराष्ट्रातील साधना, माणूस, जनता, कर्तव्य ही साप्ताहिके; तर गुजरातमधील निरीक्षक, भूमिपुत्र ही नियतकालिके, अशी अनेक आहेत. मी केवळ वानगीदाखल काही नावे घेतली. या सर्वांचे त्यांनी कसोटीच्या क्षणी दाखविलेल्या अतूट धैर्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. '** □

# जनभावनांचे वाहक म्हणून आम्ही काम करू

## मधू लिमये

जनता पक्षाजवळ तसे जायंट्स् भरपूर आहेत. काही मंत्रिमंडळात सामील झाले आहेत, तर काही बाहेर राहिले आहेत. बाहेर राहिलेले आपल्या चॉइसने राहिले आहेत. सरकारबाहेर राहून त्याच्या धोरणावर प्रभाव पाडणे आणि पक्ष–जनता संपर्क कायम राखणे अशी दुहेरी जबाबदारी अंगावर घेतलेल्या अशा जायंट्स्पैकी एक श्री. मधू लिमये. पक्षाच्या धोरणआखणीतले आणि लोकसभेतले त्यांचे स्थान निर्विवाद. म्हणून त्यांच्या मतांना महत्त्व. काही महत्त्वाच्या प्रश्नावर मधू लिमये यांची मते ' माणूस 'च्या वाचकांसाठी येथे देत आहे.

प्रश्न : जनता पक्षाचे सरकार केंद्रस्थानी आल्यावर पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी नवे सरकार व त्याचे मंत्री साधेपणाने व काटकसरीने राहतील असे सांगितले आहे. या साध्या राहणीचे नक्की स्वरूप काय असेल '

उत्तर : मंत्र्यांच्या राहणीवर सरकारचा होणारा खर्च कमी करणे हा साध्या राहणीचा अर्थ आहे. राहण्याची जागा, भत्ते, वीज, पाणी, सिक्युरिटीसाठी असणारा स्टाफ ही मंत्र्यासाठी होणाऱ्या सरकारी खर्चाची खाती असतात. यावर आजपर्यंत होणारा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल. पण यातही काही अडचणी आहेत. उदा.– जनता पक्षाने साध्या राहणीविषयी सूचना करण्यासाठी निवडलेल्या पटनायक समितीने मंत्र्याचे राहण्याचे घर ३५०० चौ. फुटांपेक्षा अधिक असू नये असे सुचविले आहे. पण सरकारकडे आज तरी अशी घरे उपलब्ध नाहीत. त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या जागा आहेत, त्यांचे काय करायचे ? असे काही व्यावहारिक मुद्दे आहेत. तथापि या सर्व अडचणींतून मार्ग काढून जनता सरकारचे मंत्री व खासदार साधेपणाने व काटकसरीने राहतील, असा मला विश्वास वाटतो.

प्रश्न : विषमता कमी करणे व जनतेच्या दैनंदिन आर्थिक समस्या सोडविण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून जनता सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात काय काय तरतुदी असाव्यात असे आपणास वाटते ?

उत्तर : जनता सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पातच काही 'मॅजिक' असेल अशी अपेक्षा करता येत नाही. मागच्या अर्थसंकल्पात ४५० कोटी रुपयांची तूट आहे. ती भरून काढून शिवाय जनहिताच्या योजनांसाठी पैसा उपलब्ध करणे हे अवघड काम आहे. शेतमालाच्या किंमतीचेच उदाहरण घ्या. सरकारने शेतकऱ्यांना गव्हाच्या पोत्यामागे १०५ रुपये भाव ठरविला आहे. हा भाव कमी आहे ही वस्तुस्थिती आहे. पण तो जर वाढवून दिला तर बाजारात सामान्य ग्राहकाला किलोमागे १० ते १५ पैसे जास्त द्यावे लागतील. समाजातील सर्व समूहांना सारखेच खूष करणे शक्य नाही. सक्तीची बचत योजना रद्द व्हावी असे जर कामगारांना वाटत असेल तर; चलनफुगवटा वाढविणाऱ्या मागण्या त्यांनी करता कामा नये. आज आहे या पेचप्रसंगातून वाट काढायची असेल तर, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविणे आणि सरकारी उद्योगक्षेत्र पुनर्घटित करणे अशी डबल स्ट्रॅटेजी आखावी लागेल. उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्याचे नियंत्रण ही एवढी महत्त्वाची गोष्ट आहे की, मला तर असे वाटते की, उपभोग्य वस्तू उद्योग या नावाचे एक स्वतंत्र खाते काढून त्यासाठी वेगळी मिनिस्ट्री नेमावी. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करून स्थिर राखणे व त्यांचा पुरवठा मुबलक ठेवणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील बंद गिरण्या पुन्हा सुरू करणे या आज जनतेच्या दोन प्रमुख मागण्या आहेत. रोजगाराची समस्याही आहे. छोटे उद्योग आणि शेती ही दोन क्षेत्रे रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देणारी आहेत. या दोन्ही क्षेत्रांत अधिक रोजगार उपलब्ध करून द्यावा लागेल. येत्या अर्थसंकल्पात या दृष्टीने आवश्यक अशा तरतुदी असतील अशी आशा करण्यास जागा आहे, असे मला वाटते.

प्रश्न : आर्थिक व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरणे हा जनता पक्षाच्या जाहीरनाम्यातला महत्त्वाचा भाग आहे. हे विकेंद्रीकरण प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण काय कार्यक्रम सुचवाल ?

उत्तर : आर्थिक विकेंद्रीकरणाचे उद्दिष्ट साधायचे असेल तर, नवीन उद्योजकांच्या छोट्या छोट्या उद्योगांना उत्तेजन द्यावे लागेल. उद्योग क्षेत्रातील आजपर्यंतच्या अतिरिक्त निर्बंधामुळे दुहेरी नुकसान झाले आहे. वेगवेगळ्या उद्योगांतील मक्तेदारी वाढली; पण त्याबरोबर उत्पादन मात्र वाढले नाही. म्हणून इथून पुढे व्यवस्थापकीय कौशल्याचे व्यवसायीकरण झाले पाहिजे. असे झाल्याने उद्योगधंद्यातली आजची घराण्यांची मक्तेदारी नाहीशी होईल. आणि छोट्या उद्योगांना प्रोत्साहन मिळेल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सार्वजनिक क्षेत्राचे शुद्धीकरण विनाविलंब हाती घ्यावे लागेल. सार्वजनिक उद्योगक्षेत्रातील भ्रष्टाचार, ढिलाई, दफ्तरदिरंगाई हे सर्व दोष काढून टाकावे लागतील.

राजकीय विकेंद्रीकरण साध्य करण्यासाठी देशातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुनरुज्जीवन करावे लागेल. एक लाखाहून अधिक लोकवस्ती असलेली देशात ११२ नगरे आहेत. यांपैकी ८६ नगरपालिका बरखास्त आहेत. ४५ महानगरपालिकांपैकी ३६ बरखास्त आहेत. कित्येक ठिकाणी तर वीस वर्षांपासून निवडणुकाच झाल्या नाहीत. या सर्व ठिकाणी ताबडतोब निवडणुका घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार त्यांना परत द्यावे लागतील. तसेच त्यांना काही घटनात्मक संरक्षणही द्यावे लागेल. भ्रष्टाचार हे अशा बरखास्तीचे कारण सांगितले जाते, पण भ्रष्टाचार थांबविण्याचा बरखास्ती हा मार्ग नव्हे. भ्रष्टाचारी माणसांना शासन करावे. त्यासाठी सबंध संस्थाच बरखास्त करणे, हा अघोरी उपाय झाला.

केंद्र–राज्य संबंध हा राजकीय विकेंद्रीकरणाचा आणखी एक हिस्सा. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारचे अधिकार घटनेत सांगितल्यापेक्षा अधिक वाढत चालले आहेत. त्यामुळे घटनेने ठरवून दिल्याच्या बाहेर केंद्र सरकारचे कार्यक्षेत्र विस्तारत चालले आहे. परिणामी प्रत्येक छोट्या स्थानिक विषयात केंद्राने हस्तक्षेप करावा अशी मागणी येते. त्यामुळे राज्याचे स्वायत्त क्षेत्र संकुचित होऊन केंद्राची सत्ता बळकट होते. हे विकेंद्रीकरणाशी विरोधी आहे.

आजच्या प्रशासकीय यंत्रणेत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट हा केंद्राची सत्ता जिल्हा पातळीवर बळकट ठेवणारा अधिकारी आहे. म्हणून जेवढ्या लवकर हे पद नष्ट होईल तितक्या लवकर विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेस सुरवात होईल. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट हे केंद्रसत्तेचे हत्यार आहे. ते रद्द केलं पाहिजे.

प्रश्न : मागील सरकारने अनेक महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत चुकीची धोरणे हट्टाने अमलात आणली. कुटुंब नियोजनाच्या बाबतीतही हेच घडले. पण कुटुंब नियोजनाची आवश्यकता जनता पक्षासही पटली आहे. आपल्या मते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग्य धोरण कोणते ? प्रत्यक्ष कार्यक्रम काय ?

उत्तर : वार्षिक उद्दिष्टांच्या आकड्यांच्या बाबतीत राज्याराज्यात चढाओढ लावून या कार्यक्रमाचा विचका करण्यात आला आहे. लोकशिक्षण, मतपरिवर्तन हाच हा कार्यक्रम यशस्वी करण्याचा खरा मार्ग आहे. त्यामुळे टार्जेट ठरविण्याचा हव्यास आधी कमी करावा लागेल. आजपर्यंत या प्रश्नाच्या बाबतीत झालेल्या गोंधळामुळे इथून पुढे या क्षेत्रातील ऐच्छिक योजनांनासुद्धा भयंकर फळे येतील, अशी भीती आहे. या कामी सरकारी यंत्रणा वा पक्षापेक्षा सामाजिक संस्था–संघटनांना अधिक काम करावे लागेल.

नसबंदीबाबत देशभर झालेल्या सक्तीमुळे या मार्गाचा अवलंब करण्यास लोक अनुत्सुक झाले आहेत. त्यामुळे आता हा मार्ग वगळून कुटुंबनियोजनाच्या दुसऱ्या मार्गावर ( जसे–ओरल काँट्रासेप्टिव्हज् ) भर द्यावा लागेल. कुटुंबनियोजन क्षेत्रात काम करणाऱ्यांना जनतेचा विश्वास अधिक प्राप्त करून घ्यावा लागेल.

प्रश्न : विरोधी पक्षाबाबत जनता पक्षाचे धोरण व दृष्टिकोन काय राहील ? या देशात द्विपक्षीय लोकशाही स्थापन करणे हे जनता पक्षाचे उद्दिष्ट आहे काय ?

उत्तर : विरोधी पक्षाविषयी आमच्या मनात सन्मानाची भावना आहे. सर्व महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर त्यांच्याशी सहकार्य करायला आम्ही तयार आहोत. पण या सहकार्याचा आधार जनाधिकार व जनस्वातंत्र्याच्या कक्षा विस्तृत करणे हा असेल. अशा कक्षा वाढविणाऱ्या सुधारणा–कायदे करण्याबाबत विरोधी पक्ष काय भूमिका

घेतो. त्यावर हे सहकार्य अवलंबून असेल. कॉंग्रेसच्या आजच्या पवित्र्याकडे पाहायचे तर ४३ वी घटनादुरुस्ती परवा संसदेत मांडली गेली, त्यावेळची त्यांची भूमिका पाहा. जनाधिकार वाढविणारीच त्यातली सर्व कलमे होती. लोकहिताच्या कलमांना आम्ही पाठिंबा देऊ असे वचन देऊन नंतर ते या पक्षाने मोडले आणि या घटनादुरुस्तीला त्यांनी विरोध केला. हाच त्यांचा पवित्रा कायम राहिला तर सहकार्य करणार तरी कसे ?

द्विपक्षीय लोकशाही ही या देशाच्या वस्तुनिष्ठ परिस्थितीत तरी एक पुस्तकी कल्पना आहे. या समाजाचे विशिष्ट असे हायरार्किकल स्वरूप लक्षात घेता ही पद्धती इथे अस्तित्वात येणे अशक्य आहे. एक सत्तारूढ पक्ष आणि एक त्यांच्या विरोधी पक्ष अशा दोन पक्षात देश व्हर्टिकली डिव्हाइडेड असणे हे द्विपक्षीय लोकशाहीचे लक्षण आहे. या निवडणुकीनंतरचे चित्र काय आहे ? उत्तरेत सगळीकडे आमचा पक्ष आणि दक्षिणेत कॉंग्रेस पक्ष, हे काही द्विपक्षीय लोकशाहीचे लक्षण नव्हे. द्विपक्षीय लोकशाही हा लोकशाहीचा काही एक पवित्र प्रकार आहे असे मला वाटत नाही. मी स्वत: तरी त्या पद्धतीचा पुरस्कर्ता नाही. आपल्या देशात ती पद्धती अनुकूलही नाही. It is typically an anglo–saxon phenomenon. इंग्लंडमध्ये सुद्धा ही पद्धती टिकली नाही. इतिहासात कोणे एके काळी, पृथ्वीच्या कोणत्या तरी काळी ही पद्धती अस्तित्वात होती, म्हणून ती आता आपल्याकडे आणण्यात काही स्वारस्य नाही. त्या पद्धतीचा लोकशाहीशी काहीही संबंध नाही.

**प्रश्न :** सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या कामात सत्ता हाती असण्याचे फायदे–तोटे काय असतात ?

**उत्तर :** परिवर्तन आणि सत्ता यांचा तसा परस्परांशी काही संबंध असतोच असे नाही. तथापि, जनता पक्षाला या निवडणुकांत जनतेने जी मते दिली आहेत ती काही परिवर्तनासाठी दिली नाहीत. जनतेच्या स्वातंत्र्य आणि अधिकारांवर आलेले आक्रमण परतवून लावून ती पुन: प्राप्त करून घेण्यासाठी म्हणून या पक्षास जनतेने मते दिली आहेत. त्यामुळे सत्तेवर असलेल्या जनता पक्षाकडून काही मूलभूत परिवर्तनाची अपेक्षा करणे बरोबर नाही. जनतेच्या संघटन व इतर स्वातंत्र्यावरील प्रतिबंध हटवणे, स्वच्छ व शुद्ध प्रशासन मिळविणे, जनतेवर नानाविध अन्याय, अत्याचार करणाऱ्यांची चौकशी करणे, जीवनावश्यक वस्तू कमी किंमतीत मुबलक मिळाव्यात, बेकारीच्या प्रश्नाची तीव्रता कमी व्हावी, यासाठी लोकांनी जनता पक्षास मते दिली आहेत. गेल्या तीस वर्षांत कुंठित झालेली अर्थव्यवस्था मोकळी करणे हेच जनता पक्षाचे काम आहे. परिवर्तनाच्या कामासाठी वेगळे सोशल फोर्सेस जनरेट करावे लागतील.

**प्रश्न :** जनता पक्षाच्या राजवटीत बिगर–संसदीय राजकारणाचे स्थान काय राहील ?

**उत्तर :** बिगर–संसदीय राजकारणाला नेहमीच स्थान राहील. इथल्या राजकारणात अजूनही स्थान नसलेल्या ग्रामीण दलित शेतमजुरांना संघटित करण्यासाठी जनता पक्ष असमर्थ ठरला तर, किंवा अन्यथाही हे काम संसदीय राजकारणात नसलेल्यांना करावे लागेल. या संघटनांना नित्य संघर्षशील राहावे लागेल. या ग्रामीण दलितांच्या संघटना बांधण्याची क्षमता असणारे नवीन फोर्सेस निर्माण व्हावे लागतील. यासाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण, विचारपरिवर्तन, आंदोलन व प्रचार आणि संघर्ष या मार्गांचा अवलंब करावा लागेल.

बिगर–संसदीय राजकारण करणाऱ्यांवर अतिरिक्त बंधने घातली जाणार नाहीत, असे पाहावे लागेल.

**प्रश्न :** जनता पक्षाच्या संघटनात्मक कामात आपली स्वत:ची काय भूमिका (रोल) राहील ?

**उत्तर :** एवढी वर्षे राजकारणात व संघर्षात राहिल्यानंतर आम्हा लोकांच्या स्वत:च्या अशा विशिष्ट प्रतिमा जनमानसात तयार झाल्या आहेत. आता आमच्या राजकारणाच्या दिशा व स्वरूप बदलले आहे. त्याला अनुकूल अशा आमच्या प्रतिमाही आम्हाला नव्याने तयार कराव्या लागतील. सरकारचे मंत्री व मंत्रिपद न घेता बाहेर राहिलेले, यांच्या वेगळ्या प्रतिमा असाव्या लागतात सत्तारूढ पक्ष सर्वस्वी सरकाराधीन होणार नाही, याची खटपट मी करीन. पक्ष व सरकार यांच्यातला सुसंवाद कायम राखणे व वाढविणे, तसेच जनभावना पक्षामार्फत सरकारपर्यंत पोचवून सरकारची धोरणे प्रभावित करणे ही लोकशाही राजवट टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेली कामे माझ्यासारखे आमचे सहकारी करतील. जनभावनांचे वाहक म्हणून आम्ही काम करू. □


जेम्स जॉईस, मार्सेल प्राऊस्ट, अल्बेर कामू, फ्रान्झ काफ्का
आंद्रे मॉलरो, अर्नेस्ट हेमिंग्वे, ऑरवेल, सॅम्युअल बेकेट

**विसाव्या शतकातील या मातब्बर लेखकांचा आणि त्यांच्या चिरंतन साहित्यकृतींचा परिचय . . . . .**

**पुढील अंकापासून**

**लेखक : जे. एन. पोंडा**

# राजनारायणबरोबर एक दिवस

जनार्दन ठाकूर । आनंदबाजार पत्रिका । ५ एप्रिल १९७७

बागपतला प्रचंड जमावानं एकदम गाडी घेरून टाकली. चोहोबाजूंनी लोकांनी फियाट गाडी झाकून टाकली. दुसऱ्याच क्षणी कल्लोळ करणाऱ्या त्या जमावातनं त्यांचं डोकं वर आलं. लगोलग लोकांनी त्यांना उचलून खांद्यावर घेतलं. जाठांच्या ह्या मुलखावरनं वाहणाऱ्या सैराट वाऱ्यानं त्यांची दाढी आणखीच विस्कटून गेली होती. त्यांची अॅल्युमिनियमची काठी एकदा वर येत होती, एकदा खाली जात होती. तगडया गावकरी लोकांच्या उंचापुऱ्या भक्कम काठचांत ती लखलखत होती. ह्या प्रचंड आरडाओरडीचा, हलकल्लोळाचा प्रत्येक क्षण त्यांना खूष करून टाकतोय् हे समजत होतं. तरी शेवटी ते ओरडलेच, 'आता पुरे. उतरवा मला. उशीर होतोय्.'

हो, हे राजनारायण. आलेयृत त्यांचे नेते चरणसिंगांच्या मतदारसंघात पहिल्या विजयी दौऱ्यावर. चरणसिंग स्वतः येऊ शकलेले नाहीत. कारण त्यांची 'तंदुस्ती' खराब आहे. त्यांचे जाठ अनुयायीच हे सांगतायृत. राजनारायणना फार घाई आहे. आधीपास्नं न ठरवून ठेवलेल्या कोणत्याही सभेला जाण्याइतकी फुरसतच नाही हातात. पण म्हणून काय झालं. लोकच त्यांना जवळजवळ ढकलतढकलतच घेऊन गेले बाजूच्या एका गल्लीत. तिथं सभेचा सगळा सरंजाम तयारच होता. राजनारायण यायचीच काय ती खोटी होती. व्यासपीठावर तर लोकांनी त्यांना उचलूनच ठेवून दिलं. कुणीतरी त्यांच्या हातात फळाच्या रसाचा एक ग्लास दिला. एक घोट घेतल्याबरोबर त्यांनी भाषणाला सुरुवात करून टाकली. लोकांच्या गोंधळात त्यांचे शब्द हरवून जात होते. पण जनतेनं जनता पार्टीला प्रचंड विजय मिळवून दिला त्याच्याचबद्दल काहीतरी ते म्हणतायत एवढं कळत होतं. 'जनता सरकार दिलेली आश्वासनं पाळतं का नाही, हे बघायचं काम आता तुमचंच आहे. पण आता मला जाऊ द्या. आज रात्रीच मला कानपूरची गाडी पकडायला हवी. उत्तरप्रदेशचं सरकार कोसळून पडेल म्हणून काही करायला हवं. समजलं ना?'

लोकांनी एका आवाजात 'हो' म्हटलं. 'समजलं, नेताजी.'

राजनारायण व्यासपीठावरनं उतरायला लागले तर, हजारो लोकांचा असा काही आविर्भाव की, आम्ही काही तुम्हाला जाऊ देणार नाही. सगळ्यांना त्यांच्या गळ्यात हार घालायचे होते. 'मग तुम्ही जा. आमचं काही म्हणणं नाही.' त्यांच्या खांद्यावर हारांचा डोंगर साचला. चेहरासुद्धा दिसेना.

सरतेशेवटी घेतली सुटका करून कशीबशी. पण लोकांचा प्रवाह त्यांच्या मागोमाग चालला.

बरौत म्हंजे चरणसिंगांच्या मतदारसंघाच्या अगदी मधोमध. संध्याकाळी तिथं एक मोठी सभा होणार म्हणून आधीच ठरलेलं आहे. अन् साडेचार तर आत्ताच झालेयृत. पाचेक किलोमीटर जाईपर्यंतच प्रत्येक ठिकाणी आम्हाला थांबावं लागतंय्. लोक आम्हाला घेरूनच टाकतायृत. राजनारायण म्हणाले, 'आम्ही जनतेची निराशा करू शकत नाही.' लोकांच्या हातनं स्वतःची सुटका करून घेताना वारंवार त्यांना म्हणावं लागत होतं, 'मला रात्रीची गाडी पकडायला हवी. उत्तरप्रदेशचं सरकार पाडायला हवं ना!'

थेट पहाटेपास्नं लोकांची रीघ लागलेलीच आहे. दिल्लीच्या ८ विश्वंभर दास रोडवर लोकांच्या गोंगाटनंच 'नेताजीं'ची झोप मोडते. भल्या सकाळीच त्यांना धाव घ्यायला लागली होती. चरणसिंगांच्या घरी महत्त्वाची बोलणी करण्याकरता. परतून पाहयलं तर, आणखी एक प्रचंड 'सेना' घरी वाट बघत बसलीय् त्यांचीच.

प्रत्येकच खोली लोकांनी भरलेली. तरुण, म्हातारे–सगळे आहेत. लहानलहान टोळकी करून आपापसांत बोलत बसलेयृत भसाडया आवाजात. कुणीकुणी चारपाईवर पसरलेयृत. वरांडा, बैठकखाना, परस–सगळीकडं चारपाया टाकलेल्या. एकसुद्धा चारपाई रिकामी नाही. ह्या घरी दरवाजा सगळ्यांनाच उघडा. 'नेताजीं'ची स्वतःची खोलीसुद्धा लोकांनी दाट भरलेली. कुणी चटईवर बैठक मारलेली, कुणी उंची चारपाईवर, कुणी उभेच. माणसांच्या ह्या गर्दीतच आणखी राम, कृष्ण, गणपती अन् आणखी कैक देवदेवतांची पण गर्दी. ह्या सगळ्यांतच परत हार घातलेला राममनोहर लोहियांचा फोटो. भितीवरच्या खुंटीला लावलेले मळके कपडे अन् त्याच्याच खाली कलाबूतवाले हार. विजयाच्या दिवसापास्नं एव्हाना त्यांचा डोंगरच बनून गेलेला.

मी खोलीत पाऊल टाकल्याटाकल्या 'मंत्रीजीं'नो पुकारा केला: 'मिठाई लाव!' ('मंत्रीजी' हे नाव राजनारायणना स्वतःला पण फार पसंत पडलंय्.) घरात मिठाई कायमच असते. आता डोक्याला नेहमीची हिरवी पट्टी नाही. दाढी कुरवाळतायृत एकसारखी. धोतर गुडघ्याच्याही वर करून त्यांनी पाय टेबलावर ठेवले. शेजारी एक अधिकारी उभा होता. हातात फायली घेऊन. त्याला जरा अस्वस्थ झालं. पण तरी तो तसाच उभा राहचला. एकापाठोपाठ एक लोक यायला लागले. बहुतेकांच्या हातात लेखी अर्ज. हे सगळेच कॉंग्रेस सरकारची 'शिकार' झालेयृत. हे सगळे अर्ज योग्य त्या खात्याकडं, अधिकाऱ्यांच्याकडं पाठवून द्यायला राजनारायणना अजिबात कंटाळा नाही एकदा मला विचारलं, 'काय म्हणत असता तुम्ही? छोटा लाट ना?' मी म्हणालो, 'लेफ्टनंट गव्हर्नर.' लगेच त्यांनी अर्जावर काहीतरी खरडलं. म्हणाले, 'जा, हे द्या त्यांना.' इसम मोठा खूष होऊन निघून गेला. ह्याच्या आधी कुणा मंत्र्याकडं जाणं कधीच इतकी सोपी गोष्ट नव्हती. अन् ह्याच्या आधी कुणा मंत्र्यानं इतक्या झटपट अर्जांचा फडशा पण पाडला नसेल कधी.

लौकरच वेळ झालो. त्यांच्याच शब्दांत 'विश्‍व वार्ताहर संमेलना'ला जायची. परदेशी वार्ताहरांनी त्यांना आमंत्रण दिलंय् अशोक हॉटेलमध्ये यायचं. अन् त्यामुळं ते साहजिकच थोडेसे चंचल झालेय्‌त. 'तिकडं जाऊन यतो. मग लगेचच बरौतला रवाना होता येईल, तुम्ही थांबा इथंच.'

मी थांबलो. तिथं जमलेल्या लोकांची बोलणी ऐकायला लागलो. प्रत्येकच जण छोटेखानी राजनारायण आहे. पार खेडवळ. एकजण माझ्याकडं आला. त्याच्या हातात इंग्रजी दैनिकाचं एक पान. त्यातल्या एका ठिकाणी बोट ठेवून म्हणाला, 'मला वाचता येत नाही. काय लिहिलंय् सांगता का जरा?' मी पाह्यलं तर हा गृहस्थ जे दाखवत होता, ते होतं बिहारचे एम.पी. रामविलास रासवानबद्दल एक फीचर. रामविलास सबंध देशात सगळ्यांत जास्ती मतं मिळवून निवडून आले होते. वर्तमानपत्रात काय आलंय् ते सांगितल्यावर मी त्याच्याशी गप्पा सुरू केल्या.

इसम बिहारमधल्या सरण जिल्ह्यातला एक गरीब शेतकरी आहे. निवडणुकीच्या सबंध काळात तो गावोगाव फिरला होता. खांद्यावर एक लहानसा नांगर. सायकलवर टांग मारायची न् दिवसभरात दहादहा बाराबारा गावं घ्यायची. जनता पक्षाच्या निशाणीची चालतीबोलती जाहिरातच झाला होता तो. नाव जोगेंद्रसिंग.

मोठ्या अभिमानानं त्यानं सांगितलं, 'एक दिवस रात्री छापऱ्याला राजनारायणची सभा होती. फिरतफिरत मी तिथं येऊन ठेपलो. नेताजींनी मला मिठी मारली अन् व्यासपीठावर उचलून घेतलं.'

छापऱ्याच्या एका गावाहून आता तो एक अर्ज घेऊन इथं आलाय्. आपल्या गावाजवळच्या राज्य सरकारच्या मालकीच्या ट्यूबवेलचं चॅनेल मोडून गेलंय्, त्याच्याबद्दल जनता सरकारनं काहीतरी करावं.

दिल्लीच्या स्टेशनवर उतरल्यावर तो पार बावरूनच गेला होता. आपल्या टापूतल्या एम. पी. ला कुठं गाठता येईल, काहीच माहिती नाही. 'पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण काहीच ओळखीचं नाही. बाबू जगजीवनरामच्या घरी जा म्हणून सांगितलं एकानं. पण तिथं मला फाटकातनं आतपण जाऊ देईनात. फूटपाथवरच रात्र काढली. दुसऱ्या दिवशी संसद भवनाच्या फाटकासमोर जाऊन उभा राहिलो. दिसेल आपला एम. पी. आत जाताना कदाचित. पण कशाचं काय हो! तेव्हा मग बिहारचा एक दयाळू माणूस मला त्यांच्याकडं घेऊन गेला. आता आलोय् मी इथं. बघू या नेताजी आमच्या गांवाकरता काय करतात ते.'

कॉंग्रेस जशी वागली होती, जनता सरकार पण अगदी तसंच वागलं तर? तर लोक काय करतील? मुळीसुद्धा न अडखळता त्यानं उत्तर दिलं, 'पलट देंगे!'

शेवटी जेव्हा नेताजी परतले, तेव्हासुद्धा त्यांच्याभोवती लोकांची ही गर्दी. छापऱ्याचा तो इसम धक्काबुक्की करत वाट काढत पुढं गेला. त्यानं राजनारायणना विचारलं, 'ओळख आहे का आपली?'

पण गेल्या काही दिवसात शेकडो लोकांनी राजनारायणना हाच प्रश्न विचारला असेल. त्या इसमानं परत तोच प्रश्न केला. तेव्हा राजनारायण थोडेसे चिडूनच म्हणाले, 'आप हमारे बाप है!'

इसम भयंकर भडकला. 'अच्छा! म्हंजे एवढ्यातच विसरून गेलात तर? अन् त्या दिवशी रात्री खांद्यावर नांगर घेतलेल्या त्या माणसाला तुम्ही कडकडून मिठी मारली होतीत ते?'

लगेच राजनारायणना सगळं आठवलं. त्यांनी त्या माणसाला जवळ ओढलं. म्हणाले, 'अरे! या, या! आपण फोटो काढू या एक.'

एक फोटोग्राफर राजनारायणची वाटच बघत होता. त्याला त्यांनी बोलवून घेतलं. फोटो काढून झाला.

मग राजनारायणनी घराच्या आत हाक दिली. 'जेवण तयार आहे का?'

'हो' म्हणून उत्तर आलं.

म्हणाले, 'माझं जेवण ह्या माझ्या दोस्ताला द्या.'

मग ते दुसऱ्या लोकांच्याकडं वळले. एका स्मार्ट दिसणाऱ्या तरुणाला त्यांनी आलिंगन दिलं. सगळ्यांना सांगितलं, 'हिसार जेलमधे हा माझा डॉक्टर होता. ह्यानंच माझा जीव वाचवलान्.'

आम्हाला बरौतला पोचायलाच तीन तास उशीर होऊन गेला होता. वाटेतल्या एका सभेतनं दुसऱ्या सभेकडं जाताना राजनारायण दरवेळी लोकांना म्हणतायत, 'आता जाऊ दे मला. रात्रीची नवाची गाडी पकडायला हवी. उत्तर प्रदेश सरकार पडावं, असं वाटत का नाही तुम्हाला?'

जेव्हा जेव्हा लोक त्यांना वेढून टाकतात, तेव्हा तेव्हा त्यांचे अंगरक्षक फार भांबावून जातात. त्यांना राजनारायणच्या बरोबर राहता येत नाही अन् लोकांना पण मंत्र्यांपासनं लांब ठेवता येत नाही. एकजण म्हणाला, 'गेली दहा वर्षं मी इतके मंत्री पाह्यले, पण हे असं होताना कधी पाह्यलं नव्हतं. भलतंच काही होऊन गेलं तर, माझा काही इलाज आहे का?' जनता मंत्र्यांची अन् तीसुद्धा राजनारायणसारख्या जनता मंत्र्याची — चालचलणूक अंगवळणी पडायला त्याला बराच वेळ लागणाराय्.

बरौतच्या कॉलेजमधे चहाचा कार्यक्रम घाईघाईनं उरकून मंत्र्यांना जावं लागलं. कॉलेजच्या मैदानावर प्राध्यापकांच्याबरोबर एक ग्रूप-फोटो काढून घ्यायला सगळ्यांच्या मधोमध बसले होते ते. नजर होती काळं कापड डोक्यावरनं ओढून घेतलेल्या फोटोग्राफरकडं. फोटोग्राफर फारच वेळ लावत होता. धीर गमावून राजनारायण त्याला म्हणाले, 'क्या बाबा, आदम के जमाने का कॅमेरा ले आये हो?' कॅमेरामननं 'रेडी?' म्हटल्याबरोबर त्याला वेडावून दाखवत राजनारायण म्हणाले, 'रेडी! चल आटप लौकर.'

सभेच्या जागी पोचल्यावर तर मंत्री जनसागरात हरवूनच गेल्यासारखे झाले. सरतेशेवटी व्यासपीठावर चढल्यावर मात्र भाषणाला सुरुवात करायला त्यांनी अजिबात वेळ लावला नाही. 'राम, लक्ष्मण, भरत न् शत्रुघ्न ह्यांना किती मुलं होती? प्रत्येकाला फक्त दोनच मुलं होती ना?'

लोकांनी एका आवाजात उत्तर दिलं, 'हो, दोनच.'

राजनारायण बोलत गेले, 'म्हणूनच मी नियोजित कुटुंबाच्या बाजूनं आहे. नसबंदीच्या बाजूनं मी नाही.'

दाट जनतेनं टाळ्यांचा कडकडाट केला.

तिथल्या धर्मशाळेत कार्यकर्त्यांची बैठक ठेवली होती. तिथं पोचेपर्यंत संध्याकाळ उलटून रात्र झाली होती. अत्यंत तारस्वरात एक

तरुण सोशॅलिस्ट खबरदारीचा इशारा देऊन म्हणाला, 'जो माणसं पूर्वी कांग्रेसच्या पुढाऱ्यांच्याभोवती गोळा व्हायची, तीच आता जनता मंत्र्यांच्याभोवती गर्दी करतायत.'

हा तरुण मोठं तिखट भाषण देत चालला होता अन् राजनारायण टेबलाशी बसून चहाचे घुटके घेत होते. मधेच एकदम ते म्हणाले, 'ह्या सगळ्या 'खानदानी गुलामां'ना मी पुरता ओळखून आहे. ही मंडळी ब्रिटिशांच्या वेळी होती, कांग्रेसच्या कारकीर्दीत पण होती, अन् आतापण आहेतच. डॉक्टर लोहिया नेहमीच आपल्याला ह्या धंदेवाईक भाटांच्यापासनं सावध राहायला सांगायचे. हीच मंडळी सरकारला नासवतात. पण तुम्ही काळजी करू नका. ह्या लोकांना आम्ही आमच्यापास्नं शंभर मैलांतसुद्धा फिरकू देणार नाही.'

काही माणसं अर्ज द्यायला पुढं झाली. शाळा, कॉलेज, दवाखाना–नाना गोष्टींकरता अर्ज. राजनारायण त्यांना म्हणाले, 'काय हवं असेल ते सगळं घेऊन दिल्लीला या. तिथं सगळ्यांच्याकरता माझ्या घराची दारं सताड उघडी आहेत. तुम्ही केव्हाही आलात तरी चालेल.'

राजनारायण जिथं जिथं गेले, तिथं तिथं लोक त्यांच्या मागोमाग गेलेच. राजनारायण म्हणत होते, आमचे नेते चरणसिंगांनी मला सांगितलंय् की काही तरी नियम पाळून चाला. स्वतःला पार मोकळं सोडत जाऊ नका. नाही तर तब्येत टिकायची नाही. पण मला काही हे जमत नाही. जमतंय् तितके दिवस माझं हे असचं. मग तब्येत जेव्हा केव्हा ढासळून पडायची तेव्हा पडू दे. लोकांची सेवाच घडली नाही तर जगण्यात तरी काय अर्थ आहे ?'

आम्ही दिल्लीला परतलो तेव्हा अंगरक्षक म्हणाला, ह्यांचं हे असंच चालू राहलं तर आम्ही पार खलास होऊन जाणार !'

—अनुवादक : अशोक शहाणे

---

# चक्रम्चक्री (१०)

# फ्रेश अँगल

दीर्घस्मृति विश्वनाथ

फार गडबडीत दिसता, काय 'चक्रम्चक्री' लिहिता आहात की काय ?

होय ना, आठवडाभर 'मनोहर' साप्ताहिकासाठी लेख लिहिण्यात घालवला; आता 'चक्रम्चक्री' गळ्याशी आलीय्.

काय 'मनोहर' मध्ये तुमचा लेख ! हे म्हणजे कॉकटेल पार्टीची सुरुवात 'वदनी कवल'ने करावी, तसं झालं.

मीदेखील पहिल्यांदा भांबावूनच गेलो. म्हटलं 'मनोहर'चे संपादक बदलले हे खरं, पण इतका बदल ! तेव्हा संपादक म्हणाले, "आम्ही हत्याकांडाबाबत विशेषांक काढतो आहोत. त्यासाठी 'फ्रेश अँगल'नं लिहिलेला तुमचा लेख हवा." मी म्हणालो की, आता फ्रेश अँगल उरलाय् कुठं. आतापर्यंत सदतीस साप्ताहिकांनी विशेषांक काढले. तशी ते म्हणाले, 'म्हणून तर सांगतोय् लिहायला. आमचं पाठलेक कसं ते तुम्हाला माहिताय. त्यांना पी. सी. एच्. च्या भटुऱ्यासारखा लेख हवा. गरमागरम, नवीन, फुगलेला–मग पोकळ असला तरी हरकत नाही.' आली आफत ! पण डरो नही ! आपल्याला फ्रेश अँगल सप्लाय करणारी खूप माणसं आहेत.

पहिल्यांदा गेलो, 'स्त्री' मासिकाच्या प्रख्यात लेखिका, कुटुंब – लेखमाला – कर्त्या पुरोगामी विचारवंत आशा मुंडले यांच्याकडे ! विचार केला की, कुटुंबासारख्या चावून चोथा झालेल्या विषयावर, त्याच विषयाचा आयुष्यभर रवंथ करीत आलेल्या 'स्त्री' मासिकात, इतक्या 'फ्रेश अँगल'नं असे तेजस्वी विचार मांडणारी विदुषी 'हत्याकांडा'सारख्या जबरदस्त विषयावर अडतिसावा अँगल पुरवल्याखेरीज राहणार नाही.

माझा विचार अचूक ठरला. भेटीत माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना त्या म्हणाल्या–'तुमच्या लक्षात या जक्कलविषयीची एक गोष्ट आलेली दिसत नाही !'

मी माझा अपराध खालच्या मानेने कबूल केला आणि पुटपुटलो, 'ती कोणती ?'

'अहो, त्याचा फोटोग्राफीचा धंदा आहे ना. मग तो धंदा सोडून त्याला या खून–खराबीत शिरायला काय झालं ?'

'तोच तर खरा प्रश्न आहे.'

'मी पूर्वीपासून हेच म्हणत आले. आपल्याकडे व्यवसायाशी निष्ठा नाही. मागे मी काय लिहिलं होतं माहीत आहे ना ? जो विषय स्वतःला आवडत नाही, ज्याचा तो फारसा अभ्यास करीत नाही असा विषय कॉलेजात शिकवण्याने प्राध्यापक नीतीचा भंग करतोय्, असे आपला समाज मुळी मानतच नाही. आपली नीती सतत लिंग–संबंधांशी घोटाळत राहिलेली आहे. जे प्राध्यापकांचं तेच फोटोग्राफर्सचं ! इतके खून केले म्हणतात त्या जक्कलनं, पण एखाद्या प्रेताचा तरी काढलाय् का फोटो त्यानं. व्यवसायनिष्ठा पक्केपणी स्थिरावत नाही तोपर्यंत हे प्रकार एक तर असेच चालणार, आणि दुसरं तर त्यांचा शोधही लागणार नाही.'

'वाह्व्वा आशाताई, हा तुम्ही अडतिसाव्वाच काय पण चांगला एकशे अडतिसाव्वा अँगल पुरवलाय की !' मी खूश होऊन म्हणालो.

'थांबा, आणखी एक सांगते,' बाईंच्या डोळ्यांतली चमक त्यांच्या मेंदूत चाललेल्या वादळात चमकणाऱ्या विजेसारखी दिसत होती. 'खुनासारखं निखळ इहवादी कृत्य करतानादेखील त्या खुन्यांनी देवघरात कुंकू कशाला हो पसरून ठेवावं ?'

'तुम्हाला त्यात काही क्ल्यू दिसतो की काय ?' 'मिस् मार्पल'ला आठवीत मी म्हणालो.

'खुनाच्या शोधात मला इंटरेस्ट नाही' मला फटकरावीत बाई बोलल्या. एक बुद्धिवादी समाज – निरीक्षक म्हणून मी बोलत्येय्. समाजात व्यवसाय – निष्ठा नसली, तरी मी ती बाणवलेली आहे.'

'मग समाज – मनावर धर्माचा किती पगडा आहे, हे त्या कुंकू पसरण्यातून दिसतं, असं का म्हणायचंय् तुम्हाला.'

'अलबत.'

हा शब्द मी स्त्रियांच्या तोंडाच, पण

पुरुषांच्याही तोंडून फारसा ऐकला नव्हता. म्हणून मी थोडा दचकलोच. पण एरवीच्या स्त्रियांशी आपण बोलत नसून 'स्त्री' मासिकात विचारवंत ठरविलेल्या बाईंशी बोलत आहो हे ध्यानात येताच माझ्या प्रतिगामी दचकण्यात मला 'कससं'च झालं.

'खुन्यांनी देवघरात पिंजर पसरली याचे दोन अर्थ होतात', स्त्री-मासिकातल्या आपल्या सूत्रबद्ध लेखमालेची आठवण देत बाई बोलू लागल्या, 'एक तर खुन्यांची देवाधर्मावर श्रद्धा आहे; आणि दुसरा म्हणजे समाजाची देवाधर्मावर श्रद्धा असल्याने आपण देवाला कुंकू वाहिले तर, आपली खरी 'मोटिव्ह' आपण दडवू शकू असा त्यांचा विश्वास आहे.'

'मार्मिक विवेचन आहे तुमचं.'

'पण कोणताही अर्थ घेतला तरी धर्मश्रद्धा आणि खून यांचा संबंध नाही.' दोन सुट्टे दोर हातात घोळवीत जादुगारानं प्रेक्षकांना नकळत त्याची गाठ घालावी तसं बाई म्हणाल्या.

'म्हणून मी म्हणते, की हे धर्माचं स्तोम आपण बंद केलं पाहिजे. भूमिपूजन, प्रार्थना या गोष्टी संपल्या पाहिजेत.' आपला सूर सापडल्यावर गवयाची तान चढत जाते असं म्हणतात, तसाच बाईंचा सूर चढत गेला.

इतक्यात दुपारच्या ५॥ चा ठोका पडला. बरोबर ६ वाजता स्त्री-सखी मंडळात 'निर्लेप तव्यावर थालिपीठ लावणे' या निखळ ऐहिक विषयावर सप्रयोग व्याख्यान होतें. तेव्हा थालिपीठाकडे पाहण्याचा 'फ्रेश अँगल' ठरवायचा असल्याने बाईंनी मला निरोप दिला.

## नंदू साने

बाईंची मुलाखत झाल्यावर काम संपलंच की तुमचं.

मलाही तसंच वाटलं. मॅटर थोडं कमी पडत होतं; पण मनोहर-स्टाईलनं त्यात 'फिरकी', 'अफलातून', 'आयला', 'पिळलं', 'बोअर केलं', 'ट्रिंग, ट्रिंग' असे शब्द खानावळीतल्या वांग्याच्या भाजीत शेवग्याच्या शेंगा भरपूर पेरतात त्याप्रमाणे पेरले असते की पुरेसं खळगुट झालं असतं. पण तिथं तर साला आम्ही 'मार खातो' -काम जमलं की नाही मनोहर-छाप वाक्य ?

मग काम केलं तुम्ही ?

विचार केला की आपला दोस्त आनंद साने याची मदत घ्यावी. तो या बाबतीत जंक्शन माणूस ! त्याच्याकडे गेलो; म्हणालो 'हत्याकांडा' विषयी लेख लिहिला आहे, तो 'मनोहर'च्या स्टँडर्डचा करून दे.' तो म्हणाला, 'तोंडीच सांग काय लेख आहे तो. आम्ही 'मनोहर'चे लेखक; आम्हाला 'मनोहर' खेरीज काहीही वाचायला बंदी आहे. स्टाईल बिघडते.' मी त्याला गोषवारा सांगत असतानाच त्याचा चेहरा नापसंतीच्या सुरकुत्या दाखवू लागला.

'भावड्या, आयला, वैताग आला तुझं ऐकताना. अरे, हा अँगल आमच्या पब्लिकला काय उपयोगी. साला. गुलाबी रंगाचा सैल शर्ट अन् खाली हिरव्या रंगाची तंग पँट घालून आणि कमरेला निळा उपरण्यासारखा कपडा गुंडाळून फिरक्या ताणणाऱ्या तरुणाईला साबणाच्या फुग्यासारखं काहीतरी उडवायला हवं म्हणून 'मनोहर' काढतात. त्यात व्यवसायनिष्ठा आणि इहवाद कुठला आणतोस. त्यात काही अर्थ नाही. त्यापेक्षा 'रुपेरी लॉलीपॉप' लिहिणाऱ्या हिमायनीला फोन जुळव.'

जुळवला फोन. म्हटलं 'हिमे, लाडे...'

असं म्हणालात तुम्ही ?

नाही हो, आपलं 'मनोहर-स्टाईल'चं बोललो. तर म्हणालो, 'हिमे, अडचणीत आहे बघ. हत्याकांडाविषयी फ्रेश अँगल पाहिजे.'

मग काय म्हणाल्या हिमायनी देवी ?

म्हणाल्या, 'पूर्वी मी काय लिहिलं होतं 'वाटतं असं जगावं' मध्ये आठवतं ना ?'

आठवत होतं तुम्हाला ?

तर, उगीच नाही मी 'दीर्घस्मृति !' बाईंनी लिहिलं होतं, 'कुणापुढे मांड्या ××× पडावं असं मला वाटत नाही.' मी सांगितलं त्यांना ते. त्या म्हणाल्या, 'हा घ्या फ्रेश अँगल. जे मला जिवंतपणी आवडत नाही, ते कुणाला गळा दाबल्या अवस्थेत आवडेल असं वाटत नाही.'

मी विचार केला की, हा फ्रेश अँगल 'मनोहर'ला परवडला तरी आपल्याला परवडणार नाही. नंदूला म्हटलं 'गड्या, हरलो आपण.'

## फ्रेश अँगल

त्यानंतर नंदू मला बराच वेळ काही काही ऐकवत होता. त्याच्या म्हणण्याचा सारांश असा की, हत्याकांडाविषयीचे बहुतेक सर्व अँगल्स आता हाताळून झाले आहेत. सेक्स-अँगलचा बेळगावी मासिकांनी केव्हाच चुथडा केला आहे; मिस्टरी अँगल, दक्षता, अपराध, पाठलाग, हेर, धनंजय या मासिकांनी घोळवून विद्रूप केला आहे; गुन्हेगारांच्या दृष्टिकोनातून श्री, हीरा वगैरे साप्ताहिकांनी लिहिले आहे; सोशल अँगल केसरी, सकाळ, तरुण भारत या दैनिकांनी वापरून टाकला आहे; हिंदुत्वनिष्ठ दृष्टिकोणावर सोबत, काळ यांचा कब्जा आहे; 'खुनाचे बळी चित्पावनच का' या विषयावरसुद्धा 'चित्पावन' साप्ताहिकाने लिहिले आहे. आपण खुन्यांबरोबर होतो असं कल्पून लिहिलेले लेख आहेत; आपण पोलिसांबरोबर शोध घेत आहोत असं समजून काहींनी लिहिलं आहे; आरोपींच्या नातेवाईकांच्या मुलाखती आहेत; इतकेच काय पण या सर्व प्रकरणावर शैलजा राजे-भा. द. खेर ही जोडगोळी कादंबरी सुद्धा लिहित आहे. आता फक्त वर्तमानपत्रांची कात्रणं निरनिराळ्या रीतीनं जुळवून लेख सजवायचे इतकंच उरलं आहे. ते मी आणि भिडे करणार आहोत.

मी नंदूला म्हटलं, 'मित्रा, मनोहरवाले चांगला मोबदला देतात असं ऐकलं आहे. हा अंक पहिल्याच दिवशी आणि एकट्या पुण्यात साठ हजार खपणार असा त्यांचा अंदाज आहे. लागू दे मला देखील ही लॉटरी.'

नंदू जरा वेळ स्तब्ध बसला. मग एकदम किंचाळला, 'भावड्या, साल्या लकी आहेस. मला एक अफलातून आयडिया सुचली आहे. चल, लिही.'

मी लिहू लागलो.

★ ★ ★

'ट्रिंग-ट्रिंग-'

संध्याकाळ, साडेसातची वेळ. थंडीचे दिवस. बाहेर सन्नाटा. ककीचा फोन की काय ? (ककी म्हणजे शंकरशेट रोडवरच्या कुंटणखान्यातली. पुण्यातले कुंटणखाने हे निराळेच जग. लेकिन उसके बारेमें फिर कभी.)

मी मुंबईहून टॅक्सीने आलेला. दुपारी साडेबारा ते साडेतीन बाखियाशी मुलाखत. त्याने ऑफर केलेला उंची परदेशी चिरूट तोंडात. 'न्यूज वीक' चाळीत सुस्त कोचावर.

'ट्रिंग-ट्रिंग-'

पुन: फोनची बेल. समोरच्या ग्लासात

सोनेरी फेस. नारंगने दोन महिन्यांपूर्वी दिलेली बाटली. ककी थांबता दिसत नाही. महत्त्वाची टिप असणार.

* * *

' नंदू, अरे हे काय सांगतोयस. असं काही माझ्याबाबतीत झालेलं नाही. लोकांना काय वाटेल ? '

' तू गप रे भावड्या. माझ्या बाबतीत तरी असं कधी झालंय् का ? ते सगळेच्यांना माहिताय्–पब्लिकला, संपादकांना आणि आपल्यालासुद्धा. पण तरुणाईला असा मेक–बिलीव्ह लागतो. हिंदी पिक्चरमध्ये नसतो का–तसा. '

नंदू सांगत होता, मी लिहित होतो. होता होता शेवट आला.

* * *

गावाबाहेरच्या विरळ वस्तीतला तो अलिशान बंगला. विजेचा प्रकाश ओसंडतोय्. मी दबल्या पावलांनी खिडकीशी. आयला, आवाज कसला ! काही नाही काडी मोडली पायाखाली. भोवती मिट्ट शांतता. लोंबकळलो. आत पाहिले. चार तंग पँट आणि हाफ शर्ट घातलेली माणसे हातमोजे असलेल्या हातात उघडे सुरे घेऊन जमिनीवर पडलेल्या माणसाकडे पाहत होती. मी क्षणभर विचार केला. खिडकी उघडून आत जाऊन त्या चारांचा खिमा करणं मला सहज शक्य होतं. आठवड्यापूर्वीच ककीच्या खोलीत मी आणि जॉननं भायसाब कंपनीच्या दहा जणांचा राडा केला होता.

इतक्यात माझ्या मानेवर कुणाचा तरी हात पडला आणि त्याच वेळी विचित्र सुगंध माझ्या नाकात शिरला. गनिमांनी बागेत वॉच ठेवला होता तर. ' राजा, गडी बुलंद दिसतो. ' आवाज आला. माझ्याविषयीच. " साल्या; कोणाला शाबूत ठेवायचं नाही. दाब गळा. "

त्यानंतर मोटर सायकलवरून आणून त्यांनी मला कोणत्या तरी विहिरीत टाकले असावे. कारण अजून मी पाण्याच्या तळाशीच आहे.

' नंद्या, अरे ही भंकस कोण वाचेल ?" .

' तूं नेऊन तर दे. नाही पब्लिकनं डोक्यावर घेतला, तर ' मनोहर 'मध्ये लिहिणार नाही. '

पण माझा काही धीर नाही झाला. म्हटलं उगाच कशाला नंदूच्या पोटावर पाय ! □

# काँग्रेसचा पराभव

## प्रामाणिक आत्मपरीक्षण नाही

वा. दा. रानडे

लोकसभा निवडणुकीतील पराभवाचा विचार करण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीची चार दिवसांची बैठक नव्या दिल्लीत झाली; पण त्यातील चर्चा व निर्णय पाहिले म्हणजे, पराभवापासून काँग्रेस खरोखर काही शिकली आहे असे वाटत नाही. पक्षाच्या इतिहासात ही एवढी महत्त्वाची घटना की, खास खुले अधिवेशन भरवून त्याचा विचार व्हावयास हवा. पण तशी आवश्यकता कोणाला वाटत असल्याचे दिसत नाही. पराभवाची चर्चा टाळायची, ते शक्य नसेल तर, निदान लांबणीवर टाकायची अशीच वृत्ती प्रथमपासून दिसून आली. निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर तातडीने सर्व राज्यांचे अहवाल मागवून आठ पंधरा दिवसांतच कार्यकारिणी व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठका घ्यावयास हव्या होत्या. पण कार्यकारिणीचीच बैठक तीन आठवड्यांनी भरली. आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक १३ मेस म्हणजे पावणेदोन महिन्यांनी भरणार आहे.

निवडणुकीपूर्वी 'इंदिरा इज इंडिया' अशी भाटगिरी करणाऱ्या काँग्रेस अध्यक्ष देवकांत बारुआंनी निकालानंतर एकदम पवित्रा बदलला आणि इंदिरा गांधी व त्यांच्या गटाला विरोध करण्याची भूमिका घेतली, तर पराभवाला कोण किती जबाबदार याची वाटणी नको, कार्यकारिणीच्या सर्वच सभासदांनी राजीनामे द्यावेत असा आग्रह इंदिरा गांधींनी धरला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीचीही त्यांच्या गटाने मागणी केली. अखेर कार्यकारिणीने प्रथम पराभवाच्या कारणांचा विचार करून नंतर कार्यकारिणीच्या राजीनाम्याबाबत निर्णय घ्यावा असे ठरले.

बैठकीपूर्वी काँग्रेस अध्यक्षांना पाठविलेल्या पत्रात इंदिरा गांधींनी पराभवाची सर्व जबाबदारी पत्करली. आपला कोणताही गट नाही व आपणाला कोणास पाठीशी घालायचे नाही असे त्यात म्हटले होते. पराभवाबाबत श्रीमती गांधींच्या प्रथमपासूनच्या प्रतिक्रिया लक्षात घेण्यासारख्या आहेत. आपला व आपल्या पक्षाचा पराभव स्पष्ट दिसत असता त्यांनी तो खिलाडूपणाने मान्य न करता, संपूर्ण निकाल लागेपर्यंत आपली प्रतिक्रियाच व्यक्त केली नाही. ' लोकांचा सामुदायिक निर्णय मी मान्य करते ' असे त्यांच्या २२ मार्चच्या पहिल्या निवेदनात म्हटले होते. त्यानंतर २८ मार्चला मावळत्या काँग्रेस खासदारांपुढे केलेल्या भाषणात त्या म्हणाल्या, निवडणुकीची चुकीची वेळ, आणीबाणीतील अतिरेकांमुळे काही भागात जनतेच्या भावना दुखावल्या त्याचा अंदाज घेण्यात आलेले अपयश, आणीबाणीत आणि आणीबाणीपूर्वी आपण जे साध्य केले त्याकडे जनतेचे लक्ष वेधण्यात संघटनेकडून प्रयत्नांचा अभाव ही उत्तर भारतातील काँग्रेसच्या पराभवाची मुख्य कारणे आहेत. पराभवाचा दोष मुख्यतः माझ्याकडेच येतो. परिस्थिती आणि तिला कारण झालेल्या घडामोडी मला अधिक चांगल्या प्रकारे कळायला हव्या होत्या. पराभूत काँग्रेस जनांनी ( त्यात माझाही समावेश होतो. ) आता आघाडीवर काम करू नये. माजी खासदारांनी निराश होऊ नये. पक्षात आणखी फूट पाडण्याचा संभव आहे. पण ते फायद्याचेच ठरेल. कारण कठीण परिस्थितीत काँग्रेसची सत्वपरीक्षा होत आहे. नवा सत्तारूढ पक्ष व त्याच्या सरकारवर टीका करण्याची घाई करू नका. जनतेचा कौल आपण पूर्णपणे आणि प्रामाणिकपणे मान्य केला पाहिजे. टीकेसाठी

☆ ☆
दुसऱ्या आवृत्तीच्या
वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे
☆ ☆

टीका करणे उपयुक्त ठरणार नाही. कॉंग्रेसने सत्ता गमावली असली तरी, तिचा धुव्वा उडालेला नाही किंवा ती नष्ट झालेली नाही. लोकांचे शिक्षण करणे, त्यांच्या दुखावलेल्या मनाला शांत करणे, चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याबद्दल त्यांची खात्री पटवून त्यांचे प्रेम पुनः संपादन करणे हे कॉंग्रेसजनांपुढील प्राथमिक कार्य आहे.

यानंतर ६ एप्रिलला एका मुलाखतीत इंदिरा गांधी म्हणाल्या, 'कॉंग्रेसने सत्ता गमावली याचे कारण विरोधकांनी केलेला प्रचार. पराभवाबद्दल संजय गांधी आणि बन्सीलाल यांना दोष देता येणार नाही.'

ही सर्व निवेदने आणि भाषणे वाचली तर, आणीबाणी पुकारण्याचा आपला निर्णय चुकीचा होता असे इंदिरा गांधींनी कोठेही म्हटलेले नाही असे दिसून येईल. कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी राजीनामे द्यावे या त्यांच्या मागणीमागे पराभवाबद्दल केवळ आपल्यालाच जबाबदार धरले जाऊ नये, किंवा बन्सीलाल,शुक्ल वगैरे संजयच्या निष्ठावंत सहकाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाऊ नये हा होता. कॉंग्रेस अध्यक्षांना पाठविलेल्या पत्रात इंदिरा गांधींनी पराभवाची सर्व जबाबदारी पत्करली त्यामागेही हाच उद्देश होता. पण तो पूर्णतः साध्य झाला नाही. पराभवाला आपणही जबाबदार आहोत हे कार्यकारिणीने मान्य केले. बारुआंनी अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला. पण बन्सीलाल, शुक्ल यांच्याविरुद्ध कारवाई केली जाऊ नये हा त्यांचा उद्देश मात्र साध्य झाला नाही. बन्सीलालना कॉंग्रेसमधून सहा वर्षे काढून टाकण्यात आले व शुक्ल यांची कानउघाडणी करण्याचे कार्यकारिणीने ठरविले. पण मंत्रिमंडळात संजयचे प्रस्थ वाढविणारा हा जो गट निर्माण झाला होता त्याला मुख्यतः इंदिरा गांधीच जबाबदार होत्या. त्यांच्याविरुद्ध काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. तशी सूचना करण्याचे धैर्यही कोणाला झाले नाही. पराभूत झाल्या तरी इंदिरा गांधींचा प्रभाव पक्षावर अजून कायम आहे हेच त्यातून सूचित होते. ओम मेहता यांच्याविरुद्ध कारवाई का नाही याचाही समाधानकारक उलगडा करण्यात आलेला नाही. पंतप्रधानपद गमावून इंदिरा गांधींनी आपल्या कृतीचे परिणाम स्वीकारले आहेत, त्यांच्याविरुद्ध आणखी कारवाईची गरज नाही, असे कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष स्वर्णसिंग यांनी सांगितले; पण पंतप्रधानपद गमावणे ही जनतेने दिलेली शिक्षा आहे. न्यायाच्या दृष्टीने बन्सीलाल, शुक्ल यांच्याविरुद्ध कारवाईच्या आधी श्रीमती गांधींविरुद्ध काही कारवाई व्हावयास हवी होती. 'आणीबाणीच्या निर्णयापासून माझे सर्व चुकत गेले, या चुका पुनः घडणार नाहीत अशी स्पष्ट कबुली व आश्वासन इंदिरा गांधींनी द्यायला हवे. या चुका सुधारल्याचे आणि पक्षात लोकशाही कार्यपद्धती आल्याचे प्रत्यक्ष कृतीतून दिसले पाहिजे. पराभूत कॉंग्रेसजनांनी आघाडीवर राहून काम करू नये असे इंदिरा गांधींनी सांगितले, मग पराभूत स्वर्णसिंगांना हंगामी अध्यक्ष का निवडले? विरोधकांच्या वाटेल तशा प्रचारामुळे कॉंग्रेसचा पराभव झाला या इंदिरा गांधींच्या विधानावरून प्रामाणिक आत्मपरीक्षण करण्याची त्यांची तयारी दिसत नाही. अशा वृत्तीने पक्ष सुधारणार नाही. आणीबाणी पुकारण्याचा निर्णय चुकीचा व लोकशाहीविरोधी होता हे कॉंग्रेसकारिणीनेही मान्य केलेले नाही. कॉंग्रेसचे कार्य जुन्याच पद्धतीने चालणार असेल तर, तिला जनतेत पुनः स्थान मिळणे कठीण आहे.

□

# सोलकढी

## □ पूर्वी काय केले आणि नंतर काय केले, तेही पाहा

आणीबाणीच्या काळात काय केले, हा माणसांच्या आणि संस्थांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करायचा एक नवा निकष आता उपलब्ध झाला आहे. (खरे म्हणजे वर्तमान लोकमानसासंबंधीचे अनंतरावांचे हे निदान फार मोलाचे आहे. अगदी 'समाज प्रबोधन पत्रिके'त किंवा 'बियाँड फ्रेंडशिप'च्या अंकात शोभण्याइतके. ते असो. 'सोलकढी'-सारख्या सदरात आले म्हणून त्याची अभिजात उपेक्षा होऊ नये, एवढीच इच्छा आहे.) या निकषाच्या आधारे माणसांची आणि संस्थांची एक नवी श्रेणीव्यवस्था लावण्यात येईल, असे दिसते. ते तसे योग्य, उचित आणि स्वाभाविकच होय. तथापि ती व्यवस्था वज्रलेप होऊ नये. नाही तर, आणीबाणीच्या काळात काय केले हा प्रश्न, स्वातंत्र्यलढ्यात तुम्ही कोठे होता, या काँग्रेसवाल्यांच्या प्रश्नाइतकाच बोथट होऊन जाईल.

म्हणून म्हणतो, या नव्या निकषाच्या बरोबरीने, आणीबाणीच्या पूर्वी काय केले आणि नंतर काय केले, याचेही भान मूल्यमापनात ठेवायला हवे. या गोष्टीची जाणीव विशेष तीव्रतेने झाली याला तात्कालिक कारण म्हणजे रविवार दि. २७ मार्चच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मधला गोविंदराव तळवलकरांचा 'अधिकारशाहीची समाप्ती' हा लेख आणि त्या लेखाला अनुलक्षून रविवार दि. ३ एप्रिलच्या 'महाराष्ट्र टाईम्स'-मध्ये 'दैनिक मराठवाड्या'चे संपादक अनंतराव भालेराव यांनी लिहिलेले पत्र.

'अधिकारशाहीची समाप्ती' या लेखाचे स्वरूप त्याच्या नावावरून सहज लक्षात येईल. इंदिरा गांधींच्या पिसाट अधिकारशाहीची, शहाण्या जबाबदारीने समाप्ती घडवून आणणाऱ्या सामान्य मतदारांचे मनमोकळे कौतुक जसे या लेखात आहे, तशी स्वातंत्र्याच्या या संग्रामात आपण व्यक्तिशः उणे पडलो याबद्दल वाचकांची मनमोकळी माफीसुद्धा लेखकाने मागितली आहे. आपल्या पत्रात, अनंतराव भालेकरांनी तळवलकरांची समजूत घालायचा प्रयत्न केला आहे. अनंतराव (भालेराव) लिहितात : 'तुमच्या मनातील खंत तुम्ही मोकळेपणाने सांगून टाकलीत, इथपर्यंत ठीक झाले. परंतु तुम्ही एवढे मनाला लावून घ्यावे, असे मला वाटत नाही...सगळ्या पत्रकार मित्रांच्या वतीनेच मी तुरुंगात होतो. तुमची उणीव मी भरून काढू शकणार नाही; परंतु हजेरी तरी लावू शकेन. व्यक्तिशः व 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये तुम्ही संपादक झाल्यापासून महाराष्ट्राची व मराठी पत्रकारितेची फार मोलाची सेवा केली आहे. तुमचे भरपूर ऋण आहे. आज जे काही घडून आले आहे. व येते आहे, त्यात तुमचा वाटा फार मोठा आहे. महाराष्ट्र त्याबद्दल तुमचा नेहमीच कृतज्ञ राहील... तुम्हाला विनंती की, मनात कसलीही बोच ठेवू नका. तुम्ही भरपूर देन दिली आहे. मर्यादा तुम्हालाच आहेत आणि इतरांना नाहीत, असे नाही. तुमची धारदार, शैलीदार लेखणी व आरसपानी दृष्टी आमच्यापैकी पुष्कळांजवळ नाही.'

अनंतरावांच्या उपरिनिर्दिष्ट पत्रातला, 'मी तुरुंगात होतो,' हा तपशील, 'आणि'च्या ठिकाणी योजलेले 'व', आणि तळवलकरांच्या दृष्टीचे 'आरसपानी' हे वर्णन, या तीन गोष्टी सोडल्या तर, ते पत्र आमचेच वाटावे असे आहे. मुंबईच्या आणि 'माणूस'च्या अनंतरावांना गोविंदराव तळवलकरांबद्दल जे वाटते तेच औरंगाबादेच्या व 'मराठवाड्या'च्या अनंतरावांनाही वाटते, हे पाहून संतोष जाहला.

तळवलकरांनी या गोष्टीचा विचार करावा. 'विचार करावा' असे नेहमी दुसऱ्यांना सांगणाऱ्या तळवलकरांनाच 'विचार करावा' असे सांगताना आम्हाला मोठी मौजचमौज वाटते.

आणि साक्षात 'महाराष्ट्र टाईम्स'च्या तळवलकरांना 'विचार करावा' असे जो सांगू शकतो तो उभ्या महाराष्ट्राला तसे सांगायला संकोचत नसतो. आता या स्फुटाच्या दुसऱ्या परिच्छेदातले पहिले वाक्य पुन्हा वाचावे, शक्य झाल्यास 'आरसपानी दृष्टीने' वाचावे, अशी वाचकांना विनंती आहे.

—अनंतराव



कलकत्ता आणि कोल्हापूर

# येथे मस्तान मिळतील

तारा पंडित

'मस्तान' कोण हे जाणून घ्यायचं असेल तर कलकत्त्याला या. एखादा शाळकरी मुलगासुद्धा तुम्हाला त्याची ओळख करून देईल. एका विद्यार्थ्याने तर आपल्या चित्राचा विषयच निवडला होता The Mastans असा. त्याने चित्रात तीन मस्तान दाखवले होते–हॉटेलात बसलेले. समोर चहाचे कप. बेलबॉटम नि लालनिळ्या पट्ट्यांचे बाहीकाले बनियन घातलेले, केसांची दाट झुलपं मानेवर–कपाळावर उतरलेली, क्वचित एखाद्याला मिशा, तोंडात सिगरेट, डोळ्यावर रंगीत चष्मे आणि चेहऱ्यावर अरेरावी–असा एकंदर अवतार. त्या लहान मुलाच्या चित्रातले मस्तानदेखील हुबेहूब भासत होते. ह्या मस्तानांचा आपापल्या पाड्यात केवढा विलक्षण प्रभाव बघा. पान आणि सिगरेट यावर त्यांना खर्च करावाच लागत नाही. फक्त आवाज चढवला की, काम होतं. पाड्यातल्या सगळ्या लोकांवर त्यांचं बारीक लक्ष असतं. फूटपाथवर माल विकणारांना त्यांचा वचक असतो. अडल्या वेळी मात्र त्यांचा अवश्य उपयोग होतो. विशेषतः प्रेतयात्रेचे प्रसंगी. त्यावेळी 'बोल हरि' असं ओरडत जायला माणसं हवी असतात. हे काम मस्तान खुषीने करतात. कारण काम संपताच नोट आणि दारूच्या बाटल्या त्यांच्या हाती बिनबोभाट येतात.

भानगडी असतील तिथे मस्तान असणारच. जातिभेद, प्रांतभेद, धर्मभेद, कोणत्याही कारणाने दंगेधोपे निर्माण झाले की, मस्तानांना आपलं कसब दाखवायला वाव मिळतो. ह्यापेक्षाही मस्तानांचा खरा उपयोग होतो तो निवडणुकांचे वेळी. निवडणूक जाहीर होताच मस्तानांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. प्रचारमोहिमेचे काम सर्वात महत्त्वाचे ज्या पार्टीने त्यांना आश्रय दिला असेल त्यांच्यातर्फे निवडणूक प्रचार सुरू होतो. प्रचार–सभा आयोजित करणे, त्या सभेसाठी आजूबाजूच्या खेड्यांमधून ट्रक भरभरून लोकांना घेऊन येणे ही जबाबदारी मस्तानांची. गावभर जागा सापडेल तिथे गर्दीने पोस्टर्स चिकटवणे हे काम मस्तानांचे. सभेत टाळ्या वाजविणे, नेत्याचा जयजयकार करणे ह्यात पुढाकार मस्तानांचा. भाषण आटोपताच नेत्यांना परत जाण्याची घाई असते, तेव्हा त्यांच्या परतीच्या प्रवासाचा सर्व बंदोबस्त करणारेही मस्तानच असतात. थोडक्यात घाम फुटेपर्यंत मस्तान काम करतात. पैशाची पिशवी दाखवून चुटकी वाजवताच मस्तान सेवेला हजर झालेच म्हणून समजा. हे आमच्या कॉंग्रेसवाल्या नेत्यांनी अचूक ओळखले होते. म्हणून तर मस्तानांशी त्यांची हातमिळवणी झाली होती. ती तब्बल तीस वर्षे सातत्याने टिकून राहिली. धंदा कसा भरभराटीला आला होता. कॉंग्रेसच्या राजवटीत पोसल्या गेलेल्या ह्या पोळांना साहजिकच माज चढला. त्यांची झोपटपट्टी सुटली. दर्जा वाढला. त्यांना राजकारणात रस वाटू लागला आणि मग हळूहळू त्यांच्याही हातांना सत्तेच्या रेशमी धाग्यांचा सुखद स्पर्श होऊ लागला. कायदादेखील ह्या मस्तानांच्या हातात कसा नि केव्हा जाऊन बसला, कळलंच नाही. कॉंग्रेस नेत्यांशी तर त्यांची इतकी गट्टी जमली की, एकावाचून दुसऱ्याचे पान देखील हलेना. एवढेच काय, पण कधीमधी त्यांच्यात अदलाबदल झाल्याचेही लोकाच्या लक्षात आले म्हणतात.

मस्तानाच्या अंगी दोन गुण प्रामुख्याने असावे लागतात. हवा कुणीकडे वाहते याचा अंदाज घेणे आणि स्वतःचा खिसा सतत चाचपून पाहणे. मस्तानांचे ठोकताळे सहसा चुकत नाहीत आणि सहसा उपाशी राहण्याची पाळीही त्यांचेवर येत नाही. पण–

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकांनी मस्तानांचे पारडेच फिरवून टाकले! वास्तविक आपल्या आश्रयदात्या कॉंग्रेस नेत्यांसाठी काय करायचे त्यांनी शिल्लक ठेवले होते? 'तुम्ही काहीही करा. यश आपलेच आहे,' असे त्यांना मोठ्या विश्वासाने सांगण्यात आले होते. आणि खिशात कोंबल्या जाणाऱ्या नोटांच्या बंडलांची स्वप्ने बघत ते हिरीरीने कामाला लागले होते. त्यांनी रस्तोरस्ती पोस्टर्सची तोरणे लावली. भितींवर इतक्या दाटीवाटीने पोस्टर्स चिकटवली की त्यातले एक अक्षरही सरळ वाचता येऊ नये. आरडाओरडा करून नेत्यांच्या नावाचे जयघोष करीत गल्लीबोळांतून हिंडले. लाथा मारून सभेला माणसे पकडून आणली. सभेला येण्याबद्दल त्यांना पैसे वाटण्याचे स्वयंसेवकाचे काम केले. एवढेच काय, पण खुद्द निवडणुकीचे दिवशी मतदारांना ऐनवेळी मतदान करण्याची बंदी केली. तुमचे मतदान अगोदरच आटोपले आहे असे सांगून त्यांना रांगेतून चक्क हाकलून लावले. आणि इतरही जेवढी बदमाषी करता येईल तेवढी करण्याचा प्रयत्न केला. अगदी तंतोतंत वरिष्ठांच्या हुकुमानुसार. पण हाय रे दैवा!

जनता पक्ष विजयी ठरला आणि मस्तानांच्या अपेक्षांची राखरांगोळी झाली. 'कठीण समय येता...' अशी शोचनीय दशा वाटचाला आली. ज्यांच्यासाठी एवढा खटाटोप मांडला त्यांनीच आपटी खाल्ल्यामुळे नंतरच्या विजयोन्मादाच्या सोहळ्याला मस्तानांना मुकावे लागले. म्हणून तर, हवा तेवढा आनंदाचा जल्लोष ऐकू आलाच नाही. विजय–घोषणा आकाशाला भिडल्याच नाहीत. फटाके वाजले पण मोजकेच. ह्याचे कारण मस्तानांची सर्वस्वी अनुपस्थिती हे तर नव्हते?

ज्या कॉंग्रेस नेत्यांना सतत ३० वर्षे साथ केली त्यांनी देखील आता दगा दिला. ते मस्तानांना ओळखेनासे झाले. भरभराटीला आलेल्या धंद्यात जबरदस्त खोट आली. आता पुढे काय हा प्रश्न मस्तानांसमोर मगरीसारखा आ वासून उभा आहे.

पण मोशाय, मस्तान काय असा डगमगणारा प्राणी आहे होय? स्वार्थ त्याच्या हाडांना चिकटलेला आहे. तो असा डोक्यावर हात देऊन बसणार नाही. परिस्थितीतून मार्ग काढण्याचा मस्तानांचा विचार आहे. त्यासाठी त्यांनी आता बदललेल्या प्रवाहाच्या दिशेने पोहण्यास सुरुवात केली आहे. लवकरच सारे स्थिरस्थावर होईल अशी त्यांना आशा वाटते. पण त्याचबरोबर काळजीही वाटते की, जनता पार्टीने आपल्या ध्येयानुसार खरेच वागायचे ठरवले तर मात्र आपल्या धंद्याला अर्थच उरणार नाही. ह्या क्षणी राहून राहून तीस वर्षांच्या त्या सुवर्णकाळाचे त्यांना स्मरण होत आहे. त्यातच ते वेळ घालवीत आहेत. एरवी ते अगदी रिकामे आहेत. कुणाला गरज असल्यास कळवावे. कलकत्त्यात मस्तान नक्कीच मिळतील. □

# कोल्हापुरात काँग्रेस घोड्यामुळे उधळली !

प्रकाश मिसाळ

कोल्हापुरातील या वेळच्या लोकसभेच्या निवडणूक निकालाने भारतात खळबळ माजवून टाकली. काँग्रेसचा उमेदवार अवघ्या २२४ मतांनी पडला. फेरमतमोजणीत तो १६५ मतांनी पडला. काँग्रेस या निकालाविरुद्ध हायकोर्टात गेली आहे. कारण गेल्या निवडणुका आणि विशेषतः लोकसभेच्या निवडणुका काँग्रेसने स्वतःच्या बळावर आणि प्रतिष्ठेवर विरोधकांवर हजारो मतांनी मात करून मिळविल्या आहेत.

काँग्रेसचा उमेदवार हा तसा काही लेचापेचा नव्हता. पूर्वी त्याने दोन वेळा खासदारकी मिळविली होती. यापूर्वीची सहा वर्षे मध्यवर्ती सरकारचे मागासवर्गीय आयुक्त म्हणून काम पाहिले होते. निवडणुकीची सर्व तंत्रे माहीत असलेला हा उमेदवार काँग्रेसतर्फे निवडणुकीच्या रिंगणात उतरला होता.

विरोधकांत शेतकरी–कामगार पक्ष जोरात होता. त्यांना जनता पक्षाचा पाठिंबा मिळाला होता. केवळ लोकसभेचा मतदारसंघ शेतकरी–कामगार पक्षाला पेलवणे अशक्य होते. तरीही सर्वशक्तीनिशी काँग्रेसविरोधकांचा एकमुखी पाठिंबा मिळवून शेतकरी–कामगार पक्षाचे कार्यकर्तेही जिद्दीने आणि हिरीरीने उभे ठाकले होते.

आणि या दुरंगी दिसणाऱ्या अटीतटीच्या लढतीत तिसराही एक उमेदवार कार्य करण्याच्या ईर्षेने आणि उमेदीने उभा राहिला. शामराव माळी त्याचं नाव. हा काँग्रेसचा आणि शे. का. चा पूर्वीचा कार्यकर्ता. थोडा काळ शेतकरी–कामगार पक्षाच्या एका शाखेचे चिटणीसपदही भोगलेलं. थोडासा फटकळ तोंडाचा, खरं तर एकूण वादळी व्यक्तिमत्त्व. आयुष्यात याचं कुणाशीही पटलं नाही. घरची गरिबी खूप अन् राजकारणाचा नादही तसाच मोठा. स्वतःला 'हायलेव्हलचा भिकारी' म्हणवून घेतो.

या निवडणुकीत स्वतःला मिळणाऱ्या मताचं गणितही तसंच मोठं आणि विचित्र. स्वतः जातीने माळी त्यामुळं या मतदारसंघातील साठ हजार माळ्यांची मते आपल्या खिशात अशा दांडगा विश्वास. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यापासून ते अनेक छोट्या-मोठ्या चळवळीत असल्याने या प्रवाहातील असंख्य ओळखी आणि लागेबांधे यातून पंधरा ते वीस हजार मते मिळतील असा आत्मविश्वास आणि कोल्हापूर हे नेहमी रणधुमाळीचे क्षेत्र असल्याने काँग्रेस व विरोधकांत मारामारी, भांडणतंटे व कुरबुरी सुरू झाल्या की, सर्वसाधारण जनता त्या दोघांनाही मते देणार नाही व ती अंदाजे पंचवीस ते तीस हजार मते आपणालाच मिळतील; आणि मित्राच्या मित्रांकडून, नातेवाईकांच्या मित्रांकडून असा तोंडी प्रचार होऊन तो एक पंचवीस–तीस हजारांचा गोतावळा आपल्या बाजूने, असा आणखीन् एक हिशोब. 'घोडा' हे निवडणूक चिन्ह घेताना त्याने हुशारी दाखविली, कारण काही ग्रामीण भागात घोडा हे दैवत मानले जाते. आणि गाय-वासरू काय आणि घोडा काय ही तर, दोन्ही जनावरेच. त्यामुळे गाय-वासराला मत दिले काय आणि घोड्याला मत दिले काय–फरक काय पडणार! त्यामुळे अज्ञानी जनतेकडून मिळणारी पंधरा ते वीस हजार मते असा जवळेजवळ दीड-दोन लाखाचा अंदाज बांधून दिल्लीच्या खासदारकीची शेख-महंमदी स्वप्ने तो पाहत होता.

आणि समजा, दीड-दोन लाख मते पडली नाहीत, तरीही त्याचे गणित होतेच. फॉर्म भरल्यापासून ते निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत 'एक महिना खासदार'! जिल्हाधिकारी, डी. एस. पी. अशी अनेक राजपत्रित अधिकाऱ्यांपासून ते सामान्य सनदी नोकराकडून देखील व्ही. आय. पी. ची ट्रीटमेंट सन्मानाची वागणूक आणि चांगल्या लोकांच्या ओळखी ही देखील एक जमेची बाजू.

शामरावांचा तर्क न पटण्यासारखा नाही – 'अरे, आम्हा लोकांना प्रसिद्धी कोण देतो? सत्तेशी जे जोडलेले त्यांच्या जोड्यांना देखील किंमत. आणि आज जे लोक पुढारी बनून राहिलेत ते विद्वान, त्यागी, देशभक्त थोडेच आहेत? कुणाच्या तरी कृपेने दिल्लीचे मनसबदार झालेत. म्हणून केवळ पाचशे रुपयांत जागतिक प्रसिद्धी मिळविण्याचे तंत्र, तर हे पाचशे रुपये निवडणुकीत अनामत रक्कम भरली की, आकाशवाणी मतदारसंघात उभे असलेल्या उमेदवाराचे नाव माहितीसाठी वारंवार घेते. टी. व्ही. वर पण प्रसिद्धी, व्हॉईस ऑफ अमेरिका, बी. बी. सी. वर देखील प्रसिद्धी. टॉईम्स ऑफ इंडियापासून ते कोल्हापूरच्या पुढारी, सत्यवादी या स्थानिक वर्तमानपत्रांपर्यंत प्रसिद्धीच प्रसिद्धी. आणि निवडणुकीत पडले तरी प्रसिद्धी.

तर हे पाचशे रुपये मित्रांच्या कडून मिळवून भरले. आणि आता तर या निवडणुकीला भारतात खास प्रसिद्धी. कारण काँग्रेसचा हुकमी उमेदवार केवळ १६५ मतांनी पडला. आणि तोही केवळ शामरावांच्यामुळे. मतपत्रिकेची रचना अशा प्रकारे होती की, सुरुवातीस शे. का. ची गाडी, नंतर गाय–वासरू आणि त्यानंतर शामरावचा घोडा. त्यामुळे वरच्या जनावरावर शिक्का मारला काय किंवा खालच्या जनावरावर शिक्का मारला की झालं, असा अज्ञानी मतदारांचा होरा त्यानं अचूक बांधला असावा. या घोड्याने गडहिंग्लजमध्ये ४७५ मते मिळविली. कारण याच्या अगोदरच्या विधानसभेच्या निवडणुकीत एका लोकप्रिय बंडखोर काँग्रेस कार्यकर्त्याची घोडा हीच निशाणी होती. त्यामुळे तोच घोडा आताही मत मिळवून गेला; आणि या जनावरांच्या गोंधळात शामराव माळीने दीड – दोन लाखाच्या अंदाजापैकी प्रत्यक्षात २१०१ हुकमी मते मिळविली. आणि काँग्रेसची खासदारकी या घोड्याच्या रेसमध्ये गमाविली गेली. आता शामराव अंदाज घेतोय की, त्याला मते कुणी कुणी दिली. कारण जो–तो भेटेल तो सांगतो की, शामराव, आमचे मत तुम्हालाच. आणि ही तोंडी मते जवळजवळ दीड लाखाच्या आसपास असावीत.

शामरावला दोन वेळा जेवणाची पंचाईत. पण कुणाकडे अवास्तव मागणी नाही. दत्तक प्रकरणात सारे कोल्हापूर शहाजीराजांच्या विरुद्ध उलटले, पण शामराव होता राजांच्या बाजूने. कुठल्या लोभापायी नव्हे. पण तत्त्वासाठी ! हवे असते तर पैसे कमाविले असते. राजकारणात आश्वासनांची खैरात करून स्वतःचा इमलाही उठविला असता; पण हा भिकारी व कफल्लकच राहिला. फाटक्या तोंडाचा आणि रिकाम्या खिशाचा. पण जीवनाशी अत्यंत प्रामाणिक. तत्त्वासाठी उलटचा प्रवाहात पोहायलाही तयार. निवडणूक म्हणजे त्याच्या शब्दात सांगायचे झाले तर – पैशाचा खेळ, वारेमाप उधळण, प्रचाराचा गदारोळ, व्याख्यानबाजीला उधाण, आश्वासनांची खैरात, सहानुभूतीचा उमाळा, मधाचे बोट पण अखेर उपाशी पोट ! त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात विचारले असता तो पुढे म्हणाला, 'भारताचा नागरिक म्हणून स्वतःचा उमेदवारी हक्क दाखविण्याच्या केवळ ईर्षेने. लोकसभेसाठी उभा राहिलो.' अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या या निष्ठावंत सैनिकाने, झुंजार कार्यकर्त्याने स्वातंत्र्यचळवळीपासून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत हिरीरीने भाग घेतला. तुरुंगवास भोगला, दारिद्र्याचे असंख्य चटके सहन केले. पण त्याबद्दल दुःख नाही. त्याची काही अशी खाशी तत्त्वे ठरली नाहीत अन् त्यासाठी तो तडकून उठतो. मोठ्यांना तो खोटे मोठेपण द्यायला तयार नसतो; याच त्याच्या तत्त्वासाठी त्याने गोळवलकर गुरुजी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शंकराचार्य, आचार्य अत्रे यांना खडसावून जाब विचारला होता. हा तावूनसुलाखून निघालेला कार्यकर्ता कार्यकर्ताच राहिला, पुढारी बनला नाही. इलेक्शनमध्ये हा गरिबीची लढाई हरला. पण घोडा या त्याच्या इमानी जनावराने मात्र गाय–वासराला अस्मान दाखविलं. सध्या शामराव 'दलित कैवारी' नावाचे मासिक चालवितोय.

शामराव जसा विक्षिप्त वल्ली, कफल्लक, सामाजिक कार्यकर्ता, चिल्लर संपादक तसाच रसिक पुढारी. त्याला नंबर एक पुढाऱ्याप्रमाणे खास शौक आहेत. पिण्याचा नादही तसाच मोठा. आणि मग त्याची अविश्रांत बडबडही खूप -- पण मुद्दा सोडून नाही. इलेक्शनच्या या काळात त्याने हातभट्टी सोडली असे तो म्हणतो. कारण या एक महिना खासदारकीच्या काळात ते पिणे त्याच्या डिग्निटीला शोभले नसते. म्हणून त्याने या काळात पोलीस अधिकाऱ्यांनाही ठासून सांगितले होते की, निवडणुकीतील दंगेधोपे टाळावयाचे असतील तर कोल्हापुरातील ठसका केन्द्रावर ( ? ) बंदी आणा !

इलेक्शन हरले' तरीही महाराज अजून त्याच कैफात आहेत. राष्ट्रीय पातळीवरची प्रसिद्धी, एक महिन्याची खासदारकी हे सारे आता संपले आहे. पण त्याच्या दृष्टीने मात्र नाही. तो पंतप्रधान मोरारजीभाईंना भेटण्याचा प्रयत्न करतोय. राष्ट्राध्यक्षाची निवडणूकही लढविण्याची त्याची तयारी असल्यास नवल नाही.

□


## नवे संवत्सर ! नवा आविष्कार !!

सर्वोत्कृष्ट कलात्मक साड्यांचा नवा नजराणा घेऊन उभी आहे विश्वसनीय–

**'अनुपमा'**

सर्वोत्कृष्ट प्युअर सिलकन फॅन्सी साड्यांची नववर्षानिमित्त खरेदी अनुपमामध्येच करा

विवाह समारंभातील लग्नाच्या बस्त्याबरोबरच आहेरासाठी / रुखवतासाठी / देण्याघेण्यासाठी व मानापानासाठी

**अनुपमाची सप्रेम भेट**

| | | | |
|---|---|---|---|
| ५००० | रुपये | खरेदीवर | पाणी तापवणेचा बंब |
| ४००० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचे मोठे पिंप |
| ३००० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचे ताट, २ वाट्या, तांब्या |
| २००० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचे ताट-तांब्या |
| १५०० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचे ताट-वाटी |
| १००० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचा साखरेचा डबा |
| ८०० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचे चहाचे भांडे |
| ५०० | ,, | ,, | एक समई |
| २५० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचा एक ग्लास |
| १०० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचा एक पेला |
| ५० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलची एक वाटी |
| ३० | ,, | ,, | स्टेनलेसस्टीलचा एक चमचा |

**तरी या सुवर्णसंधीचा आमच्या ग्राहकांनी व हितचिंतकांनी अवश्य फायदा घ्यावा.**

# अनुपमा

**कुंटे चौक, ६३० सदाशिव पेठ, फडतरे चौकाजवळ, पुणे ३०.**

टीप :–साडीचा रंग गेल्यास साडी बदलून मिळेल.

कथा

# ॲबॉर्शन

देवीदास देशमुख

शहरात भला मोठा तंबू उभारण्याचं काम सुरू होतं. दोन–चार दिवसांत सर्कस सुरू होणार होती. सर्कशीतील सर्व लवाजमा शहरात दाखल झाला होता. दररोज शहरातून सर्कसची जाहिरात लाऊडस्पीकरवरून केली जात होती.

सायकलिंग करणाऱ्या अन् झुला खेळणाऱ्या तरुणींची छायाचित्रे शहराच्या सर्व भागांत लटकावली होती.

तरीही चंद्रकला आज बेचैन दिसत होती. काहीतरी तिला सांगायचंय. पण ती लपवत आहे असं स्पष्ट जाणवत होतं. सर्कसमध्ये काम करणाऱ्या अनेक तरुणींपैकी चंद्रकला एक देखणी मुलगी होती. फिकट लाल किनार असलेली आकाशी रंगाची साडी परिधान केलेली–अन् छातीवर लांबसडक वेणी रुळत ठेवणारी – गौर वर्णाची अन् घाऱ्या डोळ्यांची चंद्रकला कुणाच्याही नजरेत भरत असे.

केवळ हाफ नेकर अन् ब्लाऊज घालून दोन्ही खांद्यावर दोन छोट्या मुली घेऊन सायकलिंग करणारी चंद्रकला–एका झुल्यावरून दुसऱ्या झुल्यावर सहजपणे उडी घेणारी चंद्रकला प्रेक्षकांच्या नजरेला बेधुंद करत असे. स्वतःचा प्रयोग संपल्यावर प्रेक्षकांना हाताने बाय करतानाची तिची मोहक नजर प्रेक्षकांना अक्षरशः भुरळ पाडत असे. तिच्या उघड्या मांड्या–पोटांकडे प्रेक्षकवर्ग जेव्हा वखवखलेल्या नजरेने बघत असे तेव्हा चंद्रकला हरवलेल्या मनाने स्वतःच्याच शरीराकडे बघत असे अन् 'बक–अप' हा प्रेक्षकांचा कॉमेंट स्वीकारून सर्वांच्या नजरेआड होत असे.

परंतु आज चंद्रकलाचे पाऊल जरा जड पडत होते. चेहऱ्यावर एक वेगळाच भरीवपणा दिसत होता. खांद्यावरला पदर घसरत होता. काहीतरी मनाशी ती पुटपुटत असावी. काहीतरी ती मनाशी ठरवत असावी, असा भास सर्वांनाच वाटत होता.

होय ! चंद्रकलाने आज मनाशी ठरवले होते की, आज श्रीकांतला सगळं काही स्पष्ट सांगायचं. मी सर्कसमध्ये काम करू शकत नाही. मला त्यातून मुक्त कर. दररोज तेच–तेच करून आणि शरीराचं प्रदर्शन करून जीव नकोसा झालाय. श्रीकांत, आता मला पदरात घे. शरीराने तर स्वीकारलं आहेस–आता जरा खुल्या दिलाने स्वीकार कर. ह्या माझ्या भरीव कपड्यात मला तुझ्याबरोबर खूप खूप हिंडू दे. बाहेरचं जग बघ दे. प्लीज, श्रीकांत, ह्यातून मला मुक्त कर, अशी मी श्रीकांतला गळ घालणार आहे आज.

श्रीकांत सर्कसमालकाचा थोरला मुलगा. वडील थकत आल्यामुळे वडिलांच्या मार्गदर्शनाखाली सर्कसची सर्व देखभाल तोच करत असे. पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर, त्यांनी वडिलांसमवेत राहून सर्कसच्या सर्व कामाची ओळख करून घेतली होती. श्रीकांत –तसा फार देखणा मुलगा नव्हता–परंतु एक धडपड्या, फार मोठी धमक असलेला पंचवीस वर्षांचा श्रीकांत सर्वांच्या नजरेत असायचा.

श्रीकांतची आणि चंद्रकलाची दृष्टादृष्ट झाली. एकमेकांनी परस्परांना डोळ्यांनी बघून घेतलं. समजून घेतलं. तसा श्रीकांत लहानपणापासूनच चंद्रकलाला बघत होता.

कुठेही सर्कस असली तरी संपूर्ण डेऱ्यात चंद्रकलाची एक खास स्वतंत्र खोली असे. काही कुटुंबं एकत्र राहत असत. काही पाच–पाच–सहा–सहाच्या ग्रूपने राहत असत. परंतु चंद्रकला एकटीने राहणे पसंत करीत असे.

एक रात्र. नुकताच सर्कसचा दुसरा खेळ संपला होता. सर्वांची जेवणं झाली होती. डेऱ्यात सगळीकडे निरव शांतता होती. आकाशात चंद्र बराच वर आला होता. किंचितसा रातकिड्यांचा आवाज आणि सर्कशीतील जनावरांची कुजबूज शांततेचा भंग करीत होती. श्रीकांत चंद्रकलेच्या खोलीकडे नजर लावून होता. चंद्रकला गादीवर पडली होती. पडल्या पडल्या ती वेणी चुरगाळीत होती. इतक्यात खोलीच्या बाहेर कुणीतरी असल्याची चाहूल चंद्रकलाला लागली. म्हणून चंद्रकलाने उठून खोलीसमोरचा जाडजूड पडदा बाजूला सारला. इतक्यात श्रीकांतने आत प्रवेश केला.

काय साहेब ? झोपला नाहीत अजून–खांद्यावरील घसरलेला पदर सावरीत चंद्रकला बोलली.

तुसुद्धा अजून झोपली नाहीस ?

हं !

चंद्रकला, तू माझी झोप हिरावलीस !

काय बोलता आहात साहेब आपण ?

होय चंद्रकला–तू–तू–माझ्या नजरेसमोरून हालतच नाहीस.

साहेब, आपण फार मोठे आहात. मी केवळ तुमच्याकडे नोकर आहे. चंद्रकला पाठमोरी उभी होती.

परंतु तू फार देखणं रूप घेऊन जन्माला आलीस चंद्रकला. तुझं रूप तू कोण आहेस याच। विचार करू देत नाही.

नाही साहेब.

चंद्रकला ! श्रीकांतने तिच्या डोक्यावर हात ठेवला.

चंद्रकलाचं संपूर्ण शरीर एका सुखद स्पर्शाने मोहरून गेलं.

खोलीत अंधार झाला. खोलीत समोरच्या खिडकीतून आलेली चंद्रकिरणे चमकत होती. त्या चंद्रप्रकाशात श्रीकांत चंद्रकलेचा चेहरा न्याहळत होता.

नंतर श्रीकांत नेहमीच यायचा. एका गावाहून दुसऱ्या गावी जाताना चंद्रकलाला तो मागे ठेवून घ्यायचा.

परंतु चंद्रकला आज खरोखरच बेचैन होती. खरं म्हणजे एक-दोन दिवसांत सर्कस सुरू होणार होती. चंद्रकलाने प्रॅक्टिस करायला हवी होती. बाकी सर्व प्रयोगाची जोरदार प्रॅक्टिस सुरू होती. फक्त चंद्रकला आराम करत होती. अर्थात हे श्रीकांतच्या

नजरेतून सुटलं नाही.

दररोजच्या प्रमाणे श्रीकांत आजही चंद्रकलेच्या खोलीत आला.

चंद्रकला, लौकरच सर्कस सुरू होणार आहे. तू काही प्रॅक्टिस करत नाहीस–चंद्रकलेच्या शेजारी गादीवर बसत श्रीकांत बोलला.

चंद्रकला खाली मान घालून बसली होती. तिचे संपूर्ण लांबसडक केस पुढल्या बाजूने पायावर रुळत होते.

श्रीकांतने, हळूच चंद्रकलेच्या हनुवटीला स्पर्श करून तिचा चेहरा समोर केला.

चंद्रकलेच्या डोळ्यातले दोन अश्रू श्रीकांतच्या हातावर पडले.

चंद्रकला, तू रडतेस ?–काय तुला बरं नाही का ?

नाही–नाही–श्रीकांत, मी आता काम करू शकणार नाही–असं म्हणत चंद्रकलाने आपलं डोकं श्रीकांतच्या मांडीवर ठेवलं.

काय ? काय झालंय सांगशील तर खरं !

श्रीकांत, आता ह्या सर्कसच्या कामातून मला मुक्त कर. मी आता काम करू शकत नाही. काम करावंसंही वाटत नाही. अक्षरशः वीट आलाय त्या कामाचा.

असं म्हणून कसं चालेल चंद्रकला–ह्या सर्व कामावरच माझी भिस्त. माझा दररोज खर्च पाच हजार रुपये. असे–एक–एक प्रयोग बंद करू लागलो तर माझा धंदा कसा चालेल ?

नाही श्रीकांत–केवळ मलाच मुक्त कर.

मग कुठे जाणार आहेस तू ?

कुठेही नाही. इथेच तुझ्याजवळच राहीन. अगदी तुझ्याजवळ सावलीप्रमाणे. आंतापर्यंत घाम गळेपर्यंत काम केलं. आता जरा ह्यातून मुक्त कर. मुक्त होण्याची हीच वेळ आहे. श्रीकांत, प्लीज ! श्रीकांत, एवढं ऐकशील ना ?

का–का–पण तू का काम करू शकत नाहीस ?

नाही–श्रीकांत, मी काम करू शकत नाही –शपथ–अगदी गळ्याची शपथ. मी आता काम करू इच्छित नाही–श्रीकांतचा एक हात आपल्या हातात घेत चंद्रकला आर्जवाने बोलू लागली.

तरीही तुझं ह्यापाठीमागचं कारण आधी सांग. तू काम का करू शकत नाहीस ?

श्रीकांत, मला दिवस गेलेत !

एवढंच ? मग त्यात काय विशेष ?

अॅबॉर्शन करून घेऊ ? पुढील दौऱ्यात काम करू शकशील.

श्रीकांत, काय बोलतो आहेस तू !

त्याशिवाय पर्यायच नाही.

नाही श्रीकांत, तू खोटं बोलतो आहेस. तुझ्या शब्दाखातर मी माझं सर्वस्व तुला अर्पण केलं. प्लीज श्रीकांत, तू मला दूर लोटू नकोस. माझ्या साऱ्या स्वप्नांचा चक्काचूर होऊन जाईल. मी तुझ्याशी जन्माची गाठ बांधू इच्छिते. कृपया उदार मनाने स्वीकार कर.

चंद्रकला, तू म्हणतेस तरी काय ? तुझ्याशी लग्न करू आणि संसार मांडू–ते कसं शक्य आहे ?

म्हणजे ! मला फसवलंस श्रीकांत तू. माझं सर्वस्व तू लुटलंस. माझं सर्व आयुष्य तू कुस्करून टाकलंस.

चंद्रकला, तू एक माझी गरज होतीस. तुझ्याशी मी लग्नच करू शकणार नाही. तू खुळी आहेस चंद्रकला. तुझ्याशी लग्न करणार असतो तर, तुला उघड्या शरीराने मी प्रयोग करू दिले असता का ? तू माझ्या एका नजरेची बळी होतीस एवढेच !

श्रीकांत, तू माणूस आहेस का कोण ? तुझ्या हातून काही पाप घडतंय, असं तुला वाटत नाही ? एका तरुण मुलीचं आयुष्य तू कलंकित करत आहेस, याची तुला खंत वाटत नाही ?

चंद्रकला, सर्कसमध्ये काम करणाऱ्या मुलीला कसलं आयुष्य आणि कसला कलंक?

चंद्रकला, आज तुला सांगतो, पंधरा वर्षांपूर्वी आमच्या सर्कसचा कँप केरळला होता. तिथे तुझ्या आई–वडिलांनी तुला माझ्या वडिलांच्या स्वाधीन केलं. माझ्या वडिलांनी मोबदला म्हणून तुझ्या वडिलांजवळ पैसे मोजले. तुझा सांभाळ केला. तुला कळू लागलं तसं रॉयल्टी म्हणून दरमहा तीनशे रुपये आम्ही तुला देत आहोत.

श्रीकांत–बस्–बस्–फार बोलू नकोस श्रीकांत. हे मला फार वेळेस तुमच्या वडिलांनी सांगितलंय. म्हणूनच मी कधी माझ्या आई–वडिलांची चौकशी केली नाही.

श्रीकांत, तू मला स्पर्श केला नसतास तर, मी कुणाबरोबर तरी संसार मांडू शकले असते.

काय करावयाचा संसार ? पैसे मिळताहेत आणि शरीरसुखही मिळते आहे.

श्रीकांत, गप्प बैस ! तू इथून जाऊ शकतोस. मी इथे आता क्षणभरही थांबू शकणार नाही. माझ्याजवळ कला आहे. नाही तरी गेली बारा वर्षे उघड्या शरीराने सर्वांसमोर आहेच. उद्यापासून हेच प्रयोग मी रस्तोरस्ती करून दाखवीन. लोक माझ्या अंगावर पैसे फेकतील. त्यावर जगेन. डोंबारी नाहीत का पैसे मिळवत !

श्रीकांत बाहेर पडला.

चंद्रकला हमसून हमसून रडू लागली. दैव फार अवखळ असतं. कपाळावरची कुंकवाची कोर रेखीव करत असतानाच ती पार विस्कटून जाईल, असं तिला कधी वाटलं नाही. कुंकू गोंदायच्या आधीच हे पांढरं कपाळ घेऊन ती रस्त्यावर येत आहे. सर्वांच्या साक्षीने. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

। मॅक्झिम गॉर्की ।

। सुमती देवस्थळे ।

**मूल्य दहा रुपये**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०

पुस्तके

## The Great Railway Bazaar

( By train through Asia )
By Paul theroux [ Ballantine Books, pages–342, Rs. 18·95 ]

कधी कधी आपला मूड nostalgic असला आणि आपल्या जवळून जोराने शिट्टी वाजवून ऐटीत रुळं आणि चाक यांच्यामधून लयबद्ध आवाज काढीत आगगाडी जाताना आपण पाहिली, तर आपणसुद्धा त्या गाडीत असतो तर किती छान झाले असते असे आपल्याला वाटते.

प्रवास लांबचा असो वा जवळचा असो, पण फार दिवसांनी आगगाडीत बसण्याचा योग आला तर, त्याची मजा काही औरच असते. आपल्याबरोबर जर एखादे लहान मूल असले तर त्याची excitement असीमच असते. 'आता गाडी कधी सुटणार?' 'आगगाडीची चाके नंतर लयबद्ध आवाजात माझेच नाव बोलतील, तुमचे नाही', 'घाट कधी येणार?', 'बोगद्यातून गाडी कधी जाईल?', 'ते बघा, खालची जमीन आणि झाडेसुद्धा विरुद्ध दिशेला धावत आहेत', 'आपली आगगाडी किती किती जोरात पळते आहे. हात बाहेर काढला तर तो वाकून जात आहे.' अशी आपल्याला भुरळ घालणारी बडबड आगगाडीत बऱ्याच वेळा ऐकायला मिळते.

आपण जर एकटे असलो आणि हातात एखादे उत्तम पुस्तक असले, तर आगगाडीच्या लयबद्ध आवाजाच्या पार्श्वभूमीमुळे आपली एकाग्रता अधिकच धारदार बनते. मी आगगाडीत बसलो की मला जेम्स थॉमसनच्या पंक्ती आठवतात.

'As we rush, as we rush
in the train,
The trees and the houses
go wheeling back,
But the starry heavens
abore the plain,
Come flying on our track.'

आणि मला तो मिस्किल नाटककार ऑस्कर वाईल्ड आठवतो. 'I never travel without my diary. One should always have something sensational to read in the train!'

सत्यजीत रे यांच्या 'पथेर पंचली' मध्ये फुलांनी भरलेल्या एका शेतात दोन मुलांना आगगाडीचे प्रथमच दर्शन घडते तो अविस्मरणीय 'सीन' मला आगगाडी पाहिली की आठवतो.

मला आगगाडीत बसायला अवधी मिळतो तो फक्त पुणे–मुंबईपर्यंत. (इंग्रजी पुस्तकांच्या खरेदीसाठी मला खूप वेळा मुंबईस जावे लागते.) आणि पॉल थेरो, वरील पुस्तकाचा लेखक, याने तर आगगाडीतून सबंध आशिया खंड पालथा घातला आणि हे पुस्तक म्हणजे त्याचे प्रवासवर्णन. या प्रवासवर्णनात ओरिएन्ट एक्सप्रेस, तेहरान एक्सप्रेस, खैबर पास लोकल, फ्रंटियर मेल, राजधानी एक्सप्रेस, ग्रँड ट्रंक एक्सप्रेस, हावरा मेल, ट्रान्स–सायबेरियन एक्सप्रेस व इतर काही आगगाड्यांतील प्रवास लेखकाने टिपलेले आहेत. ही एवढी नावे बघून मी माझी इझी चेअर काढली व लेखकाबरोबर सर्व ठिकाणी हिंडून आलो. कारण प्रत्यक्षात एवढा प्रवास करणे माझ्या खिशाला कधीच झेपायचे नाही.

ग्रँड ट्रंक एक्सप्रेसविषयी पॉल थेरो काय म्हणतात ते बघू. लेखकाला वाटले की, ग्रँड ट्रंक हे नाव हमालाच्या डोक्यावरच्या मोठमोठ्या ट्रंकांवरून पडले असावे! आपले भारतीय लोक प्रवास करताना आवश्यकतेपेक्षा जास्त सामान घेत असतात, याचीही त्याने नोंद केली आहे. या लोकांना बघून त्याला असे वाटले की, निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे संथपणे स्थलांतर करीत आहेत. एरवी भारतीय लोक कधीच शिस्तीत आगगाडीत चढत नाहीत. पण ग्रँड ट्रंक एक्सप्रेसमध्ये तर जणू आगगाडीतच आपण बिऱ्हाड करणार इतक्या त्वेषात ते चढत असतात. ग्रँड ट्रंक एक्सप्रेस दिल्ली सोडते न सोडते तोच दक्षिणेतील लोक आपल्या विजारी सोडून लुंग्या परिधान करतात. मध्यप्रदेशांच्या जंगलातून ग्रँड ट्रंक नागमोडी वळणे घ्यायला लागली की दातवण विक्रीला ऊत येतो व ते तोंडात आठ इंचांची दातवणं टाकून तामिळी लोक 'Time must have a stop!' या


### नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १ | मी आणि माझ्या कादंबऱ्या!–ना. सी. फडके | रु. १२/– |
| २ | प्रतिभा साधन–( ललित लेखनाच्या मूलतत्त्वांची सुबोध मार्मिक चर्चा ) ना. सी. फडके | रु. १५/– |
| ३ | भारतीय जीवनादर्श–( भाग २ रा )–म. म. बाळशास्त्री हरदास | रु. २६/– |
| ४ | महारथी कर्ण–( कर्णाचे स्वभावचित्रण )– म. म. बाळशास्त्री हरदास | रु. १५/– |
| ५ | कुंडली तंत्र आणि मंत्र–( भाग २ रा )– म. दा. भट | रु. ७/– |
| ६ | महाराष्ट्राचा कुंडलीसंग्रह–म. दा. भट | रु. ३२/– |
| ७ | भविष्य तुमचे तुम्ही पहा–ज्योतिषभास्कर वा. प. पटवर्धन | रु. २५/– |
| ८ | पार्टनर–( कादंबरी )–व. पु. काळे | रु. १५/– |
| ९ | बेबी–( नाटक )–विजय तेंडूलकर | रु. ६/– |
| १० | अफलातून हेरगिरी–द. पां. खांबटे | रु. १८/– |

- सहज प्लॅस्टिक कव्हर घालता येईल असे प्लॅस्टिक कव्हर व डिंक पुरवतो.
- आपणास पाहिजे असलेली पुस्तके परगावीही पुरवतो. ( V. P. नाही. )
- आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.
- नॉन–मेंबर्सकरिता डेली बेसीसवर वाचण्याची सोय.

दि फिनिक्स लायब्ररी
७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

विचाराने अवकाशात बघत बसतात. पहिल्यांदा तर थेरोला असेच वाटले की, हे तामिळी लोक पोटातून फांद्याच काढीत आहेत !

तामिळी लोकांच्या वावदूकपणाबद्दल लेखक म्हणतात की, तोंडात दातवण असेल तोवरच तामिळी चूप रहातो !

या प्रकरणात रुळाजवळ प्रातर्विधी उरकणारे व प्रत्येक स्टेशनावर भीक मागणारे यांचे लेखकाने वर्णन केले आहे. खरे तर या १४०० मैलांच्या प्रवासात आणखी कितीतरी चांगल्या गोष्टी लेखकाला बघायला मिळाल्या असतील. वरील प्रकारची वर्णने वाचून मी थोडासा हिरमुसलो. कारण पुस्तक वाचायला मी जरा उत्सुकतेने सुरुवात केली होती. निम्मे पुस्तक वाचून झाल्यावर वाटले, मी हा प्रवास केला असता तर याहीपेक्षा चांगले पुस्तक लिहिले असते !

' राजधानी एक्स्प्रेस टू बॉम्बे ' या प्रकरणात थेरो व्ही. एस. नायपॉलचा उल्लेख करतो. ( व्ही. एस. नायपॉलने ' द मिमिक मेन ', ' सफ्रेज ऑफ एल्व्हिरा ' व एक खळबळजनक पुस्तक ' ॲन एरिया ऑफ डार्कनेस ' व इतर इंग्रजी पुस्तके लिहिली आहेत.) ' ॲन एरिआ ऑफ डार्कनेस '-मध्ये नायपॉल म्हणतात की, मुंबईजवळच्या एका ( सबर्बन ) स्टेशनावर तो प्रचंड जनसमुदाय बघून त्यांनी असा धसका घेतला की, त्या सागरात आपण इतक्या easily बुडून जाऊ की, आपले नावनिशाणही राहणार नाही ! दुसऱ्याच क्षणी नायपॉल तेथून परागंदा झाला ! थेरोला मात्र तसे काही वाटले नाही. मुंबई ( central ) त्याला एक निर्वासितांचे न भविष्य सांगणाऱ्या लोकांचे निवासस्थान वाटले !

पॉल थेरो एकदा 'टॉवर ऑफ सायलेन्स' ( जिथे पक्ष्यांकडून टोचून पारश्यांचा अंत्यविधी होतो ) बघायला गेला असता, तेथील कर्मचाऱ्याने त्याला प्रवेश नाकारला. त्यावर लेखक त्याच्या ड्रायव्हर मुश्ताक यास म्हणतो की, गिधाडे पारशी मृताला टोचून खातात हे खरे नसावे. मुश्ताकनी उत्तर दिले की, याच घटकेला गिधाडांचे जेवण चालू आहे. ही जेवणाची वेळ आहे. मुश्ताकला थेरोच्या जेवणाची वेळ आहे, असे सांगायचे होते. यावरून पॉल थेरोची विनोदबुद्धी किती mediocre आहे याची कल्पना येईल. या वेळेस मृत्यू आणि मयत लोक यांच्यावर हिचकॉक किती सफाईदार विनोद करतो याची आठवण झाली. शर्ली मॅक्लीनच्या ' Do Not Fall Off The Mountain ' या पुस्तकात हिचकॉक Good Mourning ( morning ) ला ' Pleasant period after death ' वगैरे शाब्दिक कोट्या मृत्यूवर कशा करतो ते ' माणूस ' मध्ये लिहिलेच आहे.

प्रवास कसा करू नये व प्रवास-वर्णने कशी लिहू नयेत, याचे उत्तम उदाहरण म्हणून या पुस्तकाचे नाव देता येईल.

—जे. एन्. पोंडा

—फिनिक्स लायब्ररी

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ एक चाकोरी—प्रायोगिकतेची

मी स्वतः नवनाट्याचा एक चाहता रसिक (जाणकार नव्हे ! ) आहे आणि ही गोष्ट मी अगदी पुराव्यासकट सप्रमाण सिद्ध करू शकतो. कारण पुण्यात होणारे प्रायोगिक रंगभूमीवरील बहुसंख्य प्रयोग पाहायला, जमल्यास फुकट अथवा अगदी आपल्या पदरचे पैसे घालूनसुद्धा (आणि वेळात वेळ काढून) मी स्वतः जातीने हजर असतो. आणि अशा प्रकारच्या कार्यक्रमांना हटकून आढळणारी जी मूठभर मंडळी आहेत त्यांत मीही एक, हटकून आढळणारा रसिक आहे. साधारणपणे प्रत्येक प्रायोगिक प्रयोगाला हाच मूठभर रसिकाग्रणींचा ग्रुप थोड्याफार फरकाने हजर राहतो. यांत बहुसंख्य इतर प्रायोगिक नाट्यसंस्थांचे कलाकार, बरीच पत्रकार मंडळी आणि काही फुटकळ वेडे रसिक असतात. जमलेले हे सारे रसिक साधारणपणे दोन-अडीच तास चालणाऱ्या असल्या प्रयोगांचा मनसोक्त आस्वाद होतात आणि त्यातील प्रयोगशीलतेचे, नावीन्याचे वगैरे कौतुक करीत घरी परतात. त्यातील काही सामान्य, प्रथमच ' असल्या ' प्रयोगांना येणाऱ्या मंडळींना काही न समजताच घर गाठावे लागते. ते साधारणपणे पुन्हा या बाजूला न फिरकण्याचा निर्धार करीत घरी जातात. प्रयोग पाहायला जमलेला दुसऱ्या एखाद्या प्रायोगिक नाट्यसंस्थेचा जो एखादा जथा असतो, तो संपूर्ण प्रयोगातील सर्व सौंदर्यस्थळांना हुकमी दाद देतो आणि प्रयोग संपवून बाहेर पडल्यावर मात्र सगळ्याच प्रायोगिकतेची अगदी मनसोक्त थट्टा आणि विडंबन करतो. याहून थोडेसे वेगळे बसणारे समीक्षक पत्रकारबंधू मात्र या प्रयोगातील नावीन्य, प्रयोगशीलता व नवीन संकेत, प्रतिमा आणि त्यांचे सौंदर्य वगैरे गोष्टींचा कीस काढीत एक अभ्यासपूर्ण write-up लिहून काढतात. प्रत्येक प्रयोगाचा साधारण गोषवारा हा असाच असतो. पहिल्या प्रयोगानंतर दुसराही प्रयोग करण्याचे धाडस अभावानेच एखादी नाट्यसंस्था दाखवते. नाहीतर अशाच लोकांच्या उपस्थितीत असाच एखादा प्रयोग करून संस्थेला आपली प्रयोगशीलतेची आवड पचवावी लागते.

तर हा झाला प्रायोगिक रंगभूमीच्या रसिक प्रेक्षकवर्गाचा एक संक्षिप्त गोषवारा. यात कधीच फारसा पडत नाही, आणि—तसा तो पडत नाही, यात काही फारसे विशेषही नाही. विशेष आणि खरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या प्रायोगिक रंगभूमीवर सादर केले जाणारे प्रयोगही आताशा बरेचसे एकसारखेच असतात. याला अर्थातच काही तुरळक अपवाद आहेतच. पण ते फारच तुरळक ! चुकून एकदा माझ्या एका अशाच प्रायोगिक मित्रांजवळ मी असे म्हटल्यावर साहजिकच त्याने मला वेड्यात काढून सोडून दिले होते. आणि आताही माझे हे विधान वाचल्यावर बऱ्याच मंडळींची अशीच प्रतिक्रिया होण्याची शक्यता आहे, आणि त्याला अर्थातच माझा फारसा विरोध नाही ! पण माझ्या मते तरी, अशा नवनाट्याचा एक ' फॉर्म्युला ' बनून गेला आहे. हा फॉर्म्युला आपल्या हिंदी फॉर्म्युल्यापेक्षा जरा वरचा आणि तिखट आहे, हा गुणवत्तेचा फरक आपण मानलाच पाहिजे. पण त्याबरोबरच चाकोरीबाहेर जाणारी बरीच मंडळी एक नवीन ' चाकोरी 'च धरून आहेत, हा विशेष

मात्र तितकाच मानला पाहिजे.

प्रायोगिक रंगभूमीवरचे हे प्रयोग कुठल्या साच्यात चालतात ? त्याची प्रधान लक्षणे कुठली ? याचा तितकासा सखोल अभ्यास काही फार लोकांनी केलेला नाही आणि बऱ्याच मंडळींना त्याची फारशी जरूरीही वाटत नाही असे दिसते. पण साधारणपणे चारदोन नवनाट्ये, एकांकिका वगैरे पाहिल्या तरी त्याचे काही समान गुणधर्म लक्षात यायला लागावेत. त्याची काही उदाहरणे अशी –

( १ ) नवनाट्य हे जास्तीत जास्त दुर्बोध असावे. साधा विषयसुद्धा नवनिर्माणाच्या क्षेत्रात कितपत गहनरीतीने आणि आड-वळणाने सांगता येईल याचा शोध होण्याचा प्रयत्न त्यात असावा.

( २ ) कुठल्याही नटाच्या वैयक्तिक कलागुणांना त्यात फारसा वाव नसावा. बरीच अभिनयाची कामे सामूहिक पद्धतीने पार पाडण्यात यावीत. यातून होणारा महत्त्वाचा लाभ म्हणजे वैयक्तिक अभिनयाचे वैगुण्य पुरते लपून जाते.

( ३ ) प्रयोगात संगीताचा वापर असावा. काही गाण्यांना चाली देऊन ती विडंबनात्मक पद्धतीने म्हणावीत. या चाली जुन्या हिंदी, मराठी वगैरे सिनेमातील असल्यास कमी कष्टात अधिक उच्च विडंबन साधता येते.

( ४ ) रंगमंचावर काही सामूहिक हालचाली, समूह–नृत्ये सादर करण्यात यावीत.

५) नाटकाची संहिता (स्क्रिप्ट) अतिशय त्रोटक असावी. त्यात जेवढी पुनरुक्ती असेल तितका परिणाम अधिक! एकच कल्पना, एकच विधान वारंवार वेगवेगळ्या संदर्भात प्रेक्षकांसमोर ठेवल्याने त्याचा परिणाम अधिक सखोल आणि सघन होतो. या तंत्राचा वापर करून काही वेचक असंबद्ध वाक्यांमधूनसुद्धा काही विलक्षण आशय निर्माण होऊ शकतो. आणि संहिता परिणामकारक बनते.

६) नाटकाच्या कथानकाच्या ओघाशी ( तसा काही ओघ असल्यास ) प्रेक्षकाला एकरूप होऊ देऊ नये. त्यामागील नाट्याची आणि फोलपणाची ब्रेख्तच्या तत्त्वानुसार प्रेक्षकांना वेळोवेळी आठवण करून देत राहावे.

७) नाटयाला सलग परिणाम आणि सलग कथानक असू नये. त्यातील घटना-संवाद जितके विसंगत ( अॅब्सर्ड ) असतील तितके चांगले. त्याचा अर्थ लावताना काही हौतकरू मंडळींच्या मेंदूला चांगलीच कल्हई होते.

८) नाटकातील सर्व पात्रे प्रातिनिधिक स्वरूपाची असावीत. व्यक्तिगत भूमिका असलेले पात्र असू नये. यामुळे सर्व संहितेला खोली लाभते आणि आशयाला वैविध्य लाभते.

यासारखी इतरही अनेक सामाईक लक्षणे काढता येतील. आणि अशा तऱ्हेच्या लक्षणांचा योग्य तो वापर करून कुणाही उत्साही व्यक्तीला प्रायोगिक रंगभूमीवर नवनिर्माण आणि 'सर्जन करता येणे शक्य होईल. आमच्या काही मित्रांनी असे प्रयत्न यशस्वीरीत्या करूनही दाखविले आहेत.

त्यासाठी फक्त थोडा रिकामा वेळ पाहिजे ! ◻

## ◻ असे गुरू ... असे विद्यार्थी

महाविद्यालयीन परीक्षांचा धूमधडाका आता सुरू झाला आहे. कट्ट्यावरच्या गप्पा, निवडणुकांचा 'टेम्पो' वगैरेंमधून बाहेर पडून बहुसंख्य विद्यार्थी चक्क अभ्यासालाही लागले आहेत. या सगळ्या 'सिन्सिअर' वातावरणात एक बातमी मला मोठी गंमतशीर वाटते. दुर्दैवाने मधल्या निवडणुकांच्या गडबडीत या बातमीकडे फारशा मंडळींचे लक्ष गेल्याचे दिसत नाही. म्हणून त्याची पुन्हा एकदा आठवण करून द्यावीशी वाटते. आपल्या एका विद्यार्थ्याला युनिव्हर्सिटीची उत्तरपत्रिका लिहून दिल्याबद्दल कुठल्याशा प्राचार्यांना अटक करण्यात आल्याचे हे वृत्त होते आणि या उत्तरपत्रिकेवर जबाबदार सुपरवायझरचीही सही होती.

ही बातमी वाचून बऱ्याच मंडळींनी त्यावर निषेधही व्यक्त केला असणे शक्य आहे. पण एका वेगळ्या दृष्टीने या बातमीचे महत्त्व और आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यातील संबंध आजकाल दुरावत चालले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांविषयी आदर, प्रेम वगैरे वाटेनासा झाला आहे, अशी बरीच ओरड वेळोवेळी करण्यात येते. त्या संदर्भात या प्रसंगाने चांगलाच प्रकाश पडला आहे. आपल्या विद्यार्थ्यांना वर्षभर प्रेमाने शिकविणारे काही शिक्षक आपल्या ऐकण्यात असतीलच, पण शिक्षकांचा परीक्षेच्या वेळी काहीच उपयोग होत नाही, हेच काही विद्यार्थ्यांचे दुःख होते. या प्राचार्यांनी मात्र याबाबतीत नवीन धडा घालून दिला आहे. विद्यार्थ्यांना अशा रीतीने उत्तरपत्रिकाच लिहून देण्याने शिक्षणक्षेत्रातील बऱ्याच समस्या सहजच उकलतील, अशी या महाशयांची कल्पना असावी. एस्. एस्. सी. सारख्या परीक्षांच्या देखील प्रश्नपत्रिका तीस-बत्तीस रुपयांना विकत मिळत असताना ( ही आमच्या काही मित्रमंडळींनी उठवलेली अफवाच असणार. ) उत्तरपत्रिकाच लिहून देण्याची ही सोपी पळवाट आजवर कुणालाच कशी सुचू नये, ह्याचे आश्चर्य वाटते. विद्यार्थी आणि शिक्षक यांची अशी आणि इतकी दिलजमाई झाल्यास विद्यार्थ्यांच्या सगळ्याच समस्या एकदम सुटून जातील.

आपल्या विद्यार्थ्यांवर सर्वतोपरी प्रेम करणाऱ्या या प्राचार्यांचे कौतुक तर खरेच, परंतु त्याचबरोबर आपल्या प्राचार्यांविषयी एवढी श्रद्धा बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांचेही कौतुक व्हावयास हवे. अन्यथा आपल्या शिक्षकांवर एवढा विश्वास दाखविणारे विद्यार्थी सध्या शोधून देखील सापडणे कठीण. आपल्या प्रिय गुरुजनांनी आपल्यासाठी लिहिलेल्या उत्तरपत्रिकेमुळे आपण परीक्षेत पास होऊ, असा विश्वास आज किती विद्यार्थी दाखवतील ?

असे गुरू विरळा ! असे विद्यार्थीही विरळा !

◻

# नक्षत्रांचे देणे

## शब्दप्रभूला शब्दांची श्रद्धांजली

प्रतिनिधी

दि. २६ एप्रिल १९७७ ही कै. चि. त्र्यं. खानोलकरांची पहिली पुण्यतिथी. एका कलंदर प्रतिभावंताचा हा स्मृतिदिन त्याच्या अलौकिक प्रतिभेला शोभेल अशा प्रकारे साजरा होणार आहे. खानोलकरांच्या कवितांवरच संपूर्णपणे आधारलेला. असा 'नक्षत्रांचे देणे' हा कार्यक्रम, पं. भास्कर चंदावरकर आणि त्यांचे अन्य काही स्नेही, कै. भारती प्रभूंचे चाहते–मित्र यांच्या प्रयत्नांमुळे दि. २६रोजी पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात होणार आहे. आणि त्याच्या उत्पन्नातून कै. खानोलकरांच्या कुटुंबियांना आर्थिक साहाय्य करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाची नक्की कल्पना तरी काय आहे, हे समजावून घेण्यासाठी श्री. चंदावरकरांची भेट घेतली तेव्हा बरीच महत्त्वाची माहिती हाती आली. प्रतिमा, अजब न्याय वर्तुळाचा आणि कालाय तस्मै नमः या खानोलकरांच्या तीन नाटकांचं संगीत-दिग्दर्शन चंदावरकरांचं होतं. त्यामुळे आणि 'अजब न्याय'च्या जर्मनी दौऱ्यामुळे उभयतांचे जे ऋणानुबंध जुळले, त्याच्यातून या कार्यक्रमाची कल्पना जन्मली. कै. खानोलकरांना श्रद्धांजली वाहणं आणि त्यांच्या कुटुंबीयांना मदत करणं याबरोबर इतरही उद्देश यामागे आहेत. खानोलकरांची कविता अधिक प्रमाणात लोकांपुढे आणणं, जनसामान्यापर्यंत पोचविणं याचा हा एक मार्ग आहे. संगीताच्या दृष्टीनंही हा एक वैशिष्टयपूर्ण प्रयोग आहे. संगीत रागांच्या चाकोरीतच फिरत न राहता चालू काळाच्या गतिमानतेला साजेल अशा आविष्कारपद्धतीनं मांडलं गेलं पाहिजे ह्या चंदावरकरांच्या आग्रहाचं हे मूर्तस्वरूप ठरावं. पारंपारिक चिजा / ख्याल वगैरे न वापरता लोकांना थोडंफार परिचित असलेल्या चांगल्या काव्याचा संगीताच्या माध्यमातनं आविष्कार, असं आहे या कार्यक्रमाचं स्वरूप. यात कवीचे शब्द प्रेक्षकांपर्यंत पोचलेच पाहिजेत, असा आग्रह असल्यामुळे संगीताचा झगमगाट दिसणार नाही. साहजिकच कार्यक्रमाचा काव्यात्म किंवा सांगीतिक दर्जा कमी होऊ न देणं आणि अवजड शास्त्रीय संगीताचा वापर टाळताना सगळा मामला फिल्मी होऊ न देणं अशी दुहेरी कसरत पं. चंदावरकर व त्यांचे सहकारी यांना करावी लागणार आहे. अर्थात या सर्वांचे दीर्घकाळचे जिद्दीचे प्रयत्न आणि निष्ठा लक्षात घेता आपली कामगिरी ते यशस्वीपणे पार पाडतील, असा विश्वास वाटतो.

प्रत्यक्ष कार्यक्रमाबद्दल तपशिलात जाऊन बोलायचं तर, हा कार्यक्रम खानोलकरांच्या कवितांचं गायन व पठण अशा संमिश्र स्वरूपाचा आहे. सुमारे ४० ते ४५ कविता कै. आरती प्रभूंच्या 'जोगवा', 'दिवेलागण' व 'नक्षत्रांचे देणे' या काव्यसंग्रहातून निवडून त्यातून एक सुसंगत संहिता निर्माण करायचं काम सौ. चंदावरकर यांनी परिश्रमानं केलं आहे. विशेष म्हणजे कार्यक्रमातून कवीचे शब्दच प्रेक्षकांसमोर आणायचे असल्यामुळे कवितांशिवाय इतर कशाचाही–अगदी गद्य निवेदनाचाही–समावेश करण्याची तडजोड संयोजकांनी केलेली नाही. कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांच्या संचात सोळा वादक आणि साधारण तेवढ्याच गायक / गायिका / वाचकांचा समावेश आहे. अमोल-अनुया पालेकर, श्रीकांत पारगावकर, आनंद मोडक, चंद्रकांत काळे, माधुरी पुरंदरे, मोहन गोखले ही यातली काही ठळक नावं. कार्यक्रमाचं संयोजन, संगीत नियोजन आणि रंगमंच सजावटीचं संकल्पन पं. भास्कर चंदावरकर यांचं आहे आणि रंगमंचाची प्रत्यक्ष सजावट सौ. चंदावरकर, माधुरी पुरंदरे, अभिनव कला विद्यालयाचे प्रा. दत्ता आपटे वगैरे कलाकार करणार आहेत. ही सजावट Surrealistic शैलीनं करण्यात येणार आहे. म्हणजे असं की, या कार्यक्रमात निवडलेल्या कविता प्रामुख्यानं तीन विषयांवर आहेत. १. निसर्ग कविता / प्रेमकविता, २. मध्यमवर्गीयांची चाकोरीतली आयुष्यं आणि ३. मृत्यूबद्दलचं आकर्षण. यांची प्रतीकं म्हणून रंगमंचावर डाव्या कोपऱ्यात एक कवटी यांची योजना करण्यात येणार आहे. प्रकाशयोजनेची बाजू बाळ मोघे सांभाळणार आहेत.

एका शब्दप्रभूला श्रद्धांजली वाहताना आविष्काराचं एक नवं माध्यम, एक नवा form, नवी वाट रूढ करण्याचा प्रयत्न श्री. चंदावरकर आणि त्यांचे सहकारी करताहेत. कलात्मक दक्षतेनं आणि प्रामाणिक भावनेनं भारलेलं हे नक्षत्रांचं देणं चोखंदळ काव्यरसिकांच्या प्रतिसादावरच अवलंबून आहे. कै. खानोलकरांच्या पुस्तकांचं प्रदर्शनही यावेळी भरणार आहे. 'गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे', 'सप्रेम द्या निरोप', 'मृत्यूत कोणी हासे' अशा गाजलेल्या कवितांबरोबरच 'रे धन रे सजण'सारख्या अप्रकाशित कवितेचीही निवड करण्यात आली आहे. कोरसचा 'क्वायर'सारखा थोडा उपयोग करून घेण्यात आला आहे. कै. खानोलकरांचा चंदावरकरांवरचा विश्वास ते सार्थ ठरवतील, असा विश्वास वाटतो. □

रंगभूमीबद्दलची प्रयोगशील आस्था

# महेश एलकुंचवार : सध्या मुक्काम पुणे

खरं म्हणजे नागपूरच्या महेश एलकुंचवारची छावणी पुण्याला पडली त्याला तीन एक महिने उलटून गेले आहेत. त्यांच्याबद्दल काही लिहिण्याचा योग मात्र उशीरा आला. एक तर, ते काही सगळे दिवस इथेच तळ ठोकून होते असं नाही. तर ते असो. महत्त्वाची गोष्ट अशी की, समकालीन प्रायोगिक / नव्या रंगभूमीवर तरुण वयातच स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या या नाटककाराचा मुक्काम सध्या – म्हणजे आणखी दीड-दोन वर्षं तरी – पुण्यातच आहे. पुण्याच्या सांस्कृतिक हालचालीत, विशेषतः नाट्यसंलग्न चळवळीत, आणि त्यातही थिएटर अॅकॅडमीच्या ग्रुपमध्ये त्याची उपस्थिती जाणवायला लागलीय्.

रंगभूमीशी–विशेषतः नव्या रंगभूमीशी – फारशी जानपहचान नसलेल्या काही थोड्या वाचकांना एलकुंचवारची ओळख करून द्यायची म्हणजे 'होळी', 'सुलतान', 'यातनाघर' अशा त्यांच्या काही गाजलेल्या एकांकिकापासून सुरुवात करायला हवी. कारण महाराष्ट्रातल्या नाटकी तरुणांना आणि त्यांच्या द्वारे इतरांना एलकुंचवारची ओळख एकांकिकांमधनं झाली. 'पार्टी' हे त्याचं ताजं नाटक 'बहुरूपी' आणि अमोल पालेकरनं अलीकडेच सादर केलंय् आणि त्याच्या 'गार्बो'नं तर इतिहासच घडवलाय्. त्याची एकांकिका करणाऱ्या आणि त्याच्यावर प्रेम करणाऱ्या कुठल्याही यंग टर्कप्रमाणे बहुधा 'जीन्स्'मध्ये सापडणारा आणि इन्फॉर्मल वागण्याबोलण्याची भलती आवड असलेला हा गृहस्थ मूळचा नागपूरचा आणि तिथल्याच धरमपेठ कॉलेजमध्ये तो इंग्लिशचा (चक्क) प्राध्यापक आहे. अर्थात प्राध्यापकी अजून अंगावर किंवा डोक्यात बिलकुल चढलेली नाही. त्यामुळे कॉलेजमधले आपले विद्यार्थी हे दोस्त असल्याची भावना. आणि महत्त्वाचं म्हणजे नाटकाबद्दलचा उमाप जिव्हाळा. एलकुंचवार सध्या पुण्यात आहे ते या जिव्हाळ्यापोटीच, असं म्हणायला हरकत नाही.

त्याचं असंय् की, एलकुंचवारना मुंबईच्या 'भाभा फौंडेशन'ची रंगभूमीसाठी असणारी 'भाभा फेलोशिप' मिळालीय्. रंगभूमीवर काहीतरी निश्चित आणि महत्त्वाची भर घातलेल्या आणि त्याविषयी नवीन काही अभ्यास करू इच्छिणाऱ्याला मिळू शकणारी ही शिष्यवृत्ती. गिरीश कर्नाड, सत्यदेव दुबे आणि कै. चि. त्र्यं. खानोलकर हे भाभा संशोधन शिष्यवृत्तीचे यापूर्वीचे मानकरी. एलकुंचवारला ती दोन वर्षांसाठी मिळायचीय् आणि त्या मुदतीत त्याच्या पसंतीच्या एका प्रकल्पावर तो संशोधन करणार आहे; विषय आहे, '१९५५ ते १९७५ या काळात सामाजिक स्थित्यंतराचा भारतीय रंगभूमीवर झालेला परिणाम.' स्वातंत्र्याच्या परिपक्वतेच्या या कालखंडात सामाजिक स्थित्यंतराचे अनेक प्रवाह उसळले. त्यांचं प्रतिबिंब भारताच्या निरनिराळ्या प्रांतीय–भाषिक रंगभूमीवर कितपत पडलंय् याची तपासणी महेशाला करायचीय्. त्यासाठी, पुणे हे मुक्कामाचं ठिकाण ठेवून तो देशात भटकणार आणि परिस्थितीचा प्रत्यक्ष अभ्यास करणार.

अशा अभ्यासाला सुरुवात झालीही आहे. रंगभूमीचा दबदबा आपल्याकडेही खूप आहेच. तर फेब्रुवारी–मार्च १९७७ मधला बराचसा काळ महेशाचा मुक्काम कलकत्त्यात आणि नंतर दिल्लीत होता. परवाच्या भेटीत बंगाली रंगभूमीबद्दल महेशकडून बरंच काही ऐकायला मिळालं.

खासकरून प्रायोगिक बंगाली रंगभूमीकडून आपल्याला खूपसं घेता येण्यासारखं आहे. या प्रायोगिकतेचा विस्तारही तिथं चांगला आहे. एकट्या कलकत्त्यातच सोळा-अठरा मोठे थिएटर ग्रुप्स् आहेत आणि लहानसहान तर भरपूर. मंडळींना या सरकारी अनुदानं, मदत वगैरे नाही. सरकारी राज्यनाट्यस्पर्धा वगैरे भानगड नसल्यानं बक्षिसं, प्रोत्साहन असाही काही प्रकार नाही. आर्थिक आघाडीवर दाणादाणच. एवढंच नव्हे तर प्रायोगिक नाट्यसृष्टी पुढे नेऊ शकतील, नव्या वाटा–नवी वळणं दाखवू शकतील, इतक्या ताकदीचे नाटककारही फारसे उपलब्ध नाहीत. आणि तरीही तिथली प्रायोगिक रंगभूमी मरगळलेली नाही. कारणं अनेक. महत्त्वाचं म्हणजे काही ध्येयदृष्टी असणारे, काही तत्त्वांशी 'कमिटेड' असे नाट्यनिष्ठ कलावंत तिथं मोठ्या प्रमाणावर आहेत. आपल्याकडे उणीव जाणवते ती नेमकी काही विशिष्ट दिशा, निश्चित तत्त्व, ध्येय, विचार यांची. आणि त्यांच्याशी बांधील राहून काम करणाऱ्यांचीच. बंगालच्या प्रायोगिक स्टेजवर उत्पल दत्त, शंभू मित्रा, बादल सरकार, अजितेश बंदोपाध्याय अशी मातब्बर माणसं निष्ठेनं पाय घट्ट रोवून उभी आहेत. अर्थात प्रत्येकाचं नाटक वेगळं आहे. चांगल्या संहिताची उणीव ब्रेख्ट, डॅधुरेन मार्क वगैरेंच्या अनुवादानं भरून काढायचा प्रयत्न केला जातो. डाव्या विचारांकडे झुकणाऱ्या नाट्यकृतींचा अनुवाद जास्त प्रमाणात होत आलाय. या सगळ्या ग्रुप्स्मध्ये खुन्नस असू शकते. कित्येकदा त्यांचे प्रयोग बालीशही वाटतात. पण तरीही सगळ्यांची निष्ठा शेवटी एक आहे.

बंगाली व्यावसायिक रंगभूमीचं काय ?

मराठी आणि बंगाली व्यावसायिक रंगभूमीत काही साम्यस्थळं आहेत. उदाहरणार्थ, आपल्या जुनाट मूल्यव्यवस्थेला कुरवाळण्याचं काम दोन्हींकडे चालतं. पण एकंदरीत बंगाली व्यावसायिक रंगभूमीचा अनुभव, तिथली परिस्थिती आपल्यापेक्षा खराबच दिसते. तिथली अस्सल धंदेवाईक नाटकं हा तर एक विदारक अनुभव आहे. हिंदी सिनेमांचा प्रभाव त्यातल्या नाटकांवर बराच दिसतो एवढं सांगितलं म्हणजे पुरे. कलकत्त्यात पाहिलेल्या एका नाटकात सुप्रियादेवी ही तिथली एक लोकप्रिय अभिनेत्री, एका दुःखी–दुर्दैवी स्त्रीचं काम करत होती. पण दुःखातही– बाईंच्या अंगावर नखशिखांत सोन्याचे दागिने झळकतायत. शंभरेक तोळे सोनं घालून दुःखप्रदर्शन ! पण मग शौमिक बॅनर्जी, माझ्याबरोबरचा मित्र, त्यानं

खुलासा केला की. हे असं चालतंच. प्रेक्षकांना असं 'ग्लॅमर' हवंहवंसं वाटतं तर द्यायला नको? काही धंदेवाईक बंगाली नाटकांत तर दोन दोन कॅब्रेसुद्धा असतात. तेवढ्या सीनसाठी भरपूर मोबदला देऊन कॅब्रेडान्सर्स बोलवतात. त्यांच्या रसिकांनाही नाटकातला कॅब्रे किती वाजता सुरू होणार ते अनुभवानं ठाऊक झालेलं असतं. मग काही मंडळी नाटकाचं तिकीट काढून कॅब्रे बघण्यापुरती येऊन जातात. जवळच्या फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये जे पाह्यला सत्तरऐंशी रुपये मोजावे लागतील तेच नाटकात सात–आठ रुपड्यांत पाहता येईल, हा साधा सरळ हिशेब. मग नाटकंही तशीच. अर्थात हे माहीत झाल्यानंतर मलाही मजा वाटायला लागली. I enjoyed. आफ्टर ऑल, नाटक हा धंदा करून व्यावसायिकांना पोट भरायचंय्. तेव्हा पैसे मिळवायचे तर, प्रेक्षकांना जे हवं ते द्यायला पाहिजे. त्यात तसं गैर काही नाही. मी त्यांना दोष देणार नाही. आपल्याकडच्या व्यावसायिक रंगभूमीला हेच लागू होतं का?

थोडक्यात सांगायचं तर, आपली व्यावसायिक नाटकं मला 'आवडत' नाहीत, but I respect these plays. त्यांचे हिशेबच वेगळे आहेत. आपल्या व्यावसायिक रंगभूमीवर नवं काही घडत नाही, नवे चेहरे कमी दिसतात. कारण त्यांच्या व्यावहारात, जे नाणं चालतं ते पुनःपुन्हा मागितलं जाणरच. त्यामुळेच तर आज प्रत्यक्षात नीती, चारित्र्य, कौटुंबिक जिव्हाळा वगैरे मूल्यं दिसत नसली तरी, अशा नाटकात ती हटकून जपली जातात. खरं तर अनेक कारणांमुळे—मग त्यात शहरीकरण आहे, इंडस्ट्रिअलायझेशन आहे—आपण सगळेच आज भावनिक दृष्ट्या खूप कोरडे होत चाललो आहोत. पण या नाटकात तोच भाऊ, तीच बहीण वगैरे इमोशनल अपील आढळणारच. दोष त्यांचाच आहे असंही नाही. पण काहींतरी नवीन, वेगळं दाखवून लोकांना धक्का देणं त्यांना परवडण्यासारखं नाही. व्यावसायिक रंगभूमीवरचे नाटककार, तसा दावा करीत असले तरी, लोकांची नाट्याभिरुची बदलू शकलेले नाहीत, शकणार नाहीत. कारण पन्नास वर्षांपूर्वीच्या मूल्यव्यवस्थेची ती चौकट मोडून बाहेर जाणं त्यांना परवडणार नाही. पैसे देऊन असली मोडतोड बघायला कोण येणार? त्यामुळेच व्यावसायिक रंगभूमीचा एक साचा झालेला दिसतो. मी स्वतः 'डार्लिंग डार्लिंग' आणि 'हिमालयाची सावली' या दोन व्यावसायिक नाटकात फरक करणार नाही. 'सावली' जितक्या गंभीरपणे लिहिलेलं गंभीर नाटक आहे तितक्याच गंभीरपणे 'डार्लिंग' हा फार्स लिहिला गेलाय्. मी दोन्ही सारख्याच प्रमाणात एन्जॉय् करू शकतो.

आपली प्रायोगिक रंगभूमी थंडावलीय् असं नाही वाटत?

नाही. असं कुणाला का वाटावं? नवे प्रयोग चालू आहेत, असतातच. फक्त ते सगळीकडे पोचतातच असं नाही. आमच्या धरमपेठ कॉलेजच्या मुलांनी गेल्या वर्षी 'दहातून एक गेला शून्य' नावाचं एक नाटक केलं. इथे ते कुणालाच माहीत नसेल. पण तो एक चांगला अनुभव होता. इथल्या मॉडर्न कॉलेजच्या मुलांनी केलेली 'प्रतिज्ञा' एकांकिका, लातूरला 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी'चा झालेला प्रयोग, हैद्राबादच्या कॉलेजियन्सनी केलेलं 'वेटिंग फॉर गोदो', मुंबईला अच्युत वझेसारखे अनेक तरुण करताहेत ते प्रयोग—सगळेच काहीतरी नवं देणारे, थ्रिलिंग, एक्सायटिंग असे आहेत. एवढं म्हणता येईल की, राज्यनाट्यस्पर्धा आल्या म्हणजेच प्रायोगिक ग्रुप्समध्ये उत्साह संचारतो, हे वाईट. आमच्याकडे नागपूरलाही बाहेरची व्यावसायिक नाटकं दाबून चालतात. पण स्थानिक प्रायोगिक ग्रुप्सचा उत्साह राज्यनाट्यस्पर्धांपुरताच! आपली प्रायोगिक रंगभूमी आज जास्त आकारवादी, (Formalistic) बनलीय हे खरं आहे. आज आपण एका बंद दरवाजाशी येऊन थांबलो आहोत. याचा अर्थ, पुढे वाट नाहीच असा नाही. फक्त ही कोंडी फोडून नवी दिशा दाखवणारं एखादं जबरदस्त व्यक्तिमत्त्व हवंय. नवी पिढी अधिक समजून लिहिणारी, प्रयोग करणारी अशी येत्येय् आणि भविष्य उजळ आहेसं मला वाटतं.

तर महेश एलकुंचवार, वरवर अबोल वाटणारा माणूस. पण प्रत्यक्षात गप्पांमध्ये प्रचंड इंटरेस्ट. सभासमारंभ, चर्चा, भाषण, परिषदा परिसंवादासारख्या औपचारिक वस्तूंची नावड. एकंदरीतच पुण्याचा 'गुण' लागलेला नाही, लागू नयेही. सध्या लेखन विशेष नाही. फक्त संशोधनविषयाची जुळवाजुळव (मनात) चालू. थिएटरबद्दलचं भरपूर वाचनही आहेच. बंगालमधल्या एक महिन्याच्या वास्तव्यात आपल्या विषयाच्या संदर्भात खूप मुलाखती घेतल्या. उत्पल दत्त, मृणाल सेन, बादल सरकार, अजितेश बंदोपाध्याय, समीक्षक शोमिक बॅनर्जी, स्टेट्स्मनचे उपसंपादक धरणी घोष, एक वृद्ध पण प्रवाहातले नाटककार मिजन भट्टाचार्य, तापस सेन, शंभू–तृप्ति मिया, आणि रुद्रप्रसाद घोष ही चटकन् आठवलेली काही नावं. दिल्लीत राजेंद्र पाल वगळता फारशी महत्वाची भेट अशी कुणाची झाली नाही. पण नाट्यमहोत्सव अटेंड केला. त्यानंतर हैद्राबादचा दौरा झाला. मुंबईशी संपर्क तर सतत आहेच. सध्या मुंबईच्या सात सक्कं त्रेचाळीसवाल्या किरण नगरकरांनी महाभारतावर लिहिलेल्या एका क्रांतिकारक नाटकावर महेश जाम खूष आहे. पण त्याबद्दल पुन्हा केव्हातरी जास्त लिहू. बंगालमध्ये मराठी रंगभूमीवर त्याला अधनंमधनं बारीक बौद्धिकं घ्यायला लागली. कारण गंमतीदार अनुभव असा आला की, आपण बंगाली रंगभूमीबद्दल खूप ऐकून–बोलून राहिलो असलो तरी, बंगालमध्ये मात्र मराठी रंगभूमीबद्दल अंधारातच आहेत. अगदी प्रायोगिक थिएटर ग्रुप्ससुद्धा!

—शिरीष सहस्रबुद्धे

एक पुस्तक प्रकाशन समारंभ

# भाकरी आणि स्वातंत्र्य । आर. डॉक्युमेंट

अनिल काळे

१४ एप्रिल १९७७, मुक्काम पुणे : टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर नेहमीच्याच सायंकाळी ठीक ६-३० वाजता भरलेली एक सभा. सभेला प्रचंड जनसमुदाय. व्यासपीठाच्या पार्श्वभूमीवर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन' असे ठळक अक्षरांतील बॅनर. कारण? कारण आज, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ८६ वी जयंती आहे. सभेचा कार्यक्रम आहे दोन पुस्तकांच्या प्रकाशनाचा आणि मुख्य वक्ते आहेत खासदार श्री. रामभाऊ म्हाळगी व खासदार श्रीमती मृणाल गोरे. अशा या सभेला वैशिष्टयपूर्ण सभा, आगळी सभा असे म्हणणे केवळ औपचारिक होईल काय? मला तरी तसे वाटत नाही.

'...आणि आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला हे होत आहे, हा विशेष योग आहे,' असा उल्लेख सर्व वक्ते भाषणात आवर्जून करतात. हा केवळ योगायोग नाही. सभेच्या संयोजकांनी बुद्धयाच हा योग घडवून आणला आहे. त्या मागे एक सामाजिक विचार आहे.

सभेचे एक संयोजक श्री. श्री. ग. माजगावकर आपल्या प्रास्ताविक भाषणात सांगतात, 'देशात सामाजिक समता प्रस्थापित व्हायला हवी आणि देशातील आर्थिक विषमताही नष्ट व्हायला हवी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पन्नास वर्षांपूर्वी यासाठी लढा सुरू केला. मात्र सामाजिक आणि आर्थिक समतेचे ध्येय अजून दूरच आहे. पण राजकीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते या सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याचे ठरविले तर, हे ध्येय गाठणे अशक्य नाही.'

व्यासपीठावर खासदार रामभाऊ म्हाळगी आणि मृणाल गोरे यांच्याशिवाय 'भाकरी आणि स्वातंत्र्य' या पुस्तकाचे लेखक आ. श्री. ग. प्र. प्रधान, 'आर डॉक्युमेंट' कादंबरीच्या मराठी अनुवादित पुस्तकाचे लेखक श्री. अशोक जैन आणि दलितांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी दोन वेगळ्या मार्गांनी झटणारे डॉ. बाबा आढाव व म्हैसाळचे श्री. मधुकरराव देवल हे दोन सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी 'सकाळ'चे संपादक श्री. श्री. ग. मुणगेकर होते. सभेच्या सुरुवातीस अध्यक्षांच्या हस्ते या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

श्री. मुणगेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'आर. डॉक्युमेंट' व 'भाकरी आणि स्वातंत्र्य' या आज प्रकाशित होत असलेल्या दोन्ही पुस्तकांना निवडणुकीची पार्श्वभूमी लाभलेली आहे. भारतातल्या अर्धपोटी जनतेने भाकरी हवी असेल तर, स्वातंत्र्याची किंमत द्यावी लागेल, हा विचार धुडकावून लावलेला आहे. दलितांचे स्वातंत्र्य आणि दलितांची भाकरी यासाठी झगडा करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या निमित्ताने हा समारंभ होत आहे, हे विशेष औचित्याचे आहे.'

श्री. रामभाऊ म्हाळगी यांच्या हस्ते 'आर. डॉक्युमेंट' या राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकाचे व श्रीमती मृणाल गोरे यांच्या हस्ते 'भाकरी आणि स्वातंत्र्य' या 'विश्वकर्मा साहित्यालया'च्या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

'आर. डॉक्युमेंट' या कादंबरीतील घटनांचे गेल्या वीस महिन्यांतील भारतीय परिस्थितीशी विलक्षण साम्य असल्याचे सांगून श्री. रामभाऊ म्हाळगींनी पुस्तकाचे अनुवादक व तरुण पत्रकार श्री. अशोक जैन आणि योजनापूर्वक 'माणूस'च्या दिवाळी अंकात हा अनुवाद प्रसिद्ध करणारे 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, आणीबाणीच्या भयपर्वात ज्या काही थोड्या पत्रकारांनी निर्भीडपणे आपले कर्तव्य पार पाडले त्यांतील श्री. माजगावकर हे एक पत्रकार आहेत. म्हाळगींनी आपल्या भाषणात सांगितले, 'गेल्या वीस महिन्यांत ज्या घटना झाल्या त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या घटनेचा घोर अपमान केला आहे. परंतु भारताची प्रवृत्ती लोकशाहीची मूल्ये जतन करण्याची आहे. मार्च महिन्यात इथे खऱ्या अर्थाने राजकीय क्रांती झाली. सर्व थरांतील नागरिकांनी लोकशाहीच्या पुनर्प्रतिष्ठापनेचा निर्णय दिला. राजकीय क्रांती फक्त बंदुकीच्या गोळीतून येते याला भारत अपवाद ठरला. जनतेच्या प्रखर शक्तीच्या जोरावर सनदशीर मार्गाने बदल घडू शकतो, हा नवा आदर्श भारतीय जनतेने जगापुढे ठेवला.'

'आणीबाणी हा भारतीय लोकशाहीला लागलेला काळाकभिन्न डाग होता, तो आपण पुसून काढला आहे. असा काळ पुन्हा येऊ नये, यासाठी आपण दक्ष राहिलं पाहिजे. निर्मळ माणसेच निर्भय असू शकतात. यासाठी समाज निर्मळ केला पाहिजे. लाचारी घालविली पाहिजे. आमच्याकडून वशिल्याने आपापली कामे करून घेण्याची अपेक्षा लोकांनी ठेवू नये. आम्हीसुद्धा याच पद्धतीने काम करावे काय? असे आम्ही करणार असू तर, आम्हाला परत बोलवा. जनता व जनप्रतिनिधींच्या सवयी बदलल्या पाहिजेत. समतेच्या भूमिकेवर आधारलेला स्वाभिमानी समाज आपल्याला उभा करायचा आहे. झालेल्या चुका मान्य करून काँग्रेस पक्षानेही जनता सरकारला सहकार्य द्यावे.'

यानंतर खासदार श्रीमती मृणाल गोरे भाषणास उभ्या राहिल्या. 'पानीवाली दिल्लीमें, दिल्लीवाली पानीमें' करणाऱ्या मृणाल गोरेंना पाहण्याची, ऐकण्याची खूपच उत्सुकता लोकांमध्ये होती. 'भाकरी आणि स्वातंत्र्य' या पुस्तकाचे प्रकाशन करताना त्या म्हणाल्या, 'तुरुंगातील वास्तव्यात प्रधानमास्तरांनी हे पुस्तक लिहून फार मोठी कामगिरी बजावली आहे. भाकरी की स्वातंत्र्य नव्हे तर, भाकरी आणि स्वातंत्र्य हा या पुस्तकातील विचारच भारतीय जनतेने निवडणुकीद्वारे मंजूर केला आहे. या विचारासंबंधी सर्वसामान्य

जनतेची निष्ठा कायम झाली पाहिजे, तरच पुन्हा कधीही हुकूमशाही येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होईल.

'स्वातंत्र्य ही पांढरपेशांची चैन, गरिबांना भाकरी हवी हे खरे नाही, हे लोकांनी दाखवून दिले आहे. चळवळीचे स्वातंत्र्य नसेल तर, भाकरी मिळविण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी संघटना करता येणार नाही. कामगारांना, झोपडीवाल्यांना, खेड्यातील गरीब शेतकऱ्यांना याची जाणीव झाली आहे.

'मीसुद्धा काही करू शकतो' असा विश्वास सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाला तर काय घडू शकते, याचे पुन्हा एकदा प्रत्यंतर आले आहे. ब्रिटिश साम्राज्यशाही उलथून टाकण्यात गांधीजींचे साधे मार्गच यशस्वी झाले. त्याबद्दल जगात कौतुक झाले. तसेच आता घडले आहे.

'भाकरी व स्वातंत्र्य यांचे अतूट नाते मान्य करूनच आपल्याला समानतेचे युग आणायचे आहे. पण त्यासाठी भ्रष्टाचाराला मूठमाती द्यायला हवी. सत्य व न्यायावर आधारलेले जीवन हे गांधीजींचे आदर्श आचरणात आणावयास हवेत. केवळ भाकरीचा प्रश्न सुटून चालणार नाही, तर दलित समाजाला मानही मिळायला हवा. भाकरी, स्वातंत्र्य आणि सामाजिक अभिसरण या तीन प्रश्नांची सोडवणूक करण्यावरच नव्या सरकारचे यश अवलंबून आहे, याची जाण सरकारला आहे. पण सर्वसामान्य माणसालाही याची जाणीव व्हायला हवी. तशी ती झाली तरच 'भाकरी आणि स्वातंत्र्य'-सारख्या पुस्तकांचा उपयोग झाला असे म्हणता येईल. भ्रष्टाचाऱ्यांना क्षमा नाही, मग ते कोणीही असोत. वरपासून झिरपणारा हा भ्रष्टाचार खालपर्यंत पोचतो, हे थांबविले पाहिजे. यासाठी प्रत्येकाने भ्रष्टाचार निर्मूलनाचा मनाशी निर्धार केला पाहिजे.'

मृणालताईंचे भाषण संपले आणि या वैशिष्ट्यपूर्ण सभेचा समारोप झाला. सभेच्या शेवटी दलितांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या काही प्रकल्पांना मदत करण्याचे सर्वांना आवाहन करण्यात आले. सभास्थानी ठेवण्यात आलेल्या डब्यात जी रक्कम जमेल ती डॉ. बाबा आढाव व श्री. मधुकरराव देवल यांच्या कार्याला देण्यात यावयाची होती.

सभा झाली. पुस्तकांचे प्रकाशन झाले. विजयी खासदारांची भाषणे झाली व सामाजिक कार्यासाठी अल्पशी मदतही गोळा झाली. पण हा खटाटोप जमवून आणणारे 'माणूस'चे श्री. श्री. ग. माजगावकर, 'विश्वकर्मा साहित्यालया'चे श्री. राजाभाऊ माटे व अन्य कार्यकर्त्यांना फक्त एवढेच अपेक्षित नाही. झाले हे प्रतीकात्मक झाले, सूचक झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन करताना जनमानसात खरेच काही जाणिवा जाग्या झाल्या काय? असतील किंवा नसतीलही. हे एकदम होणार नाही. पण बदललेल्या वातावरणात, दारिद्र्य व सामाजिक विषमता या दोन समस्यांविरुद्ध निकराची लढाई देण्यासाठी समाजाने एकवटून उभे, राहावे हे आवाहन करण्यासाठी ही सभा होती.

वातावरण बदलले आहे, समाजपुरुष जागा झाला आहे हे निश्चित. दडपशाहीची टांगती तलवार डोक्यावर असतानाही कार्यकर्त्यांनी निवडणुका लढविल्या आणि जनतेने त्यांना उघड, उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, एक स्थित्यंतर घडवून आणले. राजकीय कार्यकर्त्यांच्या हाकेला प्रतिसाद देण्यासाठी जनता उत्सुक आहे. पण तिला योग्य कार्यक्रम घेऊन आवाहन करणे आवश्यक आहे.

जनतेने केवळ भाषणे ऐकण्यासाठी एकत्र जमू नये, तसेच राजकीय कार्यकर्त्यांनी केवळ मतापुरतेच बोलू नये. सामाजिक कार्यकर्त्यांनी व संस्थांनी सामाजिक कार्यचेही सवतेसुभे करू नयेत आणि सांस्कृतिक क्षेत्रातील साहित्यिक-कलाकारांनी केवळ स्वतःचा अनुभव संपन्न करण्यासाठीच दलित-आदिवासींशी जवळीक करू नये. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन हे वेगवेगळे किंवा कार्यकर्त्यांच्या सोयीसवडीनुसार सुटे सुटे व मागे-पुढे करून होत नसते. समाजाचे समग्र परिवर्तन व्हायचे असेल तर तिन्ही क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन, परस्परपूरक सहकार्य करून काम करायला हवे. आज राजकीय कार्यकर्ते लोकप्रियतेच्या वलयात आहेत. त्यांनी सामाजिक विषमता व दारिद्र्य यांविरुद्धच्या लढ्यात पुढाकार घेऊन या प्रयत्नांना गती प्राप्त करून द्यायला हवी. सामाजिक कार्यकर्ते आज अनेक ठिकाणी सर्वस्व भावनेने काम करीत आहेत. त्यांना राजकीय कार्यकर्त्यांकडून साथ मिळाली पाहिजे तर, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी शहरी-ग्रामीण, दलित-सवर्ण यांच्यातील सांस्कृतिक भेदभाव नाहीसे करण्यासाठी पोकळ समारंभ न करता प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या (field workers) राजकीय-सामाजिक कार्यकर्त्यांशी हातमिळवणी करून काम केले पाहिजे. १४ एप्रिलच्या सभेचे आवाहन आणि वेगळेपण हेच होते.

□


प्रकाशित झाले :

**भाकरी आणि स्वातंत्र्य**

प्रा. ग. प्र. प्रधान

डेमी १०८ पृष्ठे । मूल्य रु. ८

'ज्यांना भाकरीचा प्रश्न भेडसावतो त्यांना आपली ही अडचण सोडविण्यासाठी स्वातंत्र्याची तीव्र आवश्यकता भासते. त्यामुळे भाकरीचा प्रश्न सोडविताना स्वातंत्र्याचा बळी देऊन कदापीही चालणार नाही.'

—खासदार मृणाल गोरे

**विश्वकर्मा साहित्यालय**

२०३५।२ सदाशिव पेठ, टिळक रस्ता

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४१२०९

रंगभूमी

# संगीत रूपमती

## संथ गतीत संगीताची भर

शिरीष सहस्रबुद्धे

रूपमती हे विद्याधर गोखले यांचं नवं संगीत नाटक पुण्याच्या 'मराठी रंगभूमी' या शिलेदारी नाट्यसंस्थेनं जानेवारीच्या सुमारास रंगभूमीवर आणलं. ऐतिहासिक दंतकथात्मक पार्श्वभूमी लाभलेल्या या नाटकाचं एकमेव वैशिष्ट्य कीर्ती शिलेदारची तडफदार आणि तरीही मोहक भूमिका हे आहे. अर्थात बाजबहाद्दराच्या भूमिकेत नारायण बोडस यांची साथही ठीक लाभलेली आहे. तथापि आपली गुणवत्ता केवळ गायनापुरती मर्यादित नसून अभिनयप्रांतातही आपला अधिकार आहे, हे 'स्वरसम्राज्ञी'-नंतर कीर्तीनं पुन्हा एकवार 'रूपमती'मध्ये सिद्ध केलेलं आहे. आणि म्हणून हे नाटक, नावापासून सर्वस्वी तिचंच आहे–स्वरसम्राज्ञी-प्रमाणेच–एवढंच नव्हे तर, तेच फक्त या नाटकाचं भांडवल आहे, असं मला वाटतं. स्वरसम्राज्ञीमधील लता शिलेदारची पूरक भूमिका बरीच गाजली होती, तथापि 'रूपमती'मधली तिची भूमिका नाटकावर बाहेरून चिकटवल्याचं इतक्या उघडपणे जाणवतं की, तिला काही स्वतंत्र यश–किंबहुना मान्यतासुद्धा–मिळण्याची आशा नाही. एकूणच 'स्वरसम्राज्ञी'इतकंही व्यावसायिक यश 'रूपमती'ला लाभेलसं दिसत नाही.

'रूपमती'च्या कलात्मक अपयशाची जबाबदारी प्रामुख्यानं लेखक श्री. विद्याधर गोखले यांचीच आहे. हे नाटक लिहिताना त्यांना मुख्यत: लिहिण्याची सवय, विशेषत: नाटकं लिहिण्याची पडून गेलेली सवयच, प्रतिभा / स्फूर्तीपेक्षा अधिक उपयोगी पडली असावी, अशी मला घनदाट शंका आहे. 'पंडितराज जगन्नाथ'सारख्या त्यांच्याच जुन्या संगीत नाटकाशी तुलना केली तर, किमान अपेक्षित असलेली व्यावसायिक सफाईसुद्धा 'रूपमती'मध्ये नाही. एक तर नाटकाची गती विलक्षण संथ आहे. कथा सरकण्याचा वेग कमालीचा मंद आहे. कारण घटना फार थोड्या घडतात, गप्पाथापाच जास्त. त्यात गाण्याची भर. तोचतोचपणा भरपूर. उदा. 'कुकूचकू' नावाच्या रद्दड (विनोदी) शब्दाची पुन:पुन्हा केली गेलेली उजळणी. नाटकातल्या विनोदाचा दर्जा अत्यंत सामान्य आहे. त्यातही नावीन्याशी सामान्यत: वाकडं धरलेलं आहे. शब्दांचे निरर्थक व निरुपयोगी खेळ–उदा. नादान नादिष्टपणा–मुबलक. 'इष्क' आणि त्या संदर्भातल्या इतर जुनाट शब्दकल्पना–भावनांची पुनरावृत्ती. रूपमती बाजचे प्राण वाचवते, हा दुसऱ्या अंकातला भाग म्हणजे हिणकस व तर्कहीन लेखनकामाठीचा उत्तम नमुना. सारांश, बाजबहाद्दर–राणी रूपमतीची कित्येक शतकांना भुरळ घालेल अशी प्रीतिकथा, श्री. अभ्यंकरांच्या साधारणत: श्रवणीय चाली आणि कीर्तीचा प्रेक्षणीय व इतरांचा कामचलाऊ अभिनय हे तीन मिळूनही, लेखनात अगदी कच्च्या व उथळ राहिलेल्या या नाटकाला तारू शकतील असं मानणं धाडसाचंच ठरेल ! *

# पावसाचं नाटक

## मुलांनो, प्रायोगिक नाटक असं असते बरे !

प्रायोगिक रंगभूमीचं वाढतं आकारवादित्व आणि त्यातून उद्भवलेला साचेबंदपणा हा आज रंगभूमीविषयक वर्तुळात सार्वत्रिक चिंतेचा आणि चर्चेचा विषय होऊन राहिला आहे. प्रायोगिक नाटकाची व्याख्या माझा एक पत्रकार मित्र 'गुरुशर्ट घालून केलेलं ड्रिल' अशी करतो. नवीन रंगभूमीच्या केवळ एका प्रवाहाचं हे वर्णन आहे असं मानलं आणि त्यातला विनोद–अतिशयोक्तीचा भाग वजा केला तरी मूळ प्रश्नाचं गांभीर्य कमी होत नाही. या पार्श्वभूमीवर मुंबईच्या 'उन्मेष प्रायोगिक रंगमंच' या संस्थेनं सादर केलेल्या आणि अच्युत वझे यांनी लिहिलेल्या–दिग्दर्शिलेल्या 'पावसाचं नाटक' या प्रायोगिक नाटकाचा जो पहिलाच प्रयोग पुण्यात झाला तो वरील समस्येचं गांभीर्य अधोरेखित करणाराच ठरला, असं त्या प्रयोगाच्या गुणवैशिष्ट्यांची नोंद घेऊनही म्हणावं लागतं.

प्रायोगिक रंगभूमीचं हे आकृतिवादित्व आणि त्याचा किंवा तत्सम प्रकारचा साचा तयार व्हायला केव्हा कसा प्रारंभ झाला हे सांगणं अर्थातच कठीण आहे. पण एवढं नक्की की 'घाशीराम कोतवाल'मध्ये आणि थिएटर अॅकॅडमीच्या अन्य नाटकांमध्ये जे खूप नवीन, क्रांतिकारक वगैरे वाटलं ते त्याच्या अधिकाधिक, एकमेकांसारख्या आणि चढत्या श्रेणीनं भ्रष्ट आवृत्त्या निघू लागल्यामुळे साचेबंद, शिळं, कंटाळवाणं होऊन गेलं. आपल्या प्रायोगिक रंगभूमीच्या चळवळीच्या इतिहासाशी मी परिचित नाही, पण 'घाशीराम' मुळे घटवून ऐकताना केलेल्या (synchronised) सामूहिक हालचालींना महत्त्व आलं, प्रतिष्ठा मिळाली आणि मुख्य म्हणजे लोकप्रियता मिळाली. 'घाशीराम'-मधला तो मानवी पडदा आठरावा. स्वाभाविकच असे अनेक पडदे गावगन्ना दिसू लागले. आपल्या प्रयोगाची प्रकृती काय, नाट्यवस्तूची गरज काय हे लक्षात न घेता अशी कवायत केली जाऊ लागली. या कवायतीला ज्यांनी प्रसार–प्रतिष्ठा मिळवून दिली त्या थिएटर अॅकॅडमीनं स्वत: हे तंत्र औचित्याची जाणीव ठेवून संयमानंच वापरलं. 'महापूर' किंवा 'खेळिया' अशा त्यांच्या अलिकडच्या नाटकात तर त्याचा मागमूसही दिसत नाही. तथापी या तंत्राचा अंध भगतगणांनी मात्र त्याला सामूहिक आविष्कार-पद्धतीपासून सर्कशीच्या आभासापर्यंत फरपटवलं. गेल्या दोन वर्षांच्या पुण्याच्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिकास्पर्धेतल्या काही नव्या एकांकिका, अशाच स्वरूपाच्या इतर स्पर्धांतील एकांकिका आणि मुंबई किंवा अन्य ठिकाणच्या स्पर्धा / प्रयोगाचे वृत्तान्तपाहिले तर त्या सर्वांतील एक समान साचा सहज लक्षात येण्यासारखा आहे. 'पावसाचं नाटक' साचेबंदपणाच्या आरोपातून दोषमुक्त

करता येणार नाही. या नाटकात जे सांगायचंय ते कोणत्याही साच्यात बसण्यासारखं नाही हे खरं आहे, तथापि ते ज्या पद्धतीनं सांगितलंय् ती साच्यातलीच आहे. किंबहुना राजकीय–सामाजिक आयुष्यात कोणताही साचा नाकारण्याचं त्यातलं तत्त्वज्ञान एका कलात्मक साच्यातून सादर केलेलं आहे ही विसंगती प्रकर्षानं जाणवते. एवढंच नव्हे तर, अशा प्रवाहपतित्वाचं 'उदाहरण प्रेक्षकांपुढे ठेवण्यासाठी केल्यासारखंच हे नाटक आहे. म्हणजे 'प्रायोगिक नाटक असे असते बरे', असं या नाटकाकडे बोट दाखवून म्हणता येईल, आणि हे काही फारसं स्वागतार्ह नव्हे.

स्वागतार्ह अशी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पावसाच्या नाटकाचा विषय. खरे म्हणजे त्याची पार्श्वभूमी, राजकीय पार्श्वभूमी आपल्या नाटकांना फार क्वचित लाभलेली पाहायला मिळते. त्यातही सामाजिक किंवा राजकीय संदर्भ असणं वेगळं आणि प्रचलित राजकीय परिस्थितीवर काही कॉमेंट करणं वेगळं 'थँक् यू मि. ग्लाड' या नाटकाला असे संदर्भ खूप लाभले आहेत, पण त्याचं केंद्रस्थान 'सेंटिमेंटल' संघर्ष हेच आहे. पावसाच्या नाटकात मात्र आणीबाणीचा नुसता संदर्भ नसून, हुकुमशाहीचा उदय, अंमल आणि अस्त याचं उपरोधिक चित्रण हाच त्याचा केंद्रबिंदू आहे. अर्थात यात डोकवणारा संघर्ष हा तात्त्विक नसून व्यावहारिक आहे म्हणजे हुकुमशाहीविरुद्ध लोकशाही असा हा लढा नाही, तर हुकुमशहाविरुद्ध जनतेच्या मागण्या आणि हुकुमशहा विरुद्ध कलावंतांचं स्वातंत्र्य असा आहे. भाकरी मागणारी ती जनता आणि स्वातंत्र्य मागणारे ते कलावंत अशी ठाम फारकत यात घडलेली दिसून येते. जणु जनतेचं आविष्कास्वातंत्र्याशिवाय आणि कलावंतांचं भाकरीशिवाय काहीच अडणार नाही. अर्थात हा दोष अनवधानानं घडला असेल असं मानायला जागा आहे. एरवी; कलाकारांचं प्रतिनिधित्व करणारी राजा (अच्युत वझे) ही व्यक्तिरेखा ज्या अलिप्त तुटकपणानं बाकीच्याकडे पाहते / वागते, तो खटकतो.

'मायबाप' (दिलीप कोल्हटकर यांनी ही भूमिका समाधानकारक उभी केली.) नावाच्या एका हुकुमशहाच्या जुलुमाची सटीप कहाणी सांगणाऱ्या या प्रयोगाचा संदर्भ आणीबाणी संपल्यानंतर बदलला आहे. त्यामुळे, आणि पुनरावृत्ती, प्रायोगिक सांचेबंदपणा (विशेषतः हालचालीतला), हे सगळं नाटक चालू असल्याचा' उल्लेखांचा ओव्हरडोस यामुळे नाटक (त्यातही दुसरा अंक) काहीसं रेंगाळतं, कंटाळवाणं होतं. वेधशाळा प्रमुखाचे काम उल्लेखनीय. उपरोधाची धार लेखक अच्युत वझे यांनी अनेक ठिकाणी समजदारीनं वापरली आहे. जुनाट 'फॉर्म'मध्ये अकारण कैदी होऊन पडलेला एक नव्या दिशेचा व आशयाचा प्रयोग म्हणून या नाटकाकडे पाहायला हवं. ※

---

हिंदी चित्रपट

# धर्मवीर

**बच्चा खेलेगा और बच्चेका बाप रोयेगा !**

---

धरम आणि वीर ऊर्फ धर्मेन्द्र आणि जितेन्द्र हे दोघे लहानपणीच जुदा झालेले जुडवाँ भाई ! जुन्या भावांचे चेहरे एकसारखे आणि फक्त केसांची ठेवण उलटीसुलटी असं नसलं तरी चालेल हे तरी या निमित्तानं चित्रनिर्मात्यांना आणि प्रेक्षकांना कळलं. एवढंही काही कमी नाही. वीर राजपुत्र पण त्यांची वीरश्री नीतू सिंग ही मात्र बंजारन व लोहाराच्या घरी वाढलेल्या धरमबुवांचं चित्त मात्र राजकन्या पल्लवी (झीनत अमन) हिच्यात गुंतलेलं. शिवाय ज्वालासिंग (प्राण) नामक एक सामुराई-शिकारी. हेच धर्मवीरांचे छुपे पण अस्सल बाप. दोघांची संयुक्त राजमाता. आणि या सगळ्यांपेक्षा कहाणीचा हीरो शोभेल असा एक शेरू नावाचा बाज पक्षी, या सगळ्या मंडळींचा मिळून सत्पक्ष तयार होतो, तर चिरवृद्ध खलपुरुष जीवन (हे धर्मवीरांचे कंसिश मामा), त्यांचे चिरंजीव रणजित, राजकुमारी पल्लवीचे भाऊ देवकुमार, नियोजित वर सुजितकुमार आणि नीतूसिंगच्या कबिल्यांचे सरदार ही अखंड घातपाती कारवाया करणारी विरोधीपक्षीय मंडळी. यांचा फावल्या वेळात संघर्ष. फावल्या वेळातच, कारण एक तर हा लांबलचक सिनेमा धरम–वीरांच्या आईच्या तारुण्यातनं सुरू होऊन त्या दोघांच्या तरुणपणात संपतो, त्यामुळे उपलब्ध वेळ, राजमातेची रडकथा, धरम–वीरांची दोस्ती, दोघांची प्रेमप्रकरणं, त्यातून उद्भवणारी नाचगाणी, घोडदौड–तलवारबाजी-फायटिंग-साहसे, प्राण नावाच्या सुपरमॅनच्या अफाट लीला अशा 'कोईभी चीज उठाओ' छापाच्या नाना चीजवस्तू योग्य प्रमाणात दाखविण्यात खर्ची पडतो. साहजिक प्रत्येक गोष्ट शक्य तितकी ढोबळ आणि बटबटीत, उघड आणि प्रदर्शनी थाटाची करून मांडण्याकडे कल.

या सगळ्या वस्तुसंग्रहाच्या हव्यासामुळे बापड्या कथेची मोठी केविलवाणी अवस्था झाली आहे. धरम आणि वीर हे राजपुत्र जुळे जन्मले असले तरी, बाळ धरमला एक बाजपक्षी उचलून थेट एका लोहाराघरी आणून टाकतो. मग मोठेपणी दोघांची घनदाट दोस्ती. तिच्यावर प्रेक्षकांच्या दृष्टीने शिक्कामोर्तब करण्यासाठी 'टूटे ना ये धरम वीर की जोडी हो ऽ हो हो' अशा धर्तीचं एक गाणं. इथे 'ये दोस्ती हम नहीं तोडेंगे' नावाच्या गाण्याची प्रेक्षकांना आठवण होईल. पण पर्वा नाही. कारण 'धर्मवीर' हा 'शोले'चा स्पर्धक असल्याचं त्यांच्या जाहिरातदारांनी अगोदरच जाहीर करून टाकलेलं आहे. तर यथावकाश हे दोस्त आपापल्या दोस्तिणीच्या मागे लागून नाचगाण्यांचा धुमाकूळ घालतात. पल्लवीदेवी सहजासहजी वश होत नसल्यामुळे दो नंबरके सुपरमॅन धर्मेंद्र 'ओ मेरी मेहबूबा' म्हणून विव्हळत त्यांच्यामागे धावणे, त्यांना पकडून माफक प्रमाणात हाल करणे, (स्वतःचे), वेशांतर करणे, त्यांच्या शेकडोशे सशस्त्र घोडेस्वार शिपायांशी एकटयाने दोन ढाली फक्त घेऊन सामना करणे आणि शेवटी मेल्याचं सोंग करून त्यांना आपली चुंबनं घ्यायला लावणे असे असंख्य विधायक लघुउद्योग करतात. सेन्सॉरबोर्डाची चुंबनाची व्याख्याही मोठी मजेदार दिसते. त्यांना कपाळाची आणि छातीची चुंबनं चालतात. गाल–ओठ ही तेवढी प्रोहिबिटेड एरिया ! मौज आहे ! प्रेमाच्या शिळ्या कढीला आणलेला ऊत शमल्यानंतर कटकारस्थानांचं कालवण खद-

खदायला लागतं. असो. हा सर्व सरंजाम 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' या सनातन ध्येयापर्यंत कसा येऊन पोचतो याचे आडाखे बांधणं, हिंदी सिनेशौकिनांना कठीण नाही.

धर्मवीर हा असा एक पोशाखी चित्रपट आहे. अशा जेमिनीछाप मद्रासी चित्रपटांची परंपरा आता फारशी राहिलेली नाही. त्यामुळे या पोशाखी चित्रपटाचं तो मद्रासी नसला तरीही, स्वागत चांगलं होईल असा रंग दिसतो. असे पिक्चर्स निघावेत. आपल्यालाही रिकाम्या वेळी डोक्याला अजिबात त्रास होऊ न देता पाहायला बरे असतात. सामान्य प्रेक्षकांच्या सुप्त आणि कधीही पुऱ्या न होणाऱ्या आकांक्षांचं प्रतिबिंब त्यांना अशा चित्रपटात दिसतं आणि म्हणूनच त्यांना लोकाश्रय लाभतो. आपल्या बायकापोरांवरही ओरडायची हिम्मत नसलेल्या सामान्य माणसाच्या अबोध, अजागृत जाणिवांना गुदगुल्या करण्याचं काम यातले super human नायक करतात. नायकांबद्दल बोलायलाच नको. अशा चित्रपटातलं त्यांचं काम सर्वांनाच ठाऊक आहे. झीनत आणि नीतू यांनी ते मनोभावे, विशेषतः तनोभावे, निभावलं आहे. त्याच्यापेक्षा काकणभर जास्तच शरीरप्रदर्शन धर्मेन्द्रला करायला लावलंय्. ही नवी बॉक्स ऑफिसट्रिक दिसते. प्राणसकट सर्वांची कामं भिकार आहेत. दिग्दर्शनात काही नावीन्य, लक्षणीयता नाही. लक्ष्मीप्यारेची गाणी आधीच हिट झालेली असून कामचलाऊ आहेत. प्रचंड खर्च करून साधलेल्या भव्यतेखेरीज दुसरं काहीही प्रेक्षणीय या चित्रपटात नाही.

'सर्कसला नेतो' असं सांगून (किंवा न सांगताही) लहान मुलांना खुशाल या सिनेमाला न्यावं. मुद्दाम काढलेले बालचित्रपटही एवढे मनोरंजक नसतील. यातले एकूण प्राणी आणि त्यांच्या छीला लहान मुलांना नक्कीच खेळवतील. त्यांच्या वडिलांना मात्र रडायची वेळ येईल खरी!

*

# टॅक्सी टॅक्सी

## करायला गेलो एक...!

'टॅक्सी टॅक्सी' नावाच्या त्या सिनेमाबद्दल या क्षणी माझ्या मनात पश्चात्तापाखेरीज दुसरं काहीच शिल्लक नाही. इतका सखोल आणि भरपेट पश्चात्ताप करण्याची पाळी सगळे सिनेमे पाहूत असूनही माझ्यावर क्वचितच येते. स्टारकास्टमध्ये अमोल पालेकर नावाचं एक आशादायक नाव नसतं तर, हा तिसऱ्या दर्जाचा पिक्चर माझ्या वाटेतसुद्धा आला नसता. पण एका दुर्दैवी क्षणी मी त्याला अडखळलो खरा.

ईर्षाद नामक एका दिग्दर्शकानं हा सिनेमा लिहिला आणि दिग्दर्शिला आहे. या गृहस्थाला चालू हिंदी सिनेमापेक्षा काहीतरी वेगळं करायचं होतं, म्हणजे करायचं असावं. हे आपल्याला कबूल आहे. प्रत्यक्षात मात्र करायला गेलो एक अशी त्याची अवस्था झाली आहे. त्यामुळेच चित्रपटगृहातल्या मोजक्या प्रेक्षकांची अवस्था टॅक्सी बघायला गेल्यानंतर मोडकी सायकल दिसावी तशी झाली. दोन–अडीच तास समोरच्या रंगीत चित्रांचा अर्थ लावायची धडपड, आत्ता काही तरी घडेल, मग काहीतरी घडेल अशा मृगतृष्णेनं मी करीत बसलो होतो. ईर्षादमियांनी तो योग शेवटपर्यंत आणला नाही. प्रत्येक सिनेमानाटकात ढीगभर काहीतरी घडलंच पाहिजे असा भाबडा आग्रह माझा नाही. पण जे दाखवायचं असेल तर ते तरी प्रामाणिकपणे descent आणि clean असं दाखवाल की नाही?

एका देव ऊर्फ होरो उर्फ अमोल पालेकर नावाच्या टॅक्सीड्रायव्हरच्या आयुष्यातली काही झलक, काही glimpses दाखवायची कल्पना वाईट नाही. त्याचं प्रेमभंगी, पूर्वायुष्य आणि त्याला भेटलेली खूपशी माणसं–विशेषतः स्त्रिया, त्यांची सुखदुःखे या सर्वांचं स्मरणसाखळीसारखं दर्शन वेधक ठरलं असतंही पण इथे हा सगळा प्रकार ठिगळजोड केल्यासारखा झालाय्. ललिता पवार, रीना रॉय, रमा विज, अरुणा इराणी आणि जाहिरा या स्त्रिया आणि त्यांच्याभोवताली गुंफलेल्या वेगवेगळ्या घटना निसर्गतः एकमेकांत न मिसळल्यानं परस्परविसंगत तुकड्यांची एक निरर्थक, निरुद्देश आणि त्रासदायक गोधडी तयार झाली आहे.

चित्राची तांत्रिक अंगे रद्दी आहेत. हेमंत भोसले या नव्या संगीतकाराची कामगिरी आशादायक आहे. बाकी सर्वत्र आनंदीआनंद. आपल्या चोखंदळपणासाठी गाजलेल्या अमोल पालेकरनं ही भूमिका का स्वीकारावी याबद्दल आमच्या बुद्धीला पटेलसा खुलासा होणं जरूर आहे. एकंदरीत ही टॅक्सी एखाददोन आठवड्यापेक्षा जास्त चालायची नाही...चालू नयेही! □


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २३।४।७७ ते २९।४।७७

**मेष : सहकार्य मिळेल**

यावेळीं तुम्हाला ग्रहदशा थोडीफार अनुकूल आहे. पण मंगळ हा राशीचा स्वामी बारावा आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रामुख्याने मोठा खर्च, शेतजमीन, घरदुरुस्ती व व्यापाराचे मोठे सौदे असे टाळावयास हवे. जामीन राहू नये. कर्ज मिळेल पण कर्जाचा वापर योग्य त्या कारणासाठी तुमच्याकडून होणार नाही. मन प्रक्षुब्ध राहील. रवी सन्निधच आहे व गुरू दुसरा आहे. ही एक जमेची बाजू आहे. नोकरीत मोठेपणा वाढेल. तुमची प्रतिष्ठा उंचावेल. वरिष्ठांना अगर मालकांना तुमच्या मार्गदर्शनाची गरज भासेल. राजकारणात तुमचे स्थान महत्त्वाचे ठरेल. तुमच्या शब्दाला किंमत येईल. नवे वाहन खरेदी करू नका. तसेच घेतलेले नवे वाहन वापरात काढू नका. प्रवासात जवळच्या चीज वस्तू जपून ठेवा. कौटुंबिक स्नेहसंबंध सुधारतील. नवविवाहितांना सुखकारक आहे. शुभ दिनांक–२४–२६.

**महिलांना :** माहेरची माणसे खूप दिवसांनी भेटल्याने आनंद होईल.

**विद्यार्थ्यांना :** मन शांत ठेवून तांत्रिक शिक्षण घ्या.

**वृषभ : लेखनात प्रगती**

राजकारणात तुमचे स्थान फार उंचावेल अशी सध्या तरी परिस्थिती नाही. म्हणून तुम्ही त्या क्षेत्रापासून दूर राहणे हिताचे ठरणार आहे. उलट राशीतच गुरू आहे तो वाङ्मय प्रसिद्धीकरिता व प्रकाशन या व्यवसायात खूप मोठे कार्य करण्याची संधी देणार आहे. इतर दृष्टीने हा आठवडा उपकारक आहे. संसारात आनंद व उत्साह भरून राहील. पुत्रजन्माचा आनंद मिळेल. मुलांच्या कर्तृत्वाचा आनंद मिळेल. नोकरीत उत्तम आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. गैरसमज दूर होतील. मालकांचे संबंध ठीक राहतील. शेतीच्या कामाला चालना मिळेल. व्यापारात अडचणी असल्या तर त्या कमी होतील. नवे उद्योग, व्यापार अथवा लहान वर्कशॉप सुरू करता येईल. औदार्याची भावना तीव्र राहील. आवश्यक खर्चावर बंधन ठेवणारास हा काळ उपकारक आहे. विवाहेच्छूंचे विवाह पार पडतील. शुभ दिनांक–२३–२५.

**महिलांना :** नोकरीत वर्चस्व वाढेल. घरचे सुख मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परिश्रमाचे योग्य फळ पदरात पडेल.

**मिथुन : पैसा मिळेल**

हा आठवडा गेल्या वेळच्या आठवड्यापेक्षा अधिक सुखाचा व उपकारक आहे. प्रामुख्याने यावेळी तुमच्या प्रगतीची व यशाची आणि सफलतेची सूत्रे मंगळाच्या हाती आहेत. दहावा मंगळ ही फार मोठी उपकारक परिस्थिती असते. पैसा, प्रतिष्ठा, मोठेपणा, मानसन्मान हे सारे या मंगळाच्या हाती आहे. हा मंगळ तुमच्या आशाआकांक्षा बहरून टाकणार आहे. अनेक लाभ दृष्टिपथात आणणार आहे. अपयश, अडचणी याचा खेद करीत बसू नका. उठा आणि कामाला लागा. साडेसातीचा अगदी शेवटचा टप्पा चालू आहे. गुरूची हवी तेवढी कृपा नाही. तरी पण त्याची पर्वा करू नका. नोकरी–धंद्याची स्थिती सुधारेल. समाधान देणाऱ्या घटना घडतील. वरिष्ठांची मर्जी राहून तुमच्या मागण्या मान्य होतील. नोकरीतील अडचणी दूर होऊन प्रसन्नतेचा नवीन अध्याय सुरू होईल. आर्थिक बाजूचा दुबळेपणा कमी होईल. शुभ दिनांक–२५–२६.

**महिलांना :** तुम्हाला आता कोणतीच काळजी उरणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** मोठे यश पदरात पडल्याचे समाधान मिळेल.

**कर्क : नोकरीत शुभकाल**

भाग्यस्थानी मंगळ व अकरावा गुरू. दहावा रवी असे सामर्थ्यशाली ग्रह तुमच्यावर कृपेच्या चौऱ्याच ढाळीत आहेत. त्यामुळे अस्वस्थता, अप्रसन्नता व अडचणी असे काही शिल्लक राहणार नाही. उलट तुम्ही जे काही ठरवाल ते व्यवस्थित पार पडेल. नोकरी नसणाऱ्यांना ती मिळेल. ज्यांच्या नोकऱ्या अर्धवट असतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. चालू नोकरीत प्रमोशन मिळेल. धंद्याला सुरुवात करायला आतापेक्षा अनुकूल काळ गेल्या कित्येक दिवसांत आला नव्हता. शेती-बागायती खरेदी करिता येईल. शेतीची स्थिती सुधारेल. स्टेशनरी, कटलरी, कन्फेक्शनरी, लेखन, प्रकाशन हे व्यवसाय सुधारतील. रेसपासून फायदा होईल. ज्यांच्या कुंडलीत मूळचे ग्रह उच्चीचे असतील त्यांना अनपेक्षित लाभ होईल. परदेशी वा मोठा प्रवास करण्याचे अनेक दिवसांचे स्वप्न साकार होईल. शुभ दिनांक–२४–२५.

**महिलांना :** शिक्षिका व प्रोफेसर स्त्रियांना बरेच उपकारक घडेल.

**विद्यार्थ्यांना :** श्रमाचे चीज होईल.

**सिंह : परिस्थिती सुधारेल**

हा आठवडा अनुकूल आहे. गेल्या आठवड्यात अर्धवट राहिलेली कामे पुरे होतील. प्रवासास उत्तम आहे. तुमच्यापैकी ज्यांचे ग्रह जन्मस्थ उत्तम आहेत त्यांना विशेष कारणासाठी प्रवास घडेल. विदेशी जाण्याची देखील संधी मिळेल. लवकरच राहू दुसरा होणार आहे. त्यापूर्वी तुम्ही अनेक महत्त्वाची कामे उरकून घ्या. पैशाची परिस्थिती अकल्पितपणे सुधारणार आहे. रेस वा लॉटरीत लाभ होईल. यावेळी स्वतंत्र धंदा जर सुरू केला, तर आगामी काळात भरभराटीला येण्यास त्याचा उपयोग होईल. जमिनीची खरेदी करायला हरकत नाही. नोकरीतील प्रतिकूल काळ आता इतिहासजमा झाला आहे. साडेसातीचा फटका बसला असेल तर, त्यांतून तुम्ही आता बाहेर पडणार आहात. तुमचे पूर्वीचे स्थान तुम्हाला आता मिळणार आहे. काळजी आणि चिंता दूर होईल.

शुभ दिनांक–२३–२५.

**महिलांना :** नोकरीतील अडचणी दूर होतील.

**विद्यार्थ्यांना :** अनेक हितकारक घटना घडतील.

**कन्या : संसारात आनंद**

तुमच्या राशीची माणसे नेहमी त्रस्त व त्रासिक असतात. अति कष्ट व लाभ कमी अशी एकूण स्थिती असते. पण गुरू भाग्यस्थानी आल्यापासूनच तुमच्या बाबतीत दैवाची खैर निर्माण होत आहे, ही गोष्ट तुमच्या ध्यानी आली असेलच. तुमच्या संसारात आनंद निर्माण करणे हे या गुरूचे काम आहे. मंगळ जरी सातवा असला तरी त्याची तुम्ही आता मुळीच काळजी करू नका. तुमच्यापैकी ज्यांचे लग्न ठरले असेल त्यांचे लग्न पार पडेल व ज्यांचे ठरले नसेल त्यांचे ठरेल. नोकरी–व्यवसाय सुरळीत होईल. नोकरीत तसा फारसा त्रास होणार नाही. कामाचा ताण पडेल. परंतु तुमच्या कर्तृत्वाचा गौरव होईल. वरिष्ठ खूष राहतील. दुय्यम धंदा त्यातल्या त्यात बरा चालेल. आर्थिक बाजू सुधारेल. प्रवासाचा बेत करा. शुभ दिनांक–२४–२६.

**महिलांना :** कामाची दगदग होईल. पण मन प्रसन्न राहील.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत मोठे यश पदरात पडणार आहे.

## तूळ : स्थावरात लाभ

राहू लवकरच बारावा होणार आहे. त्यामुळे महत्त्वाची कामे आटोपून घ्या. गुरू आठवा आहे. तो आर्थिक बाजू भक्कम करील. प्रामुख्याने श्रमाविना पैसा हे त्याचे देणे असते. रेस व लॉटरीपासून लाभ होईल. स्त्रीकडून लाभ होण्याचीही शक्यता असते. वारसा हक्काने जमीन अगर पैसा मिळू शकेल. तुम्ही वाहन घेणार असाल तर त्यासाठी योग्य अशी ही वेळ आहे. भागीदारीत कोणताही नवा व्यवसाय सुरू करायला हरकत नाही. नोकरीत लाभ होईल. आजवर जे काही श्रम केले असतील त्याचे चीज होईल. तुमच्यावर अन्याय झाला असेल तर तो पुसून जाईल. वरिष्ठांकडून सहानुभूती मिळेल. नोकरीत बढती–प्रमोशन मिळू शकेल. पगारवाढ मिळेल. ज्यांच्या बदल्या अडचणीच्या ठिकाणी झाल्या असतील त्यांना त्या तहकूब करून घेता येतील. कलाक्षेत्रात प्रतिष्ठा व पैसाही मिळेल. शुभ दिनांक–२५–२७.

**महिलांना :** पुत्रजन्माचा आनंद मिळण्याचा योग आहे.

**विद्यार्थ्यांना :** मनाला आनंद व उत्साह मिळेल.

## वृश्चिक : कौटुंबिक स्वास्थ्य

राशिस्वामी मंगळ पाचवा, रवी सहावा व गुरू सातवा ही ग्रहांची स्थिती फार उत्तम आहे. सामर्थ्यवान ग्रह सध्या तुमच्यावर खूष आहेत. त्यामुळे यशप्राप्ती, सफलता आणि समृद्धी असे तुमच्याबाबतीत घडणार आहे. यावेळी जे काही कराल ते यश घेऊन पुरे होईल. वैवाहिक जीवनातील असमाधान कमी होईल. संसारात नावीन्य व आनंद निर्माण होईल. मनोरथ पूर्ण होईल. तुमच्यापैकी ज्यांच्या विवाहाची बाब लांबणीवर पडत होती त्यांचे विवाह ठरतील किंवा पार पडतील. तुम्ही मोठ्या प्रवासास जाणार असाल तर सारे इच्छेप्रमाणे घडणार आहे. नोकरीधंद्याची परिस्थिती एकूण सुधारलेली राहील. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. जे बेकार आहेत त्यांच्या बाबतीत अनुकूल घटना घडतील. धंद्यासाठी कर्ज अगर इतर मदत मिळेल. चालू नोकरीतील अडचणी कमी होतील. वरिष्ठांच्या मनातील गैरसमज दूर होऊन सारे मनासारखे घडेल. शुभ दिनांक २३–२६.

**महिलांना :** तापटपणा व संताप आवरा. संसारात समाधान निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** प्रवासाचा हेतू पुरा होईल.

## धनू : बरीच अनुकूलता

सातवा गुरू एवढासा अनुकूल नसतो. उपासना, आध्यात्मिक साधना, व्रतवैकल्ये यात आयत्यावेळी अडचणी येण्याचा संभव असतो. तरी पण उपरोक्त सारी कृत्ये मात्र करायला हरकत नाही. टीकाकार, लेखक यांनी, तसेच वक्त्यांनी आपल्या शब्दाने इतरांच्या भावना दुखावणार नाहीत, याची काळजी घ्यावी. चौथा मंगळ व पाचवा रवी हे दोन्ही ग्रह तुम्हाला इतके उपकारक आहेत की, नोकरी, व्यवसाय, स्थावराचा प्रश्न, जमीन-जुमला, घरदार, प्रवास, आर्थिक क्षेत्र वगैरे बाबतीत अतिशय अनुकूल घटना घडणार आहेत. मूळच्या कुंडलीत जर ग्रह उच्चीचे असतील तर श्रमाशिवाय पैसा मिळू शकेल. व्यापार सुधारेल. पडून राहिलेला माल विकला जाईल. सोने-चांदीविषयक व्यवहार फायद्याचे होतील. प्रवासाला अनुकूल वातावरण आहे. मनोरथ पुरे होतील. नोकरीत अनुकूल असे स्थित्यंतर घडून येईल. शुभ दिनांक २६–२८.

**महिलांना :** संसारात नावीन्य व समाधान निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** एखादा आवडीचा कोर्स सुरू करायला हरकत नाही.

## मकर : थोडे चांगले

चौथा रवी, तिसरा मंगळ व पाचवा गुरू ही महत्त्वाची ग्रहांची सामर्थ्यशाली केंद्रे तुमच्याबाबतीत सध्या निर्माण झाली आहेत. याचा अर्थ गेल्या आठवड्यापेक्षा साधारण हा आठवडा अनुकूल फळे देईल. विशेषत: तुमच्या कल्याणाची सारी सूत्रे सध्या गुरूच्या हाती आहेत, असे म्हणायला हरकत नाही. गेले काही दिवस अनेक क्षेत्रांत तुम्हाला माघार घ्यावी लागली आहे. धंद्यात नुकसान सोसावे लागले आहे. सार्वजनिक व खाजगी बाबतीत तुमचे डावपेच फसल्यामुळे बरेच काही प्रतिकूल घडले आहे. यातून बाहेर कसे पडावे, याचा मार्ग यावेळी तुम्हाला सापडेल. नवीन धाडस असे करू नका. नोकरीत प्रामाणिक राहावे, असा मुद्दाम सल्ला द्यावासा वाटतो. वरिष्ठांची मर्जी संपादन होणे सध्या तरी कठीण दिसते. नोकरीत चुका होऊ देऊ नका. पैशाचे व्यवहार अंगाशी येणार नाहीत, याची काळजी घ्या. शुभ दिनांक २३–२७.

**महिलांना :** प्रामुख्याने तब्येत सुधारेल. उत्साह राहील.

**विद्यार्थ्यांना :** खूप अभ्यास करणे आवश्यक आहे.

## कुंभ : नोकरीस उत्तम

सार्वजनिक क्षेत्रांत तुमचे स्थान नेहमीच वरचे राहते यावेळी दुसरा मंगळ, तिसरा रवी व चौथा गुरू ही ग्रहांची रचना उपकारक आहे. प्रामुख्याने उपजत गुणांना बरेच प्रोत्साहक वातावरण निर्माण होईल. कर्तृत्वाला नवे क्षेत्र उपलब्ध होईल. शेती, व्यापार यात नव्या कल्पनांना बरीच संधी मिळेल. व्यापारात नफा मिळून जुने देणे व कर्ज फेडण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. चार पैसे हाती खेळतील. राहणीमानात वाढ होईल. मित्र व सहकारी हात देतील. नोकरीत अनुकूल असे घडेल. बदल करायचा झाला तर हरकत नाही. चालू नोकरीत देखील बरेच काही पदरात पडेल. अधिकार व पैसा वाढेल. वरिष्ठांना गुणांची ओळख पटेल. बेकारांना त्यांचा आवडता व्यवसाय करता येईल. त्यासाठी मदत मिळेल. रेल्वे, इंजिनीयरिंग, उद्योग, खते, पोलाद, साबण, तेले या उद्योगात काम करणाऱ्या लोकांना हितकारक असे घडेल. नोकरवर्गाला उत्तेजन मिळेल. राजकारणात प्रतिष्ठा उंचावेल. शुभ दिनांक २७–२८.

**महिलांना :** शिक्षण व प्रशासन या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना पगारवाढ मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** या वेळी परीक्षेचा निर्णय तुमच्या मनासारखा लागेल.

## मीन : नव्या क्षेत्रात प्रवेश

सध्या तुमची रास बरीच आघाडीवर आहे. राशीत मंगळ, दुसरा रवी व तिसरा गुरू असे छान पाठबळ लाभले आहे. राशिस्वामी तिसरा आहे, ही एकच गोष्ट तुमच्या यशाची साक्ष द्यायला पुरेशी आहे. अंगी असलेल्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळणे, नव्या योजना व कल्पना सुचणे, त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी सामर्थ्य लाभणे, हे गुण यावेळी तुम्हाला प्राप्त होणार आहेत. तुमचा ठसा कोणत्याही क्षेत्रात तुम्ही उमटवू शकाल. तुम्ही लेखक वा प्रकाशक असाल तर तुमचा ग्रंथ लोकप्रिय होणार आहे. तुमच्या एखाद्या लेखात अगर अग्रलेखात खळबळ उडवून देण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. कलाक्षेत्रात प्रतिष्ठा उंचावेल. नोकरीच्या बाबतीत अनेक दिवसांच्या अपेक्षा पुऱ्या होतील. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येऊन तुम्हाला जे हवे ते मिळेल. सार्वजनिक कार्यात तुमची प्रशंसा होईल. संशोधनात लक्ष घालावे. धार्मिक कार्य यथास्थित पार पडेल. पैसा मिळेल व खर्च होईल. शुभ दिनांक २५–२८.


**महिलांना :** नोकरीत प्रमोशन असे काही तरी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेचा निकाल तुमची प्रतिष्ठा उंचावेल.

□

# डोले पीक सर्वदूर ऽऽ..
# सुख समृद्धी भरपूर..

अैका हो अैका . . . ऽऽऽ . . .
पिकं भरघोस होणार . . .
अन् डोलू लागणार . . .
व्हय, व्हय - आणि आपणही नाचणार
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.
खते - मग ती जमिनीतून देण्याची असोत
अथवा पिकावर फवारण्याची असोत - भरपूर
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर आमच्या
जवळच्या शाखेस भेट द्या.



**बँक ऑफ महाराष्ट्र**

११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

*जेथे अर्थसहाय्याची खरी जरुरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।*

PRAJAKTA

# ‘आर डॉक्युमेंट’ : दोन अभिप्राय

☐ “तुम्हाला लिहावे असे वाटले ते ‘माणूस’ दिवाळी अंकातील ‘आर डॉक्युमेंट’ या पुस्तकाच्या संक्षेपित अनुवादाबद्दल. अनुवाद अत्यंत प्रभावी आहे. नेहमीच अनुवादात भाषा आणि आशय यांच्या कमीपणाची जाणीव होते. विशेषतः संक्षेपामध्ये हे घडण्याची जास्त शक्यता असते. मी स्वतः ‘आर डॉक्युमेंट’ हे मूळ पुस्तक वाचले आहे. त्यामुळे तर आपल्या अनुवादाचे सामर्थ्य अधिक जाणवले. आपण या निमित्ताने एका अत्यंत उपयुक्त वास्तवाचे प्रभावी दर्शन घडवले त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.”

—बापूसाहेब काळदाते (खासदार)
(नाशिक मार्ग मध्यवर्ती कारागृहातून १४।११।७६ रोजी अशोक जैन यांना पाठवलेल्या एका पत्रातून)

☐ आणीबाणीच्या काळात गळ्यात सोनेरी साखळ्या मिरवणारी थोर थोर मंडळी दातखीळ बसल्यासारखी गप्प होती. अशा वेळी अशोक जैन यांनी ‘दि आर डॉक्युमेंट’चा अनुवाद करावा आणि ‘माणूस’नें तो प्रसिद्ध करावा हे खरोखरच एक अप्रूप होते.
घटनादुरुस्तीच्या गोंडस मिषानें नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावून घेता येतात व त्या मार्गानें लोकशाही जीवनपद्धतीचे रूपांतर हुकूमशाहीच्या सुरवंटात होऊ शकते. वॉटरगेट प्रकरणामुळे अमेरिकेला आलेला हा अनुभव आपल्यालाही आणीबाणीकाळात येत राहिला.
या कादंबरीच्या अफाट यशाचे हे एक रहस्य आहे.

—प्रा. राम बापट

**आर डॉक्युमेंट । अनुवाद : अशोक जैन**
**राजहंस प्रकाशन । मूल्य : दहा रुपये**